❖ संस्थापक : कै. वसंत काणे ❖ नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ ❖ पुणे आवृत्ती | शुक्रवार, दि. ११ सप्टेंबर २०२६ | ❖ पाने : ८ ❖ अंक : २५७ ❖ Gmail : news.sandhya@gmail.com ❖ किंमत : ७ रूपये

www.dainikesandhya.com Epaper - www.sandhyaepaper.com www.youtube.com/@sandhyalivenews

७० वर्ष
निर्भीड पत्रकारीतेची

दैनिक संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक

क्युआर स्कॅन करून दै. संध्याच्या यूट्युब चॅनलला सबस्क्राईब करा
SUBSCRIBE
www.sandhyaepaper.com



# विद्यार्थ्यांना मोठा दिलासा

## आठवडाभरात सर्व मागण्या मान्य करण्याचे फडणवीसांचे आश्वासन, पेपर पुनर्तपासणीसह एसआयटी चौकशी

■ मुंबई (दै. संध्या)

राज्यसेवा मुख्य परीक्षा २०२५ च्या निकालावरून आणि कथित पेपरफुटीवरून आक्रमक झालेल्या MPSC विद्यार्थ्यांसाठी एक दिलासादायक बातमी समोर आली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि विद्यार्थ्यांचे शिष्टमंडळ यांच्यात झालेली महत्त्वपूर्ण बैठक यशस्वी ठरली असून, विद्यार्थ्यांच्या सर्व प्रमुख मागण्या राज्य सरकारने मान्य केल्या आहेत. या बैठकीत मुख्यमंत्र्यांनी पेपरची पुनर्तपासणी करण्याचे आणि पेपरफुटीच्या प्रकरणाची थेट 'एसआयटी' (SIT - विशेष तपास पथक) मार्फत सखोल चौकशी करण्याचे आश्वासन दिले आहे. या निर्णयामुळे राज्यभरातील लाखो स्पर्धा परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

**पावणेदोन तास चाललेल्या बैठकीत तोडगा**

मंत्रालयात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि MPSC विद्यार्थ्यांच्या शिष्टमंडळादरम्यान तब्बल पावणेदोन तास सविस्तर आणि सखोल चर्चा पार पडली. या चर्चेदरम्यान विद्यार्थ्यांनी आयोगाच्या कारभारावर आणि परीक्षेतील गोंधळावर आपले सर्व आक्षेप पुराव्यांसह मांडले. मुख्यमंत्र्यांनी विद्यार्थ्यांच्या सर्व समस्यांचे गांभीर्याने निरसन केले. बैठकीनंतर माध्यमांशी बोलताना विद्यार्थ्यांच्या शिष्टमंडळाने सांगितले की, "आमच्या मुख्यमंत्र्यांसोबतच्या चर्चेत सर्व मागण्या मान्य झाल्या आहेत. राज्यसेवा मुख्य परीक्षेच्या पेपरची नव्याने पुनर्तपासणी केली जाईल. तसेच, पेपरफुटी प्रकरणात थेट एसआयटी (SIT) चौकशी लावली जाईल." विशेष म्हणजे, या संपूर्ण प्रकरणात येत्या आठ दिवसांच्या आत ठोस कारवाई केली जाईल, असा स्पष्ट शब्दही मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिल्याची माहिती विद्यार्थ्यांनी दिली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत झालेली बैठक सकारात्मक झाल्याचे आंदोलक विद्यार्थ्यांनी सांगितले. राज्यसेवा मुख्य परीक्षा २०२५ संदर्भात गुणांची फेरतपासणी करण्याबाबत मुख्यमंत्र्यांनी सकारात्मक भूमिका घेतल्याचे विद्यार्थ्यांनी नमूद केले. तसेच मुलाखती पुढे ढकलण्याबाबतही चर्चा झाली. परीक्षेशी संबंधित सर्व बाबी व्ही. राधा समितीसमोर मांडण्याच्या सूचना मुख्यमंत्र्यांनी दिल्या आहेत. आरटीआयअंतर्गत आवश्यक कागदपत्रे व पेपर उपलब्ध करून देण्याबाबतही सकारात्मक आश्वासन मिळाल्याचे विद्यार्थ्यांनी सांगितले. दळवी समितीच्या माध्यमातून गुणांशी संबंधित मुद्द्यांवरही निर्णय घेण्यात येईल, असे त्यांनी स्पष्ट केले. विद्यार्थ्यांच्या विविध मागण्यांना मुख्यमंत्र्यांनी सकारात्मक प्रतिसाद दिल्याने पुढील काळात वातावरण अधिक सकारात्मक होईल, अशी अपेक्षा विद्यार्थ्यांनी व्यक्त केली.

### ‘आमच्या सर्व मागण्या मान्य झाल्या’

आंदोलक विद्यार्थ्यांनी सांगितले की, आंदोलनामागील नेमक्या मागण्या काय आहेत, याबाबत मुख्यमंत्र्यांनी विद्यार्थ्यांकडून माहिती घेतली. राज्याच्या विविध भागांतून आलेल्या विद्यार्थी आणि शिक्षकांच्या समस्या मुख्यमंत्र्यांसमोर मांडण्यात आल्या. ठराविक मागण्यांव्यतिरिक्त विद्यार्थ्यांच्या इतरही अडचणी त्यांच्यासमोर मांडण्यात आल्या. चौकशीअंती जे कोणी दोषी आढळतील, त्यांच्यावर कारवाई केली जाईल, असे आश्वासन देण्यात आल्याचे पाटील यांनी सांगितले. विद्यार्थ्यांच्या प्रश्नांवर तोडगा काढण्यासाठी मुख्यमंत्री फडणवीस यांनी पुढाकार घेतल्याचेही त्यांनी नमूद केले. दरम्यान, व्ही. राधा समिती राज्यभरातील विद्यार्थ्यांशी संवाद साधून त्यांच्या समस्या समजून घेत असल्याने परीक्षा व्यवस्थेत सकारात्मक बदल होण्याची अपेक्षा असल्याचे त्यांनी सांगितले.

## थोडक्यात...

### महामार्गाच्या विलंबावर नितीन गडकरी भडकले

मुंबई : दैनिक संध्या

केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी मुंबई-गोवा महामार्गाच्या रुंदीकरणात होत असलेल्या विलंबाबद्दल नाराजी व्यक्त केली आहे. ते म्हणाले की, प्रकल्पाला इतका विलंब झाला आहे की त्यांना लाज वाटते. गडकरींनी असेही सांगितले की, महामार्ग पूर्ण झाल्यानंतर होणाऱ्या उद्घाटन कार्यक्रमात ते सहभागी होणार नाहीत. मुंबई-गोवा महामार्गाचे रुंदीकरण दीर्घकाळापासून सुरू आहे. गडकरींच्या मते, याचे सुमारे 93-94% काम पूर्ण झाले आहे. मुंबई-गोवा महामार्गाच्या सुमारे 440 किलोमीटर लांबीच्या भागातील काम पूर्ण होऊनही अनेक ठिकाणी खड्डे, पाणी साचणे, दुरुस्ती आणि वाहतूक कोंडी यांसारख्या समस्या समोर येत आहेत. अलीकडील पावसानंतर नव्याने बांधलेल्या काही भागांतील रस्त्याची पृष्ठभाग खराब झाल्याच्या तक्रारीही मिळाल्या आहेत. महामार्गावर मे महिन्यात खारपाडा टोल प्लाझावर टोल सुरू झाला होता. असे असूनही, प्रकल्पाच्या काही भागांमध्ये काम आणि सुधारणा सुरू आहेत. महामार्गावर 2021 मध्ये बांधलेला माकडांसाठीचा एक ओव्हरपासही कोसळला आहे, ज्यामुळे सुरक्षेबाबत प्रश्न निर्माण झाले आहेत.

### जादा पैसे मागितले तर कॉलेजवर थेट कारवाई

मुंबई : दैनिक संध्या

अभियांत्रिकी प्रवेशाच्या वेळी विद्यार्थ्यांकडून मंजूर शुल्कापेक्षा अतिरिक्त रक्कम आकारणाऱ्या महाविद्यालयांवर आता कडक कारवाई केली जाणार आहे. शुल्काच्या नावाखाली पालकांकडून रोख रक्कम किंवा इतर कोणत्याही माध्यमातून अवाजवी पैशांची मागणी केल्यास संबंधित संस्था अडचणीत येणार आहे. अशा संस्थांमधील नियमबाह्य प्रवेशही रद्द करण्यात येतील, असा स्पष्ट इशारा महाराष्ट्र राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाने (सीईटी सेल) दिला आहे. अभियांत्रिकी विद्यार्थ्यांचे पालक तसेच काही लोकप्रतिनिधींनी राज्यातील काही महाविद्यालयांकडून अतिरिक्त आणि नियमबाह्य शुल्क आकारले जात असल्याच्या तक्रारी सीईटी सेल आणि संबंधित यंत्रणांकडे केल्या आहेत. पुण्यातील काही अभियांत्रिकी महाविद्यालयांमध्ये मंजूर शैक्षणिक शुल्काव्यतिरिक्त रक्कम मागितल्याचे व्हिडीओ सोशल मीडियावर समोर आल्यानंतर हा मुद्दा चर्चेत आला होता. या पार्श्वभूमीवर सीईटी सेलने सर्व अभियांत्रिकी संस्थांना शुल्क आकारणीबाबत स्पष्ट निर्देश दिले आहेत. शुल्क नियामक प्राधिकरणाकडून प्रत्येक संस्थेसाठी शुल्क निश्चित केले जाते. त्यामुळे प्राधिकरणाने मंजूर केलेल्या शुल्काव्यतिरिक्त विद्यार्थ्यांकडून कोणत्याही स्वरूपात अतिरिक्त रक्कम घेणे बेकायदेशीर असल्याचे सीईटी सेलने स्पष्ट केले आहे. शैक्षणिक शुल्काव्यतिरिक्त रोख स्वरूपात रक्कम मागणे, इतर शुल्काच्या नावाखाली अतिरिक्त पैसे घेणे किंवा प्रवेशाच्या वेळी पालकांवर अवाजवी आर्थिक भार टाकणे याला परवानगी नाही.

## जमिनीच्या वादातून अतुल सावेंच्या भावाला आणि पुतण्याला बेदम मारहाण

### कॅबिनेट मंत्र्याच्या कुटुंबावर हल्ला : संभाजीनगरमधील घटना

■ छत्रपती संभाजीनगर (दै. संध्या)

राज्यात शेतीच्या बांधावरून किंवा जमिनीच्या मालकी हक्कावरून अनेकदा वादविवाद पाहायला मिळतात. मात्र, अशा वादाला जेव्हा हिंसक वळण लागते, तेव्हा परिस्थिती गंभीर बनते. अशीच एक धक्कादायक घटना छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात उघडकीस आली आहे. राज्याचे कॅबिनेट मंत्री आणि भाजपचे ज्येष्ठ नेते अतुल सावे यांच्या सख्ख्या मोठ्या भावाला आणि पुतण्याला जमिनीच्या वादातून काही अज्ञातांनी रक्त सांडेपर्यंत बेदम मारहाण केली आहे. या जीवघेण्या हल्ल्यात दोघेही गंभीर जखमी झाले असून, त्यांना उपचारासाठी तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, हा सर्व धक्कादायक प्रकार छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील पैठण तालुक्यात घडला आहे. पैठण तालुक्यातील बिडकीन पोलीस ठाण्याच्या हद्दीत येणाऱ्या नायगाव खंडेवाडी येथे सावे कुटुंबाची शेतजमीन आहे. या शेतीच्या बांधावरून आणि शेतात जाण्याच्या रस्त्याच्या कारणावरून काही स्थानिक लोकांशी त्यांचा वाद सुरू होता. या वादाने अचानक उग्र रूप धारण केले आणि एका गटाने



थेट मंत्री अतुल सावे यांच्या कुटुंबावरच हल्ला चढवला. या हल्ल्यात अतुल सावे यांचे मोठे बंधू अजित मोरेश्वर सावे (वय ७० वर्षे) आणि त्यांचा पुतण्या अमेय अजित सावे (वय ३५ वर्षे) यांना लाठ्या-काठ्यांनी बेदम मारहाण करण्यात आली. हे दोघेही मूळचे खडकेश्वर, छत्रपती संभाजीनगर येथील रहिवासी आहेत. या गंभीर घटनेची माहिती मिळताच बिडकीन पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी आणि रुग्णालयात धाव घेतली. सध्या पोलिसांकडून जखमींची विचारपूस केली जात असून, त्यांचे अधिकृत जबाब नोंदवण्याचे काम सुरू आहे. हल्ला करणाऱ्या आरोपींचा पोलिसांकडून कसून शोध घेतला जात आहे.

## मनोज जरांगेंच्या अडचणी वाढणार?

### अजय बारसकरांची थेट ED कडे तक्रार; आरक्षणाच्या नावाखाली १००० कोटींच्या भ्रष्टाचाराचा आरोप

■ मुंबई (दै. संध्या)

मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावरून राज्यात आधीच राजकीय आणि सामाजिक वातावरण तापलेले असताना, आता एक खळबळजनक बातमी समोर आली आहे. मराठा आरक्षण अभ्यासक अजय बारसकर यांनी मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील आणि त्यांच्या सहकाऱ्यांविरोधात थेट अंमलबजावणी संचालनालय अर्थात 'ईडी'कडे (ED) तक्रार दाखल केली आहे. मराठा आरक्षणाच्या आंदोलनाच्या नावाखाली जरांगे आणि त्यांच्या निकटवर्तीयांनी वाळू तस्करीसारखे काळे धंदे करून किमान १००० कोटी रुपयांची अवैध संपत्ती जमा केल्याचा अत्यंत गंभीर आरोप बारसकर यांनी केला आहे. यामुळे आगामी काळात मनोज जरांगे यांच्या अडचणीत मोठी वाढ होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. अजय बारसकर यांनी स्वतः मुंबईतील ईडी कार्यालयाबाहेरून प्रसारमाध्यमांना ही माहिती दिली. बारसकर यांनी सांगितले की, "मला ईडी कार्यालयाकडून अधिकृत बोलावणे आले होते. त्यानुसार मी स्वतः ईडी कार्यालयात जाऊन डेप्युटी डायरेक्टर (उपसंचालक) यांची भेट घेतली आणि त्यांच्यासमोर माझी सविस्तर बाजू मांडली. माझ्याकडे उपलब्ध असलेले सर्व पुरावे मी ईडीच्या अधिकाऱ्यांना सुपूर्द केले आहेत." आरक्षणाच्या



नावाखाली समाजाची दिशाभूल करून या लोकांनी प्रचंड मोठा भ्रष्टाचार केल्याचा दावा त्यांनी यावेळी केला. या प्रकरणात केवळ मनोज जरांगेच नाही, तर त्यांच्या अनेक जवळच्या सहकाऱ्यांचाही सहभाग असल्याचे बारसकर यांनी म्हटले आहे. त्यांनी ईडीकडे दिलेल्या तक्रारीत पांडुरंग तारक, ईश्वर बलांडे, गंगाधर काळकुटे, श्रीराम पुरणकर, संजय कटारे, स्वप्नील तारक, बद्रीनाथ तारक आणि जरांगे यांचे मेहुणे विलास खेडकर यांसारख्या अनेक नावांचा स्पष्ट उल्लेख केला आहे. "या सर्व लोकांचा वाळू माफिया हा सर्वात मोठा धंदा आहे. वाळूच्या अवैध धंद्याबाबत आणि आर्थिक गैरव्यवहाराबाबत कारवाई करण्याचे सर्वाधिकार ईडीकडे असल्याने, या किमान हजार कोटींच्या भ्रष्टाचाराची ईडीने सखोल चौकशी करावी आणि संबंधितांवर गुन्हे दाखल करावेत," अशी थेट मागणी बारसकर यांनी केली आहे. मनोज जरांगे आणि त्यांच्या सहकाऱ्यांच्या राहणीमानावर आणि अचानक वाढलेल्या संपत्तीवर बारसकर यांनी अनेक गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहेत. "या सर्व लोकांकडे कोट्यवधी रुपयांच्या लक्झरी 'डिफेंडर' गाड्या कुठून आल्या? मुंबईतील लीलावतीसारख्या अत्यंत महागड्या रुग्णालयांमध्ये उपचारासाठी लागणारा लाखो रुपयांचा खर्च कोण करत आहे? हा पैसा कुठून येतो?" असे खडे सवाल त्यांनी उपस्थित केले आहेत.

### जमिनींच्या खरेदीवरही आक्षेप

इतकेच नाही तर, जरांगे यांचे निकटवर्तीय पांडुरंग तारक यांनी नुकतीच ५० एकर आणि २८ एकर जमीन खरेदी केल्याचा दावाही बारसकर यांनी केला आहे. एवढी मोठी जमीन खरेदी करण्यासाठी एकाएकी इतका प्रचंड पैसा या लोकांकडे आला कुठून, याची पाळेमुळे खणून काढण्यासाठी या सर्वांच्या संपत्तीची ईडीने तातडीने चौकशी करावी आणि त्यांना चौकशीसाठी बोलावावे, अशी विनंती करण्यासाठीच आपण ईडी कार्यालयात आल्याचे बारसकर यांनी स्पष्ट केले.

## ब्रिटनच्या हाऊस ऑफ लॉर्ड्‌समध्ये विकासाचा डंका

### *एकनाथ शिंदेंचे इंग्रजीत तडाखेबंद भाषण; महाराष्ट्रातील १२ कोटी जनतेला पुरस्कार केला समर्पित*

■ लंडन/मुंबई (दै. संध्या)

ब्रिटनच्या ऐतिहासिक हाऊस ऑफ लॉर्ड्‌समध्ये उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या भाषणाची चांगलीच चर्चा झाली. ‘नमस्कार, जय हिंद, जय महाराष्ट्र’, ‘जय भवानी, जय शिवाजी’ आणि ‘भारत माता की जय’ अशा घोषणांनी भाषणाची सुरुवात करत शिंदे यांनी मराठी अस्मितेपासून महाराष्ट्राच्या विकासापर्यंत अनेक मुद्दे मांडले. त्यानंतर त्यांनी सलग इंग्रजीत केलेल्या भाषणातून महिला सक्षमीकरण, नागरिक-केंद्रित प्रशासन, सामाजिक न्याय, महाराष्ट्रातील पायाभूत सुविधा आणि ब्रिटनसोबतच्या भविष्यातील सहकार्याचा आराखडा मांडला.

हाऊस ऑफ लॉर्ड्‌समध्ये झालेल्या विशेष सोहळ्यात शिंदे यांना ‘कॉमनवेल्थ पब्लिक लीडरशिप रिकग्निशन’ या सन्मानाने गौरवण्यात आले. मुख्यमंत्री आणि आता उपमुख्यमंत्री म्हणून नागरिक-केंद्रित, पारदर्शक आणि नाविन्यपूर्ण प्रशासन पद्धती राबवल्याबद्दल हा सन्मान देण्यात आल्याचे मानपत्रात नमूद करण्यात आले आहे. विशेषतः ‘मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना’ आणि ‘शासन आपल्या दारी’ या उपक्रमांचा उल्लेख त्यात करण्यात आला.

या कार्यक्रमाला उत्तर आयर्लंडच्या माजी फर्स्ट मिनिस्टर आणि बॅरोनेस आर्लेन फॉस्टर, यूके एशियन बिझनेस कौन्सिलचे चेअरमन अँड्र्यू ग्रोकॉक, कौन्सिलचे उपाध्यक्ष सुदीप सकाळे,




ब्रिटिश संसद सदस्य, वरिष्ठ मंत्री, महापौर, विविध देशांचे राजदूत, जागतिक उद्योजक आणि कॉमनवेल्थ देशांतील मान्यवर उपस्थित होते.

भाषणाच्या सुरुवातीलाच एकनाथ शिंदे यांनी आपल्या राजकीय प्रवासाची ओळख ‘सामान्य माणूस’ अशी करून दिली. मुख्यमंत्री म्हणून काम करण्याची संधी मिळाली असली तरी आपण स्वतःला सामान्य माणूसच मानतो आणि आता उपमुख्यमंत्री म्हणूनही सामान्य नागरिकांसाठी कटिबद्ध असल्याचे त्यांनी सांगितले. “DCM म्हणजे Dedicated to Common Man”, अशी शब्दांची कोटी करत त्यांनी आपल्या प्रशासनाच्या भूमिकेचे स्पष्टीकरण दिले. चांगल्या प्रशासनाची खरी कसोटी ही दुर्बल आणि सामान्य माणसाचे सक्षमीकरण करण्यात आहे, हा माजी राष्ट्रपती डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांचा विचारही त्यांनी उद्धृत केला. ब्रिटिश तत्त्वज्ञ जॉन स्टुअर्ट मिल यांच्या विचारांचा संदर्भ देत त्यांनी राज्याची खरी ताकद ही त्या राज्यातील नागरिकांच्या प्रगतीत असते, असे सांगितले. शिंदे यांच्या भाषणानुसार, या योजनेअंतर्गत महिलांच्या खात्यांमध्ये £6.15 अब्जपेक्षा अधिक रक्कम थेट हस्तांतरित करण्यात आली आहे. तसेच त्यांनी पंतप्रधानांच्या आर्थिक सल्लागार परिषदेच्या अभ्यासाचा संदर्भ देत लाभार्थी महिलांच्या सरासरी बँक शिल्लक रकमेत 84% वाढ झाल्याचे आणि आरोग्य, शिक्षण व पोषणावरील खर्चात 46% वाढ झाल्याचे सांगितले. त्यांच्या मते, महिलांना आर्थिक ताकद मिळाल्यास कुटुंब, समाज आणि स्थानिक अर्थव्यवस्था अधिक मजबूत होते.

### ‘लाडकी बहीण’ योजनेचा हाऊस ऑफ लॉर्ड्‌समध्ये उल्लेख

एकनाथ शिंदे यांनी आपल्या भाषणात सर्वाधिक भर ‘मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना’ या योजनेवर दिला. स्वतःची एक बहीण असल्याचा उल्लेख करत, या योजनेमुळे महाराष्ट्रातील लाखो महिलांशी आपले ‘बहिणीचे’ नाते जोडले गेल्याचे त्यांनी सांगितले. कमी उत्पन्न गटातील महिलांच्या बँक खात्यात थेट आर्थिक मदत जमा केली जाते. “ही धर्मादाय मदत नाही, तर महिलांच्या स्वाभिमान, आर्थिक स्वावलंबन आणि कुटुंबाच्या सुरक्षिततेला बळ देणारी योजना आहे,” असा युक्तिवाद शिंदे यांनी केला. महिला आर्थिकदृष्ट्या सक्षम झाल्यानंतर त्याचा फायदा केवळ महिलेला होत नाही, तर संपूर्ण कुटुंबाला होतो. आरोग्य, पोषण, मुलांचे शिक्षण आणि घरगुती खर्चाच्या निर्णयांमध्ये महिलांची भूमिका मजबूत होते, असे त्यांनी सांगितले. या आर्थिक मदतीमुळे काही महिलांना छोटे व्यवसाय सुरू करण्यास मदत झाली असून त्यातून स्थानिक बाजारपेठा आणि छोट्या व्यापाऱ्यांनाही चालना मिळत असल्याचा दावा त्यांनी केला.

## जशी प्रवृत्ती, तशी माझी भाषा : जरांगे

■ आंतरवाली सराटी (दै. संध्या)

मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी आंतरवाली सराटी येथे उपोषणाला बसलेले आंदोलक मनोज जरांगे पाटील यांच्या उपोषणाचा आज 13 वा दिवस आहे. सलग 13 दिवसांपासून सुरू असलेल्या अन्नत्यागामुळे त्यांची प्रकृती खालावली आहे. काल तब्बेत बिघडल्यामुळे त्यांना सलाईन लावण्यात आले होते. दरम्यान आज माध्यमांशी बोलताना मनोज जरांगे पाटील म्हणाले की, जशी प्रवृत्ती असेल, तशीच भाषा वापरावी लागते. एकनाथ शिंदेंवर बोलावं लागतं याचं मलाही दुःख होतं; पण संजय शिरसाट यांच्यामुळे बोलावे लागते आहे, शिंदेंच्या लोकांनी त्यांना बोलावे की तुमच्यामुळे जरांगे पाटील विरोधात बोलत आहे. गेली 3 वर्षे त्यांना माझी भाषा चांगली वाटत होती का? असा सवाल सुद्धा मराठा आंदोलनकर्ते मनोज जरांगे पाटील यांनी केला आहे. दरम्यान, 12 तारखेला अंतरवाली सराटी येथे एक महत्त्वाची राज्यव्यापी बैठक आयोजित करण्यात आली आहे. या बैठकीत मुंबईतील आंदोलनाची पुढील दिशा आणि स्वरूप जाहीर केले जाईल. मनोज जरांगे पाटील पुढे म्हणाले, बहिणीने जेवायला बोलावले आहे; तर भाऊबीजेला नक्कीच बहिणीकडे जेवायला जाऊ. पण आता आंदोलन सुरू आहे, त्यामुळे त्यांनी आता बोलावू नये. भाऊ संकटात पडेल असे बहिणीने करू नये. भाऊबीजेला साडीचोळी घेऊन जाऊ. त्यांनी चांगल्या भावनेने बोलावले आहे, त्यामुळे उगाच चुकीचा अर्थ काढण्याला किंवा आडवे जाण्याला काही अर्थ नाही. भावाचे नाते जोडले आहे, तर भाऊबीजेला त्यांच्याकडे जेवायला जाऊ, असे अमृता फडणवीस यांच्या जेवनाला येण्याच्या निमंत्रणावर बोलताना जरांगे पाटलांनी म्हटले आहे.

# संपादकीय

## लोकोत्सव धनवंताच्या मुठीत

महाराष्ट्रात गणेशोत्सव हा आपला लोकप्रिय लोकोत्सव आहे. या लोकोत्सवाला मोठी परंपरा आहे. या गणेशोत्सवाकडे सांस्कृतिक सोहळा याच दृष्टीने पाहिले जाते. मात्र गेल्या काही कालावधीत या गणेश उत्सवाचे "इव्हेंट "मध्ये रूपातंर झालेले दिसत आहे. काही कालावधी पूर्वी डीजे नव्हता. तेव्हा मुळशी. मावळ. भोर वेल्हा.व खेड तालुक्यातील ढोल लेझीम तरूण मंडळाच्या पारंपारिक वाद्यवृंदाच्या निनादात विसर्जन मिरवणूक निघायच्या. त्यावेळीही जल्लोष उत्साह अविस्मरणीय होता. आनंदाची लयलूट होती. मग आत्ताच असे काय घडले का घडवून आणले.की हे डीजेचे भूत शहरापासून खेडे गावातही गल्लोगल्ली जाऊन पोहोचलेले आहे. हे शोधण्याची आवश्यकता आहे. हा बदल केवळ गणेशोत्सवापुरताच नसून दहीहंडी. नवरात्रीची तोरणे. जत्रा. यात्रा बैलगाड्याच्या मिरवणूक. महापुरुषांच्या जयंतीत पाहायला मिळतो. याचे कारण गणेश मंडळे. दहीहंडी. जयंती.यात्रा समिती कमेटी यामधील तरूणाई कारणीभूत आहे.या नवोदित सळसळत्या तरूणाईला आपल्या इशारावर नाचवण्यासाठी निरनिराळ्या राजकीय पक्षात व त्यांच्या प्रबळ आणि श्रीमंत नेत्यांमध्ये चढाओढ सुरु होऊन ही विविध गणेश. नवरात्री मंडळानी या राजकीय पक्षाचे व नेत्यांचे मांडलिकत्त्व स्विकारून त्या राजकीय पक्षाचे व नेत्यांचे हक्काचे कार्यकर्ते कधी नेत्याचे घरगडी झाले हे मंडळाना व स्वयंसेवकाना समजलेच नाही. गणेशोत्सव. दहीहंडी. नवरात्र. यात्रा. जयंती सोहळ्यात ही राजकीय नेते मंडळी अमाप पैसा ओतत राहीली. गर्दी जमवण्यासाठी वेगवेगळे अफलातून फंडे व आयडिया वापरले जाऊ लागले. या आयडीयामुळे या लोकोत्सवाचे इव्हेंटमध्ये रूपांतर झाले. त्यामुळे उत्सवाचे पावित्र संपत गेले. आणि या उत्सवात चंगळपणा.ओगंळपणा धिंगाणा हा केद्रस्थानी आला आणि हा लोकोत्सव पैसेवाल्या व दादागिरी करण्यात मशहूर असणारे मंडळीच्या हातात गेला. त्यामुळे या उत्सवात चंगळवादाचे उदात्तीकरण होत आहे. व ते जाणीवपूर्वक केले जात आहे. त्याला हेतुपूरक खतपाणी घातले जात आहे. या उत्सवात मंडळाना जी पाहिजे ती सगळी रसद पुरवली जाते. त्यामुळे मंडळाचे ब्रँडीग झाले आहे. कोणते गणेश मंडळ कोणत्या राजकीय नेत्यांचे ही ओळख सर्वसामान्यात होत आहे. व झालेली आहे. त्यामुळे या गणेश मंडळाना राजकीय पक्ष व त्यांच्या नेत्यांचा राजाश्रय मिळाल्याने कायदा व नियम धाब्यावर बसवून उत्सवाच्या नावावर धूडगूस घातला जातो. "तुम्ही पोरी पळवून आणा. पुढचं मी बघतो असे दहीहंडी उत्सवात जाहीरपणे सांगणारे लोकप्रतिनिधी या महाराष्ट्र राज्यात राजरोसपणे वावरत आहेत. यावरुन उत्सवाचे वारे कोणत्या दिशेने आगेकूच करत आहे. याचा अंदाज येईल. एकूनच हे उत्सव देवदेवताचे व समाजाचे राहीलेले नसून ते राजकीय नेत्यांचे झालेले आहेत. त्यामुळे "नेता सांगे, आणि मंडळ नाचे. असे सध्याचे चित्र आहे. नुकताच पार पडलेल्या दहीहंडी उत्सवात कोणी गोविंदा नाचवला कोणी गौतमी पाटील. राधा पाटील कोणी नट नटखट नटी आणल्या. तर कोणी तमाशा फडातील मुली जेसीबीवर नाचवल्या. कशासाठी. तर अलोट गर्दी जमविण्यासाठी. मग डीजेचा दणदणाट. लेझर दिव्याचा झगमगाट आणि सेलीब्रेटीचा थाटमाट पाहिल्यावर हे उत्सव श्रीमंत झाले हे लक्षात आल्याशिवाय राहात नाही. या श्रीमंती थाटात उत्सवाचे पावित्र.व हेतू हे सगळं हरवलेलं दिसत आहे. हा अनर्थ. व अध:पतन आणि अवमूल्यन कशामुळे झाले व होत आहे हे ठरवण्याची वेळ आलेली आहे. राजकारणी मंडळीनी आपल्या राजकीय हेतूसाठी. मतलबासाठी हे लोकोत्सव डळमळीत करण्याचे घृणास्पद काम केले आहे व आजही करत आहेत. यामध्ये केवळ गणेश उत्सवच बदनाम होत नाहीत तर नवोदीत तरूणाई सडत आहे व संपत होत आहे. याचा विचार समाजाने करण्याची गरज आहे. उत्सवाच्या नावावर नको तो नंगानाच व तमाशा करायचा. पैशाची उधळण करायची. डीजेच्या तालावर नाचगाणे करायचे ही बिभित्स संस्कृती फुलत आहे. हे निश्चितच चिंताजनक आहे. या सगळ्यांना राजाश्रय देणारे राजकीय नेते जबाबदार आहेत. अशा हिडीस प्रवृत्तीना व प्रकाराना प्रतिबंध का घातला जात नाही? हा सर्वसामान्याना प्रश्न पडतो. अशा प्रकाराना प्रतिबंध न घालता सद्या धूडगूस व गुंडगिरीला राजमान्यता मिळत आहे. असेच होणार असेल तर मग कोण कशालाच व कुणालाच जुमाननार नाही. कोणी विद्यानंद बापट यांनी मुद्देसुद व अभ्यासू मत व्यक्त केल्यानंतर धर्माची ढाल करून त्याच्यावर भ्याड हल्ला करण्याची मजल गेलेली आहे. हा हल्ला करणारे मंडळीनी धर्माच्या नावावर हा लोकोत्सव बदनाम करणारे मंडळीचा समाचार घेण्याची व बंदोबस्त करण्याची नितांत आवश्यकता आहे.परंतु ते करतील असे वाटत नाही. धर्माचा आधार घेऊन कोणी लोकोत्सवाची संस्कृती उसवीत असतील व तरूणाई नासवीत असतील तर त्याचा विचार धर्मरक्षकानी आणि समाजाने केला पाहिजे. पुणे शहरात विद्यानंद बापट यांनी डीजेवर बंदी आणावी असं म्हटल्यावर धर्मवादी व्यक्तीनी त्यांना मारहाण केली. तर काही राजकीय नेत्यांनी डीजे वाजवणारच असा आवाज दिला आहे. उत्सवाचे सध्याचे स्वरुप बदलण्याची आवश्यकता निर्माण झालेली आहे. संस्कृतीरक्षक धर्मरक्षक म्हणविणारे मंडळीनी या लोकोत्सवाचे पावित्र राखायचे की डीजेचे समर्थन करायचे की डीजेला विरोध करायचा हे आता ठरवण्याची वेळ आलेली आहे. सध्या तरी महाराष्ट्रात डीजे विरोधातील समाजाचा आवाज वाढताना दिसत आहे. आता शासन दरबारी राज्याचे कारभारी डीजे विरोधातील भूमिकेला साथ देतात की डीजेला समर्थन देतात हे लवकरच समाजासमोर आल्याशिवाय समाज स्वस्थ बसेल असे वाटत नाही.

## शारदानगरमध्ये खेळांडूचे झाले मोफत प्रवेश, खेळाडूंचा सत्कार

■ बारामती (दै. संध्या)

तालुक्यातील मौजे वढाणे येथे महाबारामती : अ‍ॅग्रीकल्चरल डेव्हलपमेंट ट्रस्ट संचलित शारदाबाई पवार महिला कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, शारदानगर येथे शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या गुणवंत खेळाडूंचा सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ क्रीडा शिष्यवृत्ती जाहीर झाल्याबद्दल सत्कार करण्यात आला.

मल्लखांब क्रीडा प्रकारात महाविद्यालयाची खेळाडू कु. श्रुती संतोष गुळवे हिने अखिल भारतीय आंतरविद्यापीठ स्पर्धेत रौप्यपदक तसेच विद्यापीठाच्या खेलो इंडिया स्पर्धेत सुवर्णपदक प्राप्त केले. तसेच कु. प्रतीक्षा आप्पासो पाटील हिने महाराष्ट्र राज्य आंतरविद्यापीठ क्रीडा महोत्सवातील व्हॉलीबॉल स्पर्धेत सुवर्णपदक प्राप्त केले या उल्लेखनीय कामगिरीबद्दल दोन्ही गुणवंत खेळाडूंचा संस्थेच्या विश्वस्त-सचिव सौ. सुनंदा पवार यांच्या हस्ते शारदा स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स च्या भव्य मल्टीपर्पज हॉलमध्ये सत्कार करण्यात आला. तसेच महाविद्यालयात नव्याने प्रवेश घेतलेल्या राष्ट्रीय स्तरावरील १२ खेळाडूंना महाविद्यालयात मोफत प्रवेश व शिष्यवृत्तीच्या धनादेशांचे वितरण करण्यात आले. याप्रसंगी मा. सौ. सुनंदा पवार यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करताना आपल्या संस्थेतील उपलब्ध अत्याधुनिक क्रीडांगणे, जिम, जलतरणतलाव, सिंथेटिक ट्रॅक, इनडोअर हॉल इ. सोयी-सुविधांचा पुरेपूर वापर करून सातत्यपूर्ण सराव, मेहनत आणि शिस्तीच्या जोरावर क्रीडा क्षेत्रात विद्यार्थी विद्यार्थिनींना आपले नाव उज्ज्वल करा.


तसेच क्रीडा कोट्याअंतर्गत उपलब्ध विविध शासकीय नोकरीच्या संधी व योजनांचा लाभ घेऊन आपल्या उज्ज्वल भविष्यासाठी प्रयत्न करावेत, असे आवाहन त्यांनी केले. या कार्यक्रमास महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. रा. बा. देशमुख, शारीरिक शिक्षण संचालक प्रा. आर. एस. देवकर, क्रीडा समिती सदस्य डॉ. जयवंत राठोड तसेच क्रीडा विभागातील सर्व खेळाडू उपस्थित होते.



## डिंभे-माणिकडोह जोड बोगद्याच्या कामास अखेर स्थगिती

■ कवठे येमाई (दै. संध्या)

शिरूर, आंबेगाव तालुक्यातील शेतकऱ्यांना वरदान ठरलेल्या हुतात्मा बाबू गेनू जलाशय अर्थात डिंभे धरणातून कुकडी पाटबंधारे प्रकल्पाच्या डिंभे-माणिकडोह जोड बोगद्याचे काम हाती घेण्याच्या प्रस्तावास राज्याच्या मंत्रिमंडळाने अखेर स्थगिती दिली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार,तथा माजी मंत्री दिलीप वळसे-पाटील यांनी या प्रस्तावाला तीव्र विरोध केला होता.



जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी ८ जानेवारी २०२५ रोजी झालेल्या बैठकीत डिंभे-माणिकडोह जोड बोगद्याचे काम प्राधान्याने हाती घेण्याच्या दृष्टीने चौथ्या सुधारित सुप्रमा प्रस्तावास मान्यता देण्याच्या सूचना केल्या होत्या. त्यानुसार हा प्रस्ताव मंजूर करण्यात आला होता. मात्र, या निर्णयावर आमदार दिलीप वळसे-पाटील यांनी दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेससोबत जाण्याचा निर्णय घेतला होता.मंत्रिमंडळाच्या बैठकीत हा प्रस्ताव मंजूर झाल्यास आपण आमदार राहणार नसल्याचे वळसे-पाटील यांनी मुख्यमंत्र्यांना सांगितले होते. त्यावर योग्य निर्णय घेण्यात येईल, असे आश्वासन मुख्यमंत्र्यांनी दिले होते.

दरम्यान, मंत्रिमंडळाच्या मंगळवारी झालेल्या बैठकीत मागील आठवड्यातील मंत्रिमंडळ बैठकीचे इतिवृत्त कायम करण्याबाबतचा ठराव आला असता, राष्ट्रवादी काँग्रेसचे मंत्री हसन मुश्रीफ आणि छगन भुजबळ यांनी कुकडी पाटबंधारे प्रकल्पाच्या सुधारित प्रशासकीय मान्यतेचा प्रस्ताव इतिवृत्तात कायम न करता स्थगित ठेवण्याचा आग्रह धरला. त्यावर काही प्रमाणात विरोध करण्याचा प्रयत्न झाला मात्र मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हा ठराव कायम न करण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे कुकडी पाटबंधारे प्रकल्पाच्या डिंभे-माणिकडोह जोड बोगद्याच्या कामाला सध्या स्थगिती मिळाली आहे.

## दि १२ सप्टेंबर २०२६ रोजी राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन

■ जुन्नर (दै. संध्या)

राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण व महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण मुंबई यांच्या निर्देशानुसार जिल्हा न्यायालय व जिल्ह्यातील सर्व तालुका न्यायालयांमध्ये राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन करण्यात आले आहे दि १२ सप्टेंबर २०२६ रोजी जिल्हा व सत्र न्यायालय जुन्नर येथे राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन करण्यात आले आहे जुन्नर तालुक्यातील सर्व नागरिकांना कळविण्यात येते की प्रलंबित प्रकरणांचा लवकरात लवकर आणि सामंजस्याने निपटारा करण्यासाठी राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन करण्यात आले आहे. या लोकअदालतीमध्ये (Pre-litigation) दाखलपूर्व प्रकरणे विज व पाणी बिल देयके बँक कर्ज वसुली प्रकरणे मोटार वाहन अपघात दावे कौटुंबिक वाद मालमत्ता विवाद] कर्मचारी नुकसान भरपाई प्रकरणे व इतर दिवाणी व फौजदारी तडजोड योग्य प्रकरणे या राष्ट्रीय लोकन्यायालयात निकाली काढले जातात लोकअदालतीमध्ये प्रलंबित प्रकरणे निकाली निघाल्यामुळे दोन्ही पक्षांचा विजय होतो झालेल्या निर्णयानुसार न्यायालयीन फिस पक्षकाराला परत मिळते पक्षकारांच्या वेळेची बचत कमी खर्च व त्वरीत न्याय मिळतो. ज्या पक्षकारांना आपली प्रकरणे या लोकअदालतीत ठेवायची आहेत त्यांनी संबंधित न्यायालयाशी किंवा जुन्नर तालुका विधी सेवा समितीशी संपर्क साधावा व शनिवार दि १२ सप्टेंबर २०२६ रोजी जिल्हा व सत्र न्यायालय जुन्नर येथे आयोजित केलेल्या या राष्ट्रीय लोकअदालतीचा लाभ घ्यावा असे आवाहन जिल्हा न्यायाधीश जुन्नर तथा तालुका विधि सेवा समिती जुन्नर चे अध्यक्ष माननीय श्री एस बी शेलार साहेबांनी केले आहे.

## बलात्कार व पॉक्सो प्रकरणातील आरोपीची न्यायालयाकडून निर्दोष मुक्तता

■ शिरूर (दै. संध्या)

शिरूर पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या बलात्कार व पॉक्सो कायद्यांतर्गत गुन्ह्याप्रकरणी आरोपी संतोष रंगनाथ गोफणे (रा. रामवाडी, बोऱ्हाडेवस्ती, पिंपरखेड, ता. शिरूर, जि. पुणे) याची घोडनदी-शिरूर येथील मा. अतिरिक्त सत्र न्यायालयाने निर्दोष मुक्तता केली आहे.



सदर प्रकरणात शिरूर पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ५७६/२०२४ अन्वये भारतीय दंड विधानातील कलमांसह पॉक्सो कायद्यातील कलमांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला होता. या प्रकरणाची सुनावणी विशेष खटला क्रमांक 210/2026 अंतर्गत मा. एन. एस. मोमीन, जिल्हा न्यायाधीश-०८ व अतिरिक्त सत्र न्यायाधीश, घोडनदी-शिरूर, पुणे यांच्या न्यायालयात झाली. न्यायालयाच्या ३ सप्टेंबर २०२६ रोजीच्या न्यायनिर्णयानुसार आरोपीस सदर गुन्ह्यातून दोषमुक्त करण्यात आले. सुनावणीदरम्यान आरोपीतर्फे अ‍ॅड . संजय येवले यांनी काम पाहिले.

## ऊस उत्पादक शेतकऱ्यांना भीमाशंकर कारखान्याचे सभासदत्व द्या

■ कवठे येमाई (दै. संध्या)

शिरूरच्या ४२ गावातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांना भीमाशंकर कारखान्याचे सभासदत्व द्या ही मागणी करीत शिरूर मधील शिष्टमंडळाने साखर आयुक्तांना नुकतेच निवेदन दिले आहे.



भीमाशंकर सहकारी साखर कारखान्याचे सभासदत्व मिळवण्यासाठी शिरूर तालुक्यातील शेतकरी शिष्टमंडळाने राज्याचे साखर आयुक्त डॉ. संजय कोलते यांची भेट घेऊन निवेदन दिले. कारखान्याच्या स्थापनेपासून गेली २७ वर्षे शिरूर तालुक्यातील ४२ गावांतील शेतकरी भीमाशंकर कारखान्याला ऊस देत आहेत. या भागातील ऊस उत्पादकांचे कारखान्याशी असलेले विश्वासाचे नाते, सातत्याने गाळपासाठी दिलेला ऊस तसेच कारखान्याच्या भाग भांडवल साठी घेतलेले शेअर्स या बाबी शेतकऱ्यांनी आयुक्तांच्या निदर्शनास आणून दिल्या.

कारखान्याचे उपविधी व इतर तांत्रिक बाबींसाठी प्राथमिक सहसंचालक, साखर पुणे विभागाचे प्रभारी यांच्याशी चर्चा करून शेतकरी शिष्टमंडळाने निवेदन सादर केले. शेतकऱ्यांसाठी ही भेट अत्यंत महत्त्वाची ठरली.यावेळी शेतकरी संघटनेचे तालुका अध्यक्ष माऊली ढोमे, नरेश ढोमे, रमेश वरे,सामाजिक कार्यकर्ते अविनाश पोकळे, राष्ट्रीय किसान मजदूर महासंघाचे प्रदेश उपाध्यक्ष नितीन थोरात आदी उपस्थित होते.

## अ‍ॅडोब एक्सप्रेस प्रीमियमसह गणेश चतुर्थीच्या प्रत्येक सेलिब्रेशनमध्ये एअरटेलने आणली क्रिएटिव्हिटी

■ -- (दै. संध्या)

गणेश चतुर्थी हा भारतातील सर्वाधिक सोशल असलेल्या सणांपैकी एक बनला आहे. पंडालला दिलेल्या भेटी, घराची सजावट, आरतीचे क्षण, कुटुंबीयांसोबतचे गेट-टुगेदर आणि सणासुदीच्या शुभेच्छांपासून ते विविध क्षण सोशल मीडिया प्लॅटफॉर्म्सवर मोठ्या प्रमाणावर शेअर केले जातात. आज सेलिब्रेशन केवळ प्रत्यक्ष अनुभवण्यापुरते मर्यादित राहिलेले नाही, तर हे क्षण डिजिटल पद्धतीने कॅप्चर, क्रिएट आणि शेअरही केले जातात. कस्टमर-फर्स्ट दृष्टिकोनातून एअरटेल ग्राहकांना बेस्ट-इन-क्लास नेटवर्क एक्सपीरियन्स देण्यापलीकडे जाऊन डिजिटल बेनिफिट्स उपलब्ध करून देत आहे.

यामुळे ग्राहकांना कनेक्टेड राहता येते, क्रिएटिव्ह पद्धतीने स्वतःला एक्स्प्रेस करता येते आणि त्यांच्यासाठी सर्वाधिक महत्त्वाचे असलेले क्षण शेअर करता येतात. या फेस्टिव्ह सीझनमध्ये, एअरटेल ग्राहक अ‍ॅडोब एक्सप्रेस प्रीमियम च्या मदतीने आपल्या सोशल मीडिया सेलिब्रेशनमध्ये क्रिएटिव्ह टच देऊ शकतात. ज्या ग्राहकांनी अद्याप हा बेनिफिट क्लेम केलेला नाही, ते जानेवारी 2027 पर्यंत आपला अ‍ॅडोब एक्सप्रेस प्रीमियम अ‍ॅक्सेस अ‍ॅक्टिव्हेट करू शकतात. प्रीमियम टेम्पलेट्स, एआय-पॉवर्ड क्रिएटिव्ह टूल्स, इमेजेस, फॉन्ट्स आणि डिझाइन अ‍ॅसेट्सच्या अ‍ॅक्सेससह ग्राहक इन्स्टाग्राम, फेसबुक, व्हॉट्सअ‍ॅप आणि इतर सोशल प्लॅटफॉर्म्सवर लक्षवेधी फेस्टिव्ह कंटेंट जलद आणि सहज तयार करू शकतात. या गणेश चतुर्थीला ग्राहक हे करू शकतात: पर्सनलाइज्ड फेस्टिव्ह ग्रीटिंग्स तयार करा — नेहमीचे जनरिक फॉरवर्ड्स पाठवण्याऐवजी अधिक पर्सनल शुभेच्छा देऊन प्रत्येक शुभेच्छा अधिक अर्थपूर्ण बनवा. इन्स्टाग्राम स्टोरीज आणि रील्स डिझाइन करा — गणपतीची सजावट, आरतीचे सेलिब्रेशन्स आणि कुटुंबीयांसोबतचे खास मोमेंट्स आकर्षक पद्धतीने शोकेस करा. आय-कॅचिंग डिजिटल इन्व्हाइट्स तयार करा — कम्युनिटी इव्हेंट्स, सोसायटी सेलिब्रेशन्स आणि फेस्टिव्ह गॅदरिंग्ससाठी आकर्षक डिजिटल इन्व्हाइट्स तयार करा. दर्शनाचे मोमेंट्स शेअर-योग्य पोस्ट्समध्ये रूपांतरित करा — क्रिएटिव्ह एडिट्स, इफेक्ट्स आणि फेस्टिव्ह थीम्सच्या मदतीने दर्शनाचे क्षण अधिक आकर्षक बनवा. हायलाइट व्हिडिओज आणि मेमरी रील्स तयार करा — गणपती स्थापनेपासून विसर्जनापर्यंतचा संपूर्ण प्रवास खास आठवणींच्या रूपात कॅप्चर करा.

## रात्रीच्या चढाईत ध्रुवाने सर केले कळसूबाई शिखर

■ नारायणगाव (दै. संध्या)

जुन्नर तालुक्यातील वडगाव आनंद येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील इयत्ता चौथी मधील मधील कु.ध्रुवा आकाश काशिकेदार याने महाराष्ट्रातील सर्वोच्च कळसूबाई शिखर रात्रीच्या वेळी विक्रमी वेळेत सर करून अनोखा विक्रम प्रस्थापित केला आहे. विशेष म्हणजे शिखर सर केल्यानंतर त्याच मार्गाने खाली उतरून त्याने हे धाडसी आव्हान पूर्ण केले.



अत्यंत लहान वयात कळसूबाईसारखे अवघड शिखर रात्रीच्या वेळी सर करणारा ध्रुवा हा शाळेचा आणि गावाचा अभिमान ठरला आहे. हे आव्हान पूर्ण करताना त्याला अनेक नैसर्गिक अडचणींचा सामना करावा लागला. चोहोबाजूचा काळाकुट्ट अंधार, दाट धुके, सोसाट्याचा वारा, पावसाच्या सरी तसेच पावसामुळे निसरड्या झालेल्या तीव्र चढणीच्या पायवाटा आणि दोन्ही बाजूंना असलेल्या खोल दऱ्या अशा प्रतिकूल परिस्थितीतही ध्रुवाने आपला आत्मविश्वास आणि जिद्द कायम ठेवली. विशेष म्हणजे त्याने कोणत्याही गाईडशिवाय मनाशी पक्का केलेला निर्धार पूर्ण केला. संकटसमयी न घाबरता योग्य निर्णय घेत त्याने शिखर गाठले आणि यशस्वीपणे खाली उतरला. त्याच्या या साहसी कामगिरीतून लहान वयातही जिद्द, आत्मविश्वास, चिकाटी आणि ध्येय निश्चिती असेल तर कोणतेही आव्हान पेलता येते, हे सिद्ध झाले आहे. ध्रुवाच्या या यशामागे त्याच्या पालकांसह शिक्षक, मार्गदर्शक आणि मानसिक जडणघडणीत योगदान देणाऱ्या सर्वांचे मोलाचे योगदान आहे. त्याच्या धाडसी कामगिरीबद्दल वडगाव आनंद परिसरातून त्याच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत असून, त्याच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या

## तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय व योद्धा प्रॉडक्शनमध्ये सामंजस्य करार संपन्न

■ बारामती (दै. संध्या)

अनेकांत एज्युकेशन सोसायटीचे तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती आणि योद्धा प्रॉडक्शन, बारामती यांच्यात विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देणे, कला व सांस्कृतिक क्षेत्रातील कौशल्य विकासाला चालना देणे तसेच विद्यार्थ्यांना वेगळे व्यासपीठ व संधी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने सामंजस्य करार (MoU) संपन्न झाला.




या सामंजस्य कराराच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना अभिनय, नाट्य, लघुपट व चित्रपट निर्मिती, नाट्यदिग्दर्शन, लेखन, नृत्य, संगीत तसेच विविध कला क्षेत्रांमध्ये प्रशिक्षण व मार्गदर्शन मिळणार आहे. तसेच कार्यशाळा, प्रशिक्षण शिबीरे, सांस्कृतिक उपक्रम, ऑडिशन व प्रत्यक्ष प्रकल्पांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना कला क्षेत्रातील अनुभव घेण्याची संधी उपलब्ध होणार आहे.महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.अविनाश जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात येत असून, महाविद्यालयाच्या सांस्कृतिक विभागाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या कलागुणांना योग्य दिशा देण्यासाठी विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. या सामंजस्य करारामुळे विद्यार्थ्यांना शिक्षणासोबतच कला व मनोरंजन क्षेत्रातील व्यावसायिक संधींची ओळख होऊन त्यांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकासास निश्चितच चालना मिळेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे-४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे – ४११००२ येथे प्रसिद्ध केले. संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०-२४४७९२९२)
Daily “Sandhya” News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

# ४२ वर्षांनंतर पुन्हा एकत्र आले दहावीचे विद्यार्थी

■ नारायणगाव (दै. संध्या)



कमलजादेवी विद्यालय, कळंब येथील सन १९८३-८४ च्या दहावीच्या बॅचचा तब्बल ४२ वर्षांनंतर गेट-टुगेदर कार्यक्रम मंगळवार, दि. ८ सप्टेंबर रोजी उत्साहात पार पडला. यावेळी या बॅचच्या विद्यार्थ्यांना अध्यापन करणाऱ्या शिक्षिका श्रीमती शोभना केशव खडके यांचा ७७ वा वाढदिवसही मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाला बॅचचे सुमारे ४० माजी विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला माजी विद्यार्थ्यांनी शिक्षिका शोभना खडके यांचे पुष्पवर्षाव करून स्वागत केले. त्यानंतर साडी, शाल व श्रीफळ देऊन पंचारतीने त्यांचे औक्षण करण्यात आले. सर्व माजी विद्यार्थ्यांनी केक कापून आनंद साजरा केला. सत्काराला उत्तर देताना श्रीमती शोभना खडके भावुक झाल्या. आपल्या ३६ वर्षांच्या प्रदीर्घ सेवेत तब्बल ३२ वर्षे कळंब येथील शाळेत सेवा केल्याचे त्यांनी सांगितले. या काळात जवळपास दोन पिढ्यांना अध्यापन करण्याची संधी मिळाल्याच्या आठवणी त्यांनी सांगितल्या. जुन्या विद्यार्थ्यांच्या आठवणींना उजाळा देताना त्यांना अश्रू अनावर झाले. यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना त्यांनी, "कुणाला त्रास देऊ नका, कोणालाही दुखावू नका आणि आपल्यामुळे दुसऱ्यांच्या डोळ्यात पाणी येईल असे वागू नका," असा भावनिक संदेश दिला. तसेच जीवनातील दोन महत्त्वाचे कानमंत्र देताना "कुणाला उसने पैसे देऊ नका आणि कुणासाठीही जामीन राहू नका," असा सल्लाही त्यांनी दिला.यावेळी त्यांच्यासोबत आलेल्या शैला कोरडे यांचाही पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी ॲडव्होकेट अर्जुन भालेराव, खंडू चव्हाण, रत्ना थोरात(बँकर), सुरेश थोरात(फौजी), उल्हास थोरात, अनिल थोरात, सुनीता काकडे, प्रतिभा लोखंडे, आशाबी इनामदार, व इंजि. संतोष दुगड यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

---

**कार्यकारी अभियंता,**
सार्वजनिक बांधकाम (पूर्व) विभाग, पुणे
'बी' बॅरक मध्यवर्ती इमारत परिसर, कॅम्प पुणे.१

e-mail:- easttenderpune@gmail.com | दुरध्वनी क्र.- (०२०)-२६१२२४५७

## ई-निविदा सूचना क्रमांक ४२ सन २०२६-२०२७

कार्यकारी अभियंता, पुणे सार्वजनिक बांधकाम (पुर्व) विभाग, पुणे ४११००१ (दुरध्वनी क्रमांक ०२०-२६१२२४५७) हे महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय क्रमांक सीएटी/२०१७/प्र. क्र. ०८/इमा-२, दिनांक २७/९/२०१८ व शासन सा.बां. विभाग, मंत्रालय मुंबई यांचे परिपत्रक क्र. सीएटी/२०१७/प्र. क्र. ८/इमा-२, दिनांक २२/१०/२०१८ अन्वये नोंदणीकृत आणि निविदेमधील दिलेल्या पात्रता पुर्ण करत असलेल्या कंत्राटदारांकडून खालील कामांसाठी बी-१ नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाच्या संकेतस्थळ https://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यांत यावीत. निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (पुर्व) विभाग, पुणे १ यांनी राखून ठेवलेला आहे. तसेच अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजित रक्कम रुपये | अंदाजित रक्कम रुपये (अक्षरात) |
|---|---|---|---|
| १ | मौजे चव्हाणवाडी (भिल्लवस्ती राजापूर) ते करडे रस्ता सुधारणा करणे ग्रा. मा. ३०८ तालुका शिरूर जिल्हा पुणे. | ८४,०६,७५५/- | रुपये चौऱ्याऐंशी लाख सहा हजार सातशे पंचावन फक्त |
| २ | रा.मा. ७५३ एफ (सणसवाडी) ते फराटे वस्ती ते तळेगाव ढमढेरे रस्ता सुधारणा करणे ग्रा. मा. २८ तालुका शिरूर जिल्हा पुणे. | ६२,८०,१३३/- | रुपये बासष्ठ लाख ऐंशी हजार एकशे तेतीस फक्त |

टिप - वरील निविदेत एकूण ०२ काम समाविष्ट असून या निविदेवरील संपुर्ण माहिती खालीप्रमाणे संकेतस्थळावर दि.१४/०९/२०२६ पासून उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

1. web - www.mahapwd.gov.in (फक्त निविदा सुचना)
2. https://mahatenders.gov.in (निविदा सुचना व निविदा कागदपत्रे)

(सदर निविदा सुचनेमध्ये काही बदल होत असल्यास त्याबाबतची शुध्दीपत्रके वरील वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात येतील.)
कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम (पुर्व) विभाग, पुणे-४११००१.

सही/-
कार्यकारी अभियंता
सार्वजनिक बांधकाम (पुर्व) विभाग,
पुणे-४११००१.

विमाका/पुणे/जाहिरात/१५३/२०२६-२७

---

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६
- मंजूर एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीमधील विनियम क्र.३.८.२ व विनियम क्र.१४.१.१.९ या विनियमामध्ये सुधारणा करणेसाठी म. प्रा. नि. व न. र. अधिनियम, १९६६ चे कलम २०(३) व ३७ (१कक) (क) अन्वये सूचना.
- उक्त अधिनियमाचे कलम १५४ (१) खालील निदेश.

सूचना
महाराष्ट्र शासन
नगर विकास विभाग
४ था मजला, मुख्य इमारत, मंत्रालय,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मुंबई-४०० ०३२.
दिनांक : १२.०८.२०२६

*महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६*
क्र. टिपीएस-१८२६/३७/प्र.क्र.११/२०२६/कलम २० (३) / कलम ३७ (१कक) (क) / कलम १५४/नवि-१३,:-

ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने राज्यातील बृहन्मुंबई महानगरपालिका, व काही नियोजन प्राधिकरणे वगळता उर्वरित सर्व नियोजन प्राधिकरणे व प्रादेशिक योजना क्षेत्रांकरीता लागु करावयाच्या एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीस (यापुढे जिचा उल्लेख "उक्त नियमावली" असा करण्यात आलेला आहे) महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ (यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त अधिनियम" असा करण्यात आलेला आहे) मधील तरतुदीनुसार, शासन अधिसूचना क्र. टिपीएस-१८१८/प्र.क्र.२३६/१८/वियो. व प्रायो./कलम ३७ (१कक) (ग) व कलम २०(४)/नवि-१३, दि.०२/१२/२०२० अन्वये मंजुरी दिली असून उक्त नियमावली दि.०३.१२.२०२० पासून अंमलात आली आहे;

ज्याअर्थी, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ (महाराष्ट्र अधिनियम क्र. XXXVII of १९६६) च्या तरतुदीनुसार राज्यातील स्थानिक नियोजन प्राधिकरणांकरीता एकत्रित विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली, २०२० (Unified Development Control and Promotion Regulations, 2020 UDCPR-2020) अधिसूचित करण्यात आलेली असून, सदर नियमावलीमधील विनियम क्र.३.८ अंतर्गत "Provision for Inclusive Housing" बाबत तरतुदी करण्यात आलेल्या आहेत;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण (म्हाडा) यांनी दि.०२.०१.२०२५ रोजीचे पत्रान्वये उक्त नियमावलीमध्ये विनियम क्र. ३.८.२ ची अंमलबजावणी होण्याच्या दृष्टीने काही मुद्यांबाबत नियोजन प्राधिकरणास स्पष्टीकरणात्मक सूचना देण्याबाबत शासनास विनंती केलेली आहे:

आणि ज्याअर्थी, नाशिक महानगरपालिकेने देखील उक्त नियमावलीमधील विनियम क्र.३.८.२ ची प्रक्रियेमधील विविध टप्यांच्या अनुषंगाने कार्यपध्दतीबाबत दि.०९.०१.२०२५ व दि.१५.०७.२०२५ रोजीच्या पत्रान्वये शासनास स्पष्टीकरण मिळणेबाबत विनंती केलेली आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त नियमावलीमधील विनियम क्र. ३.८.२ नुसार EWS/LIG घटकांकरिता विकासाची अंमलबजावणी प्रभावी पध्दतीने करण्याच्या अनुषंगाने मा. लोकप्रतिनिधी यांचेकडून वेळोवेळी शासनास मागणी करण्यात आलेली आहे;

आणि ज्याअर्थी, सदर विनियमाची अंमलबजावणी करताना विविध महानगरपालिका, नगरपालिका व इतर स्थानिक नियोजन प्राधिकरणांकडून उक्त नियमावलीमधील तरतुदींची अंमलबजावणी करतांना येणाऱ्या अडचणी व उपरोक्त सर्व बाबी विचारात घेता, सोबतच्या "परिशिष्ट-अ" मध्ये दर्शविल्याप्रमाणे एकत्रित विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली, २०२० मधील विद्यमान विनियम क्र.३.८.२ आणि विनियम क्र.१४.१.१.९ मध्ये सुधारणा करणे सार्वजनिक हिताचे व आवश्यक असल्याचे शासनाचे मत झाले आहे;

आता त्याअर्थी, उक्त अधिनियमाचे कलम २०(३) व कलम ३७ (१कक) (क) अन्वये प्राप्त अधिकारात आणि तनुषंगिक शक्तींचा वापर करुन, सोबतच्या "परिशिष्ट-अ" मध्ये दर्शविल्याप्रमाणे उक्त फेरबदलावर जनतेकडून सूचना / हरकती मागविण्यासाठी शासन ही सूचना प्रसिध्द करीत आहे. उक्त फेरबदलावरील कोणत्याही सूचना / हरकती, ही सूचना महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिध्द झाल्यापासून एक महिन्याच्या आत, संबंधित विभागीय सहसंचालक, नगर रचना यांचेकडे दाखल करता येतील. विभागीय सहसंचालक, नगर रचना यांना प्राप्त सूचना / हरकतींवर सुनावणी देऊन आणि आवश्यकतेनुसार संबंधित नियोजन प्राधिकरणांचे म्हणणे घेऊन, त्यावरील अहवाल शासनास सादर करण्यासाठी शासनातर्फे "अधिकारी" म्हणून प्राधिकृत करण्यात येत आहे. (यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त अधिकारी" असा करण्यात येत आहे);

तसेच, शासन याद्वारे उक्त अधिनियमाचे कलम १५४ (१) अन्वये नव्याने निदेश देत आहे की, उक्त अधिनियमाचे कलम २०(४) आणि कलम ३७ (१कक) चे उपकलम (ग) अन्वये प्रस्तावित फेरबदलास शासनाची अंतिम मान्यता प्रलंबित असेपर्यंत, प्रस्तावित फेरबदल व त्यामधील तरतुदी राज्यातील सर्व नियोजन प्राधिकरणे क्षेत्राकरिता लगोलग अंमलात येतील.

ही सूचना / निदेश शासनाचे संकेतस्थळ www.maharashtra.gov.in (कायदे / नियम) वर उपलब्ध राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नांवाने,

शिक्का

सही/-
(प्रणव कर्पे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

विमाका/पुणे/जाहि./१४७/२०२६-२७

---

# पंचायत समिती हवेली

## जाहीर बी- १ निविदा सूचना क्र. ४/ २०२६-२७

पंचायत समिती हवेली ता. हवेली जि. पुणे यांचे वतीने गटविकास अधिकारी (नि.श्रे.) पंचायत समिती हवेली यांचे तर्फे खालील कामाचे नावा समोर नमूद केल्याप्रमाणे पुणे जिल्हा परिषदेकडील योग्य त्या कंत्राटदाराकडून खालील स.क. 20% जि.प. निधी व 15वा वित्त आयोग पं.स. स्तर नमूद कामांच्या सीलबंद निविदा दोन लिफाफा पध्दतीने मागविण्यात येत आहेत. कोऱ्या निविदेचा नमुना उप अभियंता बांधकाम हवेली निविदा शाखा यांच्या कार्यालयातून दिनांक ११/०९/२०२६ ते दिनांक २३/०९/२०२६ पर्यंत (सुट्टीचे दिवस सोडून) सायंकाळी ३.०० वाजेपर्यंत देणेत येतील. सीलबंद निविदा भरलेल्या निविदा पंचायत समिती हवेली ता. हवेली जि. पुणे येथे दिनांक २३/०९/२०२६ रोजी सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत स्वीकारणेत येतील. शक्य झाल्यास त्याच दिवशी किंवा त्यानंतर कार्यालयीन सोईच्या दिवशी सक्षम समिती समोर उघडण्यात येतील.

| अ. क्रं. | कामाचे नाव | निविदा रक्कम रु. | निविदा फॉर्म फी | इसारा रक्कम रु. | एकूण अनामत रक्कम | कामाची मुदत (महिने) | आवश्यक कंत्राटदार वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | मौजे थेऊर भीमनगर समाजमंदिर सुधारणा. | ८४४८८१/- (GST वगळून) | ५९०/- | ८४४९/- | १६८९८/- | ३ महिने | पात्र नियमित |
| २ | सोरतापवाडी माळवाडी रस्ता काँक्रीटीकरण करणे. | ८,४५,५०७/- (GST वगळून) | ५९०/- | सुट | १६९१०/- | ३ महिने | मजूर सह.संस्था |
| ३ | ऊरळीकांचन नारायणनगर रस्ता काँक्रीट करणे. | ८,४५,४७८ (GST वगळून) | ५९०/- | सुट | १६९१०/- | ३ महिने | सुशिक्षित बेरोजगार |
| ४ | ऊरळीकांचन लोखंडेनगर जिजाऊ परिसर रस्ता काँक्रीट करणे. | ८,४४,६८८/- (GST वगळून) | ५९०/- | ८४४७/- | १६८९४/- | ३ महिने | पात्र नियमित |
| ५ | ऊरळीकांचन वॉर्ड क्र.५ अंतर्गत (पुरुषवाणी बिल्डींग) पेव्हिंग ब्लॉक बसविणे. | ८,४६,००७/- (GST वगळून) | ५९०/- | ८४६०/- | १६९२०/- | ३ महिने | पात्र नियमित |
| ६ | शिंदवणे गावठाण अंतर्गत रस्ता काँक्री. करणे. | ८,४५,०४५/- (GST वगळून) | ५९०/- | सुट | १६९००/- | ३ महिने | सुशिक्षित बेरोजगार |
| ७ | वळती आण्णाभाऊ साठे नगर अंतर्गत रस्ता करणे. | ८,४५,३०३/- (GST वगळून) | ५९०/- | सुट | १६९०६/- | ३ महिने | मजूर सह.संस्था |
| ८ | रहाटवडे ग्रामपंचायत अंतर्गत रस्ता करणे. | ४२१७७१ (GST वगळून) | ५९०/- | सुट | ८४३६/- | ३ महिने | सुशिक्षित बेरोजगार |
| ९ | मोजे तरडे खालचे भूमिगत गटर करणे. | ४२३३९७/- (GST वगळून) | ५९०/- | ४२३४/- | ८४६८/- | ३ महिने | पात्र नियमित |
| १० | मौजे ऊरळीकांचन पाटील वस्ती येथे भूमिगत गटर करणे. | ८४३३९३/- (GST वगळून) | ५९०/- | सुट | १६८६८/- | ३ महिने | मजूर सह.संस्था |
| ११ | शिवापूर रंधवे पारवेवस्ती भुमिगत गटर करणे. | ८४६०४१/- (GST वगळून) | ५९०/- | सुट | १६९२०/- | ३ महिने | सुशिक्षित बेरोजगार |

### निविदेच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे

1) कोऱ्या निविदा संचासाठी अर्जा सोबत उपरोक्त कामांचे नांवा समोर नमूद केल्या प्रमाणे योग्य त्यावर्गाचे नोंदणी प्रमाणपत्र मूळ प्रती दाखविल्या नंतर त्यांना कोरे निविदा संचासाठी भरणा चलन तयार करुन देण्यात येईल.

2) कोऱ्या बी 1 नमुन्याची रक्कम रोख स्वरुपात चलनाने पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक शाखा जि.प.पुणे ग.वि.अ. पं.स.हवेली खाते क्र. 029001700023/001 यांचे खात्यावर चलन भरुन दाखविल्यास निविदा उपलब्ध होतील.

3) सिलबंद निविदेच्या लिफाफा क्र. 1 मध्ये खालील प्रमाणे कागदपत्राच्या सत्यप्रती सादर कराव्या लागतील.
   अ) जि.प.कडील कंत्राटदार नोंदणी प्रमाणपत्र
   आ) निविदा फॉर्म फी भरणा चलनाची प्रत
   इ) इसारा रकमेचा पुणे येथे देय होणारा ग.वि.अ. पं.स. हवेली खाते क्र. 029001700023/001 नावाने धनाकर्ष डीडी. (D.D.) काढणेत यावा.

ई) पॅनकार्ड व जीएसटी प्रमाणपत्र (टिप- उपरोक्त कागदपत्रां पैकी एकही कागदपत्र सादर केलेले नसल्यास सदर ठेकेदाराची निविदा बाद करणेत येईल व लिफाफा क्र. 02 उघडणेत येणार नाही. तसेच कोणतेही कागदपत्र सादर करणेस कोणतीही वाढीव मुदत अथवा सवलत दिली जाणार नाही. तसेच निविदा दर सादर करताना जीएसटीचा विचार करुन निविदा दर सादर करावी)

4) सिलबंद निविदेच्या लिफाफा क्र. 2 मध्ये प्रत्येक पानावर ठेकेदाराचा स्वतःचा सही व शिक्का असलेला तसेच दर अंकी व अक्षरी लिहीलेला व खात्याने साक्षांकित करुन दिलेला निविदा फॉर्म सादर करावा.

5) पात्र निविदाधारकांकडून विहीत सुरक्षा अनामत रक्कमही कामाचा करारनामा करते वेळी गट विकास अधिकारी (नि.श्रे.) पंचायत समिती हवेली जि.पुणे यांचे नावे ठेवपावती स्वरुपात/चलनाने रोख स्वरुपात घेतली जाईल व उर्वरित अनामत रक्कम प्रथम देयकातून कपात केली जाईल.

6) निविदाधारकाचा देकार निविदाधीन कामाच्या किंमतीपेक्षा 1% पेक्षा कमी असल्यास अतिरिक्त सुरक्षा अनामत भरणेची आवश्यकता नाही.

7) निविदा धारकाचा देकार निविदाधीन कामाच्या किमतीपेक्षा 1.01 ते 10% पर्यंत कमी दराचा असेल तर ठेकेदाराने निविदाधीन कामाच्या किमतीच्या १% एवढ्या रकमेचा पुणे येथे देय असलेल्या ग.वि.अ. पं.स. हवेली खाते क्र. 029001700023/001 नावाने काढलेला निविदा प्रसिध्दीच्या दिनांकाच्या तारखेचा धनाकर्ष डीडी. (Demand Draft) परफॉर्रमस सिक्यूरिटी म्हणून लिफाफा क्र. 2 मध्ये सादर करावा. निविदादेकार 1% पर्यंत कमी असलेस अतिरिक्त सुरक्षा अनामत भरणेची आवश्यकता नाही. (उदा. 1 ते 10% पर्यंत कमी दर 1 टक्के रक्कम )

8) निविदा धारकाचा देकार निविदाधीन कामाच्या किमतीपेक्षा 10% पेक्षा जास्त दराने कमी दराचा असेल तर देकार 10% पेक्षा जेवढया जास्त दराने कमी आहे तेवढया रकमेचा वरील (4) प्रमाणे येणाऱ्या रकमेसह हवेली येथे देय असलेला ग.वि.अ. पं.स. हवेली खाते क्र. 029001700023/001 नावाने काढलेला धनाकर्ष डीडी. (Demand Draft) परफॉरमंस सिक्यूरिटी म्हणून लिफाफा क्र. 2 मध्ये सादर करावा. (उदा. 10% पर्यंत कमीदर 1% व (10% ते 15% कमी दरा प्रति टक्का 1% दराने) 5% असे एकूण 6% रक्कम )

9) निविदा देकार अंदाजपत्रकीय दरापेक्षा 15% पेक्षा कमी असलेस देकार 15% पेक्षा जेवढ्या जास्त दराने कमी आहे त्याच्या दोन पटीन वरील (5) प्रमाणे येणाऱ्या रकमेसह हवेली येथे देय असलेला ग.वि.अ. पं.स. हवेली खाते क्र. 029001700023/001 नावाने काढलेला धनाकर्ष डीडी. (Demand Draft) परफॉर्मस सिक्यूरिटी म्हणून लिफाफा क्र. 2 मध्ये सादर करावा. (15% पर्यंत कमी एकूण 6% रक्कम व 19% पर्यंत कमीदर (19% -15) 4% * 2 = 8 %) असे एकूण 14% रक्कम सदर डी.डी. सादर केला नसलेस निविदा अवैध ठरविणेत येईल.

10) निविदा प्रपत्रातील व निविदा नोटीस मधील सर्व अटी व शर्ती कंत्राटदारावर बंधनकारक राहतील. तसेच प्राप्त निविदापैकी कोणतीही निविदा अथवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता फेटाळण्याचा अधिकार निम्नस्वाक्षरीत यांनी राखून ठेवला असून निविदा पाठविणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला / संस्थेला निविदा फेटाळल्या वददल स्पष्टीकरण मागता येणार नाही.

सही/-
गट विकास अधिकारी (नि.श्रे.)
पंचायत समिती हवेली जि. पुणे

# मराठी चित्रपट पुरस्कार सोहळा संपन्न

■ पं. हृदयनाथ मंगेशकर यांना चित्रपती व्ही. शांताराम जीवनगौरव पुरस्कार

■ प्रसाद ओक यांना चित्रपती व्ही. शांताराम विशेष योगदान पुरस्कार

■ ज्येष्ठ लेखक, अभिनेते व निर्माते सलीम खान यांना राज कपूर जीवनगौरव पुरस्कार;

■ राणी मुखर्जी यांना राज कपूर विशेष योगदान पुरस्कार

■ मराठी चित्रपटांसाठी स्वतंत्र चित्रपटगृहे उभारण्याचा राज्य सरकारचा मानस — मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस




■ मुंबई (दै. संध्या)

मराठी चित्रपटसृष्टीला प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने सांस्कृतिक कार्य विभाग, महाराष्ट्र शासनाच्या वतीने आयोजित ६२ वा महाराष्ट्र राज्य मराठी चित्रपट पुरस्कार सोहळा बुधवारी मुंबईतील रवींद्र नाट्य मंदिर येथे उत्साहात संपन्न झाला. या सोहळ्यात विविध श्रेणीतील महाराष्ट्र राज्य मराठी चित्रपट पुरस्कारांसह चित्रपती व्ही. शांताराम जीवनगौरव पुरस्कार, चित्रपती व्ही. शांताराम विशेष योगदान पुरस्कार, राज कपूर जीवनगौरव पुरस्कार आणि राज कपूर विशेष योगदान पुरस्कार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. भारतीय संगीत क्षेत्रातील ज्येष्ठ संगीतकार, संगीत दिग्दर्शक आणि गायक पं. हृदयनाथ मंगेशकर यांना चित्रपती व्ही. शांताराम जीवनगौरव पुरस्काराने गौरविण्यात आले. अभिनेता-दिग्दर्शक प्रसाद ओक यांना चित्रपती व्ही. शांताराम विशेष योगदान पुरस्कार प्रदान करण्यात आला. ज्येष्ठ पटकथालेखक, अभिनेते व निर्माते सलीम खान यांच्यावतीने त्यांच्या पत्नी हेलन यांनी राज कपूर जीवनगौरव पुरस्कार स्वीकारला, तर अभिनेत्री डॉ. राणी मुखर्जी यांना राज कपूर विशेष योगदान पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. सन २०२४ मध्ये प्रदर्शित झालेल्या मराठी चित्रपटांतील उल्लेखनीय कलात्मक कामगिरी आणि योगदानाची दखल घेत विविध श्रेणींमध्ये ६२ व्या महाराष्ट्र राज्य मराठी चित्रपट पुरस्कारांची घोषणा करण्यात आली. सांस्कृतिक कार्य विभाग आणि महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी व सांस्कृतिक विकास महामंडळाच्या वतीने या पुरस्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. ६२ व्या महाराष्ट्र राज्य मराठी चित्रपट पुरस्कारांमध्ये 'स्वरगंधर्व सुधीर फडके' आणि 'फुलवंती' या चित्रपटांतील अभिनयासाठी सुनील बर्वे आणि गश्मीर महाजनी यांना सर्वोत्कृष्ट अभिनेता पुरस्कार विभागून देण्यात आला. 'छबिला' या चित्रपटासाठी स्वाती गोतावळे यांना सर्वोत्कृष्ट अभिनेत्री पुरस्कार मिळाला. 'छबिला' या चित्रपटाने सर्वोत्कृष्ट चित्रपटाचा पुरस्कार पटकावला. 'घरत गणपती' हा प्रथम उपविजेता, तर 'नाच गं घुमा' हा द्वितीय उपविजेता ठरला. या सोहळ्यास सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार, महाराष्ट्र विधान परिषदेचे सभापती सचिन अहिर, सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी, महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी व सांस्कृतिक विकास महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक स्वाती म्हसे पाटील, पुरस्कारप्राप्त कलाकार तसेच चित्रपटसृष्टीतील अनेक मान्यवर उपस्थित होते. या सोहळ्यात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या जीवनकार्यावर आधारित 'खंजिरीचे बोल' या चरित्रपटाच्या मोशन पोस्टरचे अनावरणही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले. अभिनेता-दिग्दर्शक प्रसाद ओक या चित्रपटात प्रमुख भूमिकेत आहेत. महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी व सांस्कृतिक विकास महामंडळाच्या माध्यमातून या चरित्रपटाची निर्मिती करण्यात येत आहे.

पुरस्कारप्राप्त मान्यवरांचे अभिनंदन करताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांच्या भारतीय चित्रपटसृष्टीतील योगदानाचा गौरव केला. प्रत्येक पुरस्कारप्राप्त व्यक्तीच्या प्रदीर्घ आणि उल्लेखनीय कारकिर्दीचा विशेष उल्लेख करत त्यांनी मराठी चित्रपटसृष्टीच्या विकासासाठी राज्य सरकारच्या विविध उपक्रमांची माहिती दिली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, "मराठी चित्रपटांसाठी स्वतंत्र चित्रपटगृहे उभारण्याचा राज्य सरकारचा विचार आहे. याबाबतचा प्रस्ताव सध्या तयार करण्यात येत असून लवकरच त्याची घोषणा करण्यात येईल. आशय आणि दर्जाच्या बाबतीत मराठी चित्रपटसृष्टीने सातत्याने आपली वेगळी ओळख निर्माण केली असून प्रेक्षकांकडूनही मराठी चित्रपटांना कायमच मोठा प्रतिसाद मिळतो." सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार यांनी ६२ व्या महाराष्ट्र राज्य मराठी चित्रपट पुरस्कारातील सर्व पुरस्कारप्राप्त कलाकारांचे अभिनंदन केले. ते म्हणाले, "महाराष्ट्रात निर्माण होणाऱ्या चित्रपटांना व्यापक प्रेक्षकवर्ग मिळवून देण्यासाठी तसेच राज्यातील चित्रपट निर्मितीचे परिसंस्था अधिक सक्षम करण्यासाठी सांस्कृतिक कार्य विभाग सातत्याने प्रयत्नशील आहे. एन. डी. स्टुडिओ, फिल्मसिटी, कोल्हापूर येथे चित्रपटांच्या चित्रीकरणासाठी उपलब्ध सुविधा तसेच रामटेक येथे नव्याने विकसित करण्यात आलेल्या सुविधांच्या माध्यमातून चित्रपटसृष्टीसाठी उपलब्ध संधी आणि पायाभूत सुविधा सातत्याने वाढविण्यात येत आहेत."

## 'एक पेड माँ के नाम' अभियानातून शिवनगर विद्या प्रसारक मंडळात लक्ष्मी तरू लागवडीचा संदेश



■ बारामती (दै. संध्या)

भारत सरकारच्या पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालयाच्या मार्गदर्शनानुसार देशभरात 'एक पेड माँ के नाम' हा महत्त्वाकांक्षी वृक्षलागवड उपक्रम राबविण्यात येत आहे. या अभियानाच्या माध्यमातून शाळा, महाविद्यालये, ग्रामपंचायती, नगरपालिका, महानगरपालिका तसेच विविध शासकीय व निमशासकीय संस्थांच्या सहभागातून मोठ्या प्रमाणावर वृक्षलागवड केली जात आहे.

या अभियानांतर्गत २०२५ मध्ये तब्बल ६६ हजार वृक्षांचे वाटप व लागवड पूर्ण झाली असून, २०२६ मध्ये १० लाख वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. पर्यावरण संवर्धनाबरोबरच भविष्यातील पिढ्यांसाठी हरित व शाश्वत पर्यावरण निर्माण करण्याच्या दृष्टीने हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरत आहे. याच उपक्रमाच्या अनुषंगाने शाश्वत विकास फाउंडेशन व आर्ट ऑफ लिव्हिंग, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने श्री. प्रभाकर जगताप व श्री. राहुल चव्हाण यांनी बारामती येथील शिवनगर विद्या प्रसारक मंडळ, माळेगाव बुद्रुक येथे भेट देऊन 'लक्ष्मी तरू' वृक्षाबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. लक्ष्मी तरू (Simarouba glauca) हा तेलबिया, बहुउपयोगी व औषधी गुणधर्म असलेला वृक्ष म्हणून ओळखला जातो. या वृक्षाच्या बियांपासून तेल तसेच जैवइंधन आणि विविध सौंदर्यप्रसाधने तयार करता येतात. त्यामुळे पर्यावरण संवर्धनासोबतच शेतकरी व ग्रामीण अर्थव्यवस्थेला या वृक्षामुळे भविष्यात आर्थिकदृष्ट्याही हातभार लागू शकतो, अशी माहिती यावेळी देण्यात आली. त्याच्या औषधी उपयोगांबाबतही मार्गदर्शन करण्यात आले.

यावेळी कृषिभूषण प्रल्हाद वरे, सदस्य – मा. खा. शरदचंद्रजी पवार शिष्यवृत्ती योजना समिती, ॲड. राजेंद्र काटे, श्री. रोहन देवकाते (विश्वस्त, शिवनगर विद्या प्रसारक मंडळ, शिवनगर), श्री. धनंजय ठोंबरे (सचिव, SVPM), डॉ. शैलेंद्र मुकणे, डॉ. संदीप शहा, प्रा. पुरुषोत्तम पवार, श्री. अमोल देवकाते, श्री. उमेश जगताप, श्री. मधुकर फाळके, श्री. राजेंद्र वरे, श्री. आबासो गाडे, श्री. भाऊसाहेब वायकर आदी मान्यवर उपस्थित होते.

वृक्ष हे केवळ निसर्गाचे सौंदर्य वाढविणारे घटक नसून मानवाच्या जीवनाचा आधार आहेत. वाढते तापमान, बदलते हवामान, पाण्याची टंचाई आणि पर्यावरणाचा ऱ्हास या पार्श्वभूमीवर मोठ्या प्रमाणावर वृक्षलागवड व वृक्षसंवर्धन करणे ही काळाची गरज आहे. 'एक पेड माँ के नाम' या भावनिक आणि पर्यावरणपूरक संदेशातून प्रत्येकाने आपल्या आईच्या सन्मानार्थ एक तरी झाड लावून त्याचे संगोपन करावे, असा संदेश यावेळी देण्यात आला. वृक्ष लावा, वृक्ष जगवा आणि पुढील पिढ्यांसाठी हिरवेगार भविष्य घडवा, असे आवाहन उपस्थित मान्यवरांनी केले.



## पीपल्स एज्युकेशन सोसायटीच्या विश्वस्तपदी अण्णा बनसोडे यांची निवड

■ मुंबई (दै. संध्या)

■ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा शैक्षणिक वारसा पुढे नेण्यासाठी प्रयत्नशील राहणार : उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांचा निर्धार

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्थापन केलेल्या पीपल्स एज्युकेशन सोसायटीच्या कार्यकारणीची महत्त्वपूर्ण बैठक मुंबईतील गरवारे क्लब येथे केंद्रीय मंत्री तथा संस्थेचे अध्यक्ष रामदास आठवले यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. या बैठकीत महाराष्ट्र विधानसभा उपाध्यक्ष तथा आमदार अण्णा बनसोडे यांची पीपल्स एज्युकेशन सोसायटीच्या विश्वस्तपदी नियुक्त करण्याची घोषणा करण्यात आली. कार्यकारणीच्या बैठकीत त्यांच्या नावावर शिक्कामोर्तब करण्यात आले.

अण्णा बनसोडे यांची विश्वस्तपदी निवड झाल्याने पीपल्स एज्युकेशन सोसायटीच्या शैक्षणिक आणि सामाजिक कार्याला नवी दिशा मिळण्यास मदत होईल, असा विश्वास केंद्रीय मंत्री तथा संस्थेचे अध्यक्ष रामदास आठवले यांनी व्यक्त केला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी शिक्षणाच्या माध्यमातून समाजातील वंचित, शोषित आणि दुर्बल घटकांना सक्षम करण्याच्या उद्देशाने पीपल्स एज्युकेशन सोसायटीची स्थापना केली. या संस्थेच्या माध्यमातून शिक्षणाचा प्रसार आणि सामाजिक परिवर्तनाचे कार्य पुढे नेण्यासाठी आपण प्रयत्नशील राहू, असा विश्वास विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांनी व्यक्त केला.

विद्यार्थ्यांना अधिक चांगल्या शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देणे, संस्थेच्या शैक्षणिक कार्याचा विस्तार करणे तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा शैक्षणिक वारसा पुढे नेण्यासाठी प्रामाणिकपणे कार्य करण्याचा निर्धार असल्याचेही अण्णा बनसोडे यांनी यावेळी सांगितले. यावेळी कार्यकारिणीच्या बैठकीत संस्थेचे अध्यक्ष रामदास आठवले, सुखदेव थोरात, संचालक उज्वल निकम, डॉ. वासुदेव गाडे, बी.के. बर्वे, विश्वास पाटील, डॉ. वेंकटा स्वामी, अरविंद सोनटक्के, डॉ. एस. एक. भागवत उपस्थित होते.


## जाहिर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेल्या मिळकतीचे विद्यमान मालक श्री. यशवंत नारायण मंचरकर व रोहन यशवंत मंचरकर रा. जुन्नर, ता. जुन्नर, जि. पुणे ४१०५०२ येथे राहावयास असून, सदरची मिळकत आमचे अशिलानी कायमखुश खरेदी देण्याचे मान्य व कबुल केले आहे व विसार रक्कम स्विकारली आहे. सदर मिळकत निर्वेध व निजोखमी असल्याचा भरवसा यांनी आमचे अशिलास दिलेला आहे. खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या मिळकती संबंधी कोणाचाही कोणत्याही प्रकारे हक्क, हितसंबंध कुलमुखत्यार, करारमदार, साठेखत, विसारपावती, कुळवहिवाट, गहाण, दान, बक्षिस, लोन, लीज, चोळी बांगडी, ताबा वहिवाट कोर्टकारवाई वगैरे असल्यास त्यांनी प्रस्तुत नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन ०७ दिवसाचे आत अस्सल कागदपत्रानिशी आमची खात्री पटवुन द्यावी व त्याची लेखी पोहोच द्यावी. तसे न केल्यास सदर मिळकती मध्ये असलेल्या हक्क त्यांनी जाणीवपुर्वक सोडुन दिलेला आहे असे समजुन आमचे अशिल पुढील व्यवहार पुर्ण करतील. त्यानंतर कोणाचीही कसलीही तक्रार ऐकुण घेतली जाणार नाही.

परिशिष्ठ

मिळकतीचे वर्णन - तुकडी व जिल्हा परिषद पुणे पोट तुकडी तालुका जुन्नर, पंचायत समिती जुन्नर पैकी ग्रामपंचायत खामगांव येथील व मे. दुय्यम निबंधक सो. जुन्नर यांचे हद्दीतील गाव खामगांव येथील शेतजमिन मिळकत.

मौजे खामगाव, ता. जुन्नर, जि. पुणे येथील संपुर्ण शेतजमिन -

| गट नं. | क्षेत्र हेक्टर - आर | आकार रुपये - पैसे |
|---|---|---|
| ६७९ | ४ - ०१ | ४ - ८६ |
| पोट खराबा | ०-०५.७० | |

यापैकी खरेदी देणार यांचे नावाने खाते क्र. ९१५ वरील विक्री करावयाचे क्षेत्र पुढीलप्रमाणे -

| गट नं. | क्षेत्र हेक्टर - आर | आकार रुपये - पैसे |
|---|---|---|
| ६७९ पैकी | १ - ४० | १ - ६७ |

यांसी चर्तुसिमा पुढीलप्रमाणे -

पुर्व - गट नं. ६७७
दक्षिण - जुन्नर हडसर रस्ता (सदर गटातुन रस्ता गेलेला आहे)
पश्चिम - गट नं. ६७६
उत्तर - फॉरेस्ट

येणेप्रमाणे मिळकती त्यातील सर्व तंगदभूत वस्तूसहित तसेच सदर जागेमध्ये येणेजाण्याचे व वहिवाटीचे हक्कासहित व इजमेंटरी राईट सह दरोबस्त मिळकतीत कोणत्याही प्रकारचे हक्क व अधिकार राखून न ठेवता मिळकत.

येणेप्रमाणे जाहिर नोटीस

दि : ०९/०९/२०२६
ठिकाण : जुन्नर

ॲड. तुषार दिनकर गायकवाड
बी.ए., एलएल.बी. (ॲडव्होकेट)
36, गणेश पेठ, जुन्नर, पुणे - 410502
मोबा-79 72 60 87 28



## पुणे महानगरपालिका, पुणे

निविदा प्रक्रिया कक्ष

ई-निविदा जाहिरात - फेर निविदा जाहिरात

विक्री कालावधी दिनांक : दि. ११/०९/२०२६ ते दि. १७/०९/२०२६ ०२:३० दुपारी पर्यंत
स्विकृती दिनांक : दि. ११/०९/२०२६ ते दि. १७/०९/२०२६ ०२:३० दुपारी पर्यंत
तांत्रिक निविदा उघडणे प्रक्रिया दिनांक : २१/०९/२०२६ ०३.०० दुपारी

| अ. क्र. | निविदा क्रमांक | खात्याचे नाव | कामाचे नाव | निविदा संच किंमत रू. | अंदाजित पुर्व गणित रक्कम रू. | बयाणा रक्कम रू. | कामाची मुदत | निविदा विषयक जबाबदार व्यक्तीचे नाव व दूरध्वनी क्रमांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | PMC/ ELECTRICAL/ 2026/10 | विद्युत विभाग | पुणे महानगरपालिकेचे मुंढवा मैलापाणी शुद्धीकरण केंद्रामधील सिवेज पंपिंग स्टेशन व SBR टेक्नोलॉजी करिता नव्याने PLC व स्काडा मिटीम व DO ऍनालायझर पुरविणे, बसविणे व चालू करून देणे. (पुणे मनपा अथवा शासकीय संस्थांचे रेजिस्ट्रेशन अट शिथिल) | 6079.00 | 5615854.00 | 56159.00 | ६ महिने | श्री. वैभव घुले 7447472413 |
| 2 | PMC/ ELECTRICAL/ 2026/11 | विद्युत विभाग | पुणे महानगरपालिकेचे खराडी मैलापाणी शुद्धीकरण केंद्रामधील सिवेज पंपिंग स्टेशन व SBR टेक्नोलॉजी करिता नव्याने PLC व स्काडा सिस्टीम व DO ऍनालायझर पुरविणे, बसविणे व चालू करून देणे. (पुणे मनपा अथवा शासकीय संस्थांचे रेजिस्ट्रेशन अट शिथिल) | 6079.00 | 5615854.00 | 56159.00 | ६ महिने | श्री. वैभव घुले 7447472413 |

निविदा संचाची विक्री www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर ई-निविदा सूचनेत नमूद केलेल्या तारखेनुसार सुरू राहील. सविस्तर निविदा व निविदेबाबतची इतर माहिती खालील संकेत स्थळावर उपलब्ध आहे. www.mahatenders.gov.in
सदरची ई-निविदा प्रणाली वापराबाबत काही तांत्रिक अडचण निर्माण झाल्यास NIC यांचेकडील ई-मेल Support-eproc@nic.in अथवा Help Desk Number 0120-4200462, 0120-4001002 या दूरध्वनीवर संपर्क साधावा.

सही/-
कार्यकारी अभियंता (विद्युत)
पुणे महानगरपालिका

जाहिरात क्र. २/७८५ दि. १०/०९/२०२६



## पुणे महानगरपालिका, पुणे

निविदा प्रक्रिया कक्ष

ई-निविदा जाहिरात - फेर निविदा जाहिरात

विक्री कालावधी दिनांक : दि. ११/०९/२०२६ ते दि. २१/०९/२०२६ ०२:३० दुपारी पर्यंत
स्विकृती दिनांक : दि. ११/०९/२०२६ ते दि. २१/०९/२०२६ ०२:३० दुपारी पर्यंत
तांत्रिक निविदा उघडणे प्रक्रिया दिनांक : २२/०९/२०२६ ०३.०० दुपारी

| अ. क्र. | निविदा क्रमांक | खात्याचे नाव | कामाचे नाव | निविदा संच किंमत रू. | अंदाजित पुर्व गणित रक्कम रू. | बयाणा रक्कम रू. | कामाची मुदत | निविदा विषयक जबाबदार व्यक्तीचे नाव व दूरध्वनी क्रमांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | PMC/ ELECTRICAL/ 2026/138 | विद्युत विभाग | पुणे महानगरपालिकेचे १८ दललीं/दिन बोपोडी मैलापाणी शुद्धीकरण केंद्र ०१ वर्ष चालवणे व देखभाल दुरुस्ती करणे. | 6079.00 | 14024855.00 | 140249.00 | 12 महिने | श्री. प्रल्हाद पवार 9689937697 |

निविदा संचाची विक्री www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर ई-निविदा सूचनेत नमूद केलेल्या तारखेनुसार सुरू राहील. सविस्तर निविदा व निविदेबाबतची इतर माहिती खालील संकेत स्थळावर उपलब्ध आहे. www.mahatenders.gov.in
सदरची ई-निविदा प्रणाली वापराबाबत काही तांत्रिक अडचण निर्माण झाल्यास NIC यांचेकडील ई-मेल Support-eproc@nic.in अथवा Help Desk Number 0120-4200462, 0120-4001002 या दूरध्वनीवर संपर्क साधावा.

सही/-
कार्यकारी अभियंता (विद्युत)
पुणे महानगरपालिका

जाहिरात क्र. २/७८४ दि. १०/०९/२०२६


## समाजभान जपण्याने परिणामकारक यश मिळते – डॉ. प्रवीण दबडघाव

■ पुणे (दै. संध्या)

सामाजिक, व्यावसायिक अथवा खाजगी अशा कोणत्याही कार्यात समाजभान जपले तर कार्याचे अधिक परिणामकारक यश मिळते, ज्याचे उत्तम उदाहरण म्हणजे स्व. अरविंदराव खळदकर होते, असे भावोद्गार रा. स्व. संघाच्या पश्चिम महाराष्ट्र प्रांताचे कार्यवाह डॉ. प्रवीण दबडघाव यांनी येथे काढले. जनता सहकारी बँकेचे माजी अध्यक्ष, ज्येष्ठ बँकिंग आणि सहकार तज्ज्ञ, ज्येष्ठ संघ स्वयंसेवक स्व. अरविंदराव खळदकर यांच्या श्रध्दांजली सभेत ते बोलत होते. जनता सहकारी बँक, भांडारकर प्राच्यविद्या संशोधन संस्था, डेक्कन एज्युकेशन सोसायटी व महाराजा शिवछत्रपती प्रतिष्ठान या संस्थांच्या वतीने श्रध्दांजली सभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी व्यासपीठावर रा. स्व. संघाचे पुणे महानगर कार्यवाह सचिन भोसले, जनता बँकेचे अध्यक्ष रवींद्र हेजीब व उपाध्यक्षा अलका पेटकर उपस्थित होते. यावेळी श्रध्दांजली वाहताना दबडघाव म्हणाले की, चिकाटीने आणि निष्ठेने काम करणे हा सामाजिक कार्याचा पाया आहे. समाजाच्या प्रत्येक घटकाला आपल्या प्रयत्नांमुळे समाधान मिळावे, याची तळमळ कार्यकर्त्यांच्या ठायी असायला हवी. अशा आदर्श कार्यकर्त्यांचे मूर्तिमंत उदाहरण म्हणजे अरविंदराव खळदकर होते. ते अनेक संस्थांचे आधारवड होते. जीव ओतून काम करणारे नेतृत्व, कुशल प्रशासक, सर्वांना हवेहवेसे असणारे, असे त्यांचे परिपूर्ण व्यक्तिमत्व होते. अनेक संस्थांना उभे करण्यात, वाढवण्यात त्यांनी प्रयत्नांची पराकाष्ठा केली.


## पुणे महानगरपालिका

मुख्य अभियंता (प्रकल्प) कार्यालय

फेर निविदा जाहिरात

विक्री कालावधी दिनांक :- ११/०९/२०२६ ते दि. १७/०९/२०२६ दुपारी ३:०० पर्यंत
स्विकृती दिनांक :- ११/०९/२०२६ ते दि. १७/०९/२०२६ दुपारी ३:०० पर्यंत
तांत्रिक निविदा (पाकीट 'अ') उघडणे प्रक्रिया दिनांक :- दि. २१/०९/२०२६ दुपारी ३.०० वा.

| अ. क्र. | निविदा क्र. | कामाचे नाव | संचलन वेळ व झोन | वार्षिक मक्ता र. रू. | १०% अनामत रक्कम + १०% निविदा रक्कम = २०% | पार्किंग दर | कामाची मुदत | एक पाकीट/ दोन पाकीट पद्धत | निविदा संच रूपये | मनपा रजिस्ट्रेशन अट शिथिल आहे का? | कामाचा निविदा संच संपूर्ण हार्ड कॉपी/सॉफ्ट कॉपीसोबत जोडली आहे का? | नवीन काम/फेर टेंडर तपशील देणे | निविदा विषयक जबाबदार व्यक्तीचे नाव व भ्रमणध्वनी क्र. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | Pmc/Chief Eng. (Project) /2026/39 | स्व. श्री. दत्तात्रय पांडुरंग पाटील उर्फ डी.पी. पाटील (पुणे पेठ भवानी, कासेवाडी) येथील वाहनतळ मक्ता पद्धतीने व्यवस्थापन व संचलन करणे. | टेंडर गोषवारा नुसार | ५,४१,६६०/- | १,०८,३३२/- | टेंडर गोषवारा नुसार | कमाल ३ वर्षे | दोन पाकिट पद्धत | ४१५/- | होय | होय | फेर टेंडर | श्री. पवन मापारी (उप अभियंता) ९६८९९३७४५४ श्री. अनिकेत शिंदे (कनिष्ठ अभियंता) ७५८८२६४६४३ |

अ) सदर कामांबाबत निविदा अटी/शर्ती इ. बाबतचा सर्व तपशील निविदा संचामध्ये नमूद केला असून सदर कामाचे निविदा संच www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर पाहण्यासाठी उपलब्ध आहे. निविदा संचाची विक्री व स्विकृती सदर वेबसाईटवरून फक्त ऑनलाईन पद्धतीने करण्यात येत आहे.
ब) ऑनलाईन निविदा प्रक्रीयेबाबतची संपूर्ण माहिती मुख्य अभियंता (प्रकल्प), ३ रा मजला, मुख्य इमारत (जुने नगर सचिव कार्यालय), पुणे महानगरपालिका येथे मिळेल.
क) कार्यालयीन आदेश क्र. अतिमआ (वि.) / ३२ दि. २२/०४/२०१६ नुसार अनामत रक्कम इ.सी.एस./आर.टी.जी.एस./एन.ई.एफ.टी. सुविधेमार्फतच स्विकारणेत येणार आहे.
ड) ठेकेदाराने अनामत रक्कम (इएमडी) रक्कम ऑनलाईन भरल्यास त्याची पावती 'अ' पाकिटात जोडावी.
इ) निविदा विक्रीच्या शेवटच्या दिवशी निविदा मंच प्राप्त न झाल्यास व स्विकृतीच्या शेवटच्या दिवशी ऑनलाईन सादरीकरण न झाल्यास याची सर्वस्वी जबाबदारी ठेकेदाराची राहील.
ई) निविदा भरण्यापूर्वी ठेकेदार यांनी सर्व वाहनतळांची प्रत्यक्ष जागा पाहणी करूनच निविदा सादर करावी. सदरची सर्व वाहनतळे 'जेथे आहे जसे आहे' या तत्वावर संचलनास देणे आहेत. प्रत्येक वाहनतळाची पार्किंग क्षमता प्रत्यक्ष जागेवर ठेकेदार यांनी त्यांचे स्तरावर स्वतंत्रपणे खातरजमा करणे आवश्यक राहील. कार्यादेश दिल्यानंतर कोणत्याही स्वरूपाच्या तक्रारीची दाखल घेतली जाणार नाही.
फ) निविदा संचा सोबत जोडलेल्या अटी व शर्ती बंधनकारक राहतील. तसेच सोबतच्या टेंडर घोषवारामध्ये दर्शविलेल्या झोन नुसारच पार्किंग शुल्काची आकारणी करणे बंधनकारक राहील.

सही/-
(संदीप पाटील)
कार्यकारी अभियंता (प्रकल्प)
पुणे महानगरपालिका

जाहिरात क्र. १/७९८ दि. १०/०९/२०२६

## थोडक्यात पण महत्वाचे



### सखी अंगण आकुर्डी येथील बचत गटांच्या गाळे वाटपात अनियमिततेचा आरोप

पिंपरी : दैनिक संध्या

समाज विकास विभागांतर्गत बचत गटांना देण्यात आलेल्या गाळे वाटप प्रक्रियेत गंभीर अनियमितता झाल्याचा आरोप आम आदमी पार्टीचे युवक अध्यक्ष विकी रोहिदास पासोटे व सामाजिक कार्यकर्ते आदिनाथ जावीर यांनी केला आहे. कागदपत्रांच्या तपासणीत काही बचत गटांच्या नावावर एकापेक्षा अधिक गाळे, नोंदणी तारखांमधील विसंगती तसेच भाडे व अनामत रकमेसंदर्भात प्रश्न उपस्थित होत असल्याचे त्यांनी निदर्शनास आणले आहे. या प्रकरणाचा पाठपुरावा करून हा प्रकार समोर आणल्याचा दावा विकी पासोटे व आदिनाथ जावीर यांनी केला असून, समाज विकास विभागाच्या उपायुक्त ममता शिंदे यांनी या प्रकरणाची तातडीने चौकशी करावी, अशी मागणी त्यांनी केली आहे. ई-टेंडरिंग प्रक्रिया रद्द करून नव्याने पारदर्शक पद्धतीने राबवावी, संपूर्ण गाळे वाटपाची Cross Verification करावी आणि चौकशीत दोषी आढळणाऱ्या संबंधित अधिकारी, कर्मचारी किंवा व्यक्तींवर कायद्यानुसार गुन्हे दाखल करावेत, अशी मागणी करण्यात आली आहे.

### पिंपरी चिंचवडमध्ये इराणी टोळीचा पर्दाफाश

पिंपरी : दैनिक संध्या

पिंपरी चिंचवड पोलिसांच्या मालमत्ता गुन्हे विरोधी पथकाने धडक कारवाई करत सराईत इराणी टोळीचा पर्दाफाश केला आहे. या कारवाईत मुख्य आरोपी फिदा हुसैन मानूअली, मुकेश अरुण नेटके यांच्यासह इतर साथीदारांना अटक करण्यात आली असून, त्यांच्याकडून तब्बल ३५ लाख ३३ हजार रुपये किंमतीचे २७ तोळे सोने जप्त करण्यात आले आहे. शहरात वाढत्या सोनसाखळी चोरीच्या घटनांमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. या पार्श्वभूमीवर पोलिसांनी विविध तांत्रिक पुरावे, सीसीटीव्ही फुटेज आणि गुप्त माहितीच्या आधारे तपासाची चक्रे वेगाने फिरवत या टोळीचा माग काढला. अखेर मालमत्ता गुन्हे विरोधी पथकाने सापळा रचून आरोपींना ताब्यात घेतले. पोलिसांच्या या कारवाईमुळे शहरातील सोनसाखळी चोरीचे १५ गंभीर गुन्हे उघडकीस आले आहेत. आरोपींकडून जप्त करण्यात आलेल्या सोन्याची किंमत लाखोंमध्ये असून, यामुळे अनेक गुन्ह्यांचा छडा लावण्यात पोलिसांना यश आले आहे. दरम्यान, अटक करण्यात आलेल्या आरोपींनी पिंपरी चिंचवडसह इतर शहरांमध्येही अशाच प्रकारचे गुन्हे केले आहेत का, याचा तपास सुरू असून मालमत्ता गुन्हे विरोधी पथक आरोपींची सखोल चौकशी करत आहे. या यशस्वी कारवाईबद्दल पिंपरी चिंचवड पोलिसांचे नागरिकांकडून कौतुक होत असून, शहरातील गुन्हेगारीवर लगाम लावण्यासाठी पोलिसांनी आणखी कठोर कारवाई सुरू ठेवण्याचा निर्धार व्यक्त केला आहे.

### पर्यावरणपूरक गणेशोत्सवासाठी नागरिकांनी पुढाकार घ्यावा : आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी

पिंपरी : दैनिक संध्या

गणेशोत्सव हा श्रद्धा, भक्ती आणि उत्साहाचा सण आहे. मात्र, उत्सवाचा आनंद घेताना पर्यावरण संवर्धन आणि शहराच्या स्वच्छतेची जबाबदारीही नागरिकांनी स्वीकारावी. गणेशोत्सव पर्यावरणपूरक आणि शाश्वत पद्धतीने साजरा करण्यासाठी नागरिकांनी पर्यावरणपूरक पर्यायांचा स्वीकार करावा, असे आवाहन पिंपरी चिंचवड महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी नागरिकांना केले आहे. गणेशमूर्तींची निवड करताना शाडू मातीच्या तसेच नैसर्गिक रंगांचा वापर केलेल्या मूर्तींना प्राधान्य द्यावे. जलप्रदूषणाचा धोका लक्षात घेता पीओपीच्या मूर्तींचा वापर टाळून पर्यावरणपूरक मूर्तींची निवड करावी. गणेशमूर्तींचे विसर्जन नदी, नाला अथवा तलावात न करता महापालिकेने उपलब्ध करून दिलेल्या कृत्रिम हौद अथवा कृत्रिम जलकुंडातच करावे, असे आवाहन महापालिकेने केले आहे. "गणेशोत्सवाची परंपरा, श्रद्धा आणि उत्साह कायम ठेवतानाच पर्यावरणाचे रक्षण करणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे. शाडू मातीच्या मूर्ती, नैसर्गिक सजावट, निर्माल्याचे स्वतंत्र संकलन आणि कृत्रिम विसर्जन व्यवस्था यांचा वापर करून नागरिकांनी पर्यावरणपूरक गणेशोत्सवाला हातभार लावावा. नागरिकांच्या सहभागातूनच स्वच्छ, सुंदर आणि शाश्वत शहराचा संकल्प प्रत्यक्षात येईल," असे आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी सांगितले. गणेशोत्सवादरम्यान निर्माण होणारे निर्माल्य जलस्रोतांमध्ये विसर्जित न करता महापालिकेने उपलब्ध करून दिलेल्या निर्माल्य संकलन केंद्रात स्वतंत्रपणे जमा करावे. तसेच ओला, सुका आणि विशेष काळजीचा कचरा स्वतंत्रपणे संकलित करून महापालिकेच्या कचरा संकलन व्यवस्थेकडे द्यावा.

### दिशा समितीच्या बैठकीत महापौर रवि लांडगे यांनी मांडले विकासाचे महत्त्वपूर्ण प्रश्न

पिंपरी : दैनिक संध्या

पुणे येथे केंद्रीय नागरी विमान वाहतूक व सहकार राज्यमंत्री तथा जिल्हा विकास समन्वय व सनियंत्रण (दिशा) समितीचे अध्यक्ष मुरलीधर मोहोळ यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित दिशा समितीच्या बैठकीत पिंपरी-चिंचवडचे महापौर रवि लांडगे यांनी शहराच्या विकासाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण प्रश्न प्राधान्याने मांडले. शहरातील पायाभूत सुविधा, सार्वजनिक वाहतूक, नदी प्रदूषण आणि पाणीपुरवठ्याशी संबंधित प्रलंबित प्रश्न मार्गी लावण्यासाठी केंद्र व राज्य शासन स्तरावर आवश्यक सहकार्य व पाठपुरावा करावा, अशी विनंती त्यांनी केली. प्रस्तावित चाकण–निगडी मेट्रो मार्गिकेमध्ये आळंदी स्थानकाचा समावेश करण्यात यावा, अशी महत्त्वपूर्ण मागणी महापौर लांडगे यांनी बैठकीत केली. आळंदीचे धार्मिक व ऐतिहासिक महत्त्व तसेच या परिसरात येणाऱ्या भाविकांची संख्या आणि भविष्यातील वाहतुकीची गरज विचारात घेऊन मेट्रोची सुविधा आळंदीला उपलब्ध होणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. त्यासाठी आवश्यक परवानग्या मिळविण्यासह केंद्र शासनाकडून आवश्यक निधी उपलब्ध होण्यासाठी मा. केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी विशेष पाठपुरावा करावा, अशी विनंती त्यांनी केली. दिशा समितीसमोर सादर करण्यात आलेल्या माहितीनुसार भक्ती शक्ती–मुकाई चौक–वाकड–नाशिक फाटा–वल्लभनगर–चाकण ही ४५.२९ कि.मी. लांबीची प्रस्तावित मेट्रो मार्गिका असून त्यामध्ये ३४ स्थानकांचा प्रस्ताव आहे. इंद्रायणी नदीच्या प्रदूषणाचा प्रश्नही महापौर लांडगे यांनी गांभीर्याने उपस्थित केला. इंद्रायणी नदीच्या प्रदूषणावर प्रभावी नियंत्रण आणण्यासाठी नदीक्षेत्राशी संबंधित सर्व महानगरपालिका, स्थानिक स्वराज्य संस्था, शासकीय यंत्रणा व संबंधित प्राधिकरणांनी स्वतंत्रपणे कार्यवाही करण्याऐवजी परस्पर समन्वयातून ठोस आणि कालबद्ध कृती आराखडा तयार करावा.

# आवाजाची मर्यादा ओलांडली तर थेट अध्यक्ष-पदाधिकारी अडचणीत

■ पिंपरी (दै. संध्या)

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर पिंपरी-चिंचवड पोलिसांनी ध्वनी प्रदूषणाबाबत कडक भूमिका घेतली असून, नियमांचे उल्लंघन करणाऱ्या गणेश मंडळांवर थेट गुन्हे दाखल करण्याचा इशारा दिला आहे. डीजेचा दणदणाट करून निर्धारित ध्वनीमर्यादा ओलांडल्यास मंडळाचे अध्यक्ष, पदाधिकारी, डीजे मालक तसेच वाहन चालक यांच्यावरही कारवाई केली जाणार आहे.

पोलिस प्रशासनाने स्पष्ट केले आहे की, सर्वोच्च न्यायालय आणि शासनाने निश्चित केलेल्या ध्वनीमर्यादांचे पालन सर्व मंडळांनी बंधनकारकपणे करावे. नियमांचे उल्लंघन झाल्यास संबंधित डीजे, मिक्सर आणि ध्वनिक्षेपक यंत्रणा तातडीने जप्त करण्यात येणार असून संबंधितांवर गुन्हे दाखल केले जातील.

दहीहंडी उत्सवादरम्यान ध्वनीमर्यादा भंग केल्याप्रकरणी 31 मंडळांवर कारवाई करण्यात आल्याचा दाखला देत पोलिसांनी गणेश मंडळांना सावध केले आहे. उत्सवाचा आनंद साजरा करताना



ज्येष्ठ नागरिक, रुग्ण, विद्यार्थी आणि सर्वसामान्य नागरिकांना त्रास होणार नाही याची काळजी घेणे आवश्यक असल्याचे पोलिसांनी नमूद केले.

अप्पर पोलीस आयुक्त सारंग आव्हाड यांनी सर्व गणेश मंडळांना ध्वनी प्रदूषण नियमांचे काटेकोर पालन करण्याचे आवाहन केले आहे.

नियमांचे पालन करून उत्सव शांततेत आणि उत्साहात साजरा करण्यासाठी नागरिक व मंडळांनी सहकार्य करावे, असेही त्यांनी सांगितले.

# सुपरस्पेशालिटी सेवेला 'प्रगती' प्रकल्पांतर्गत मंत्रिमंडळाची मंजुरी

## आमदार जगताप, - ७७२ पदांची निर्मिती आणि निधीला मंजुरी; रुग्णसेवेला मोठा दिलासा

पिंपरी(दै. संध्या)

जिल्हा रुग्णालयात २०० खाटांचे अत्याधुनिक सुपरस्पेशालिटी रुग्णालय उभारण्यास मंत्रिमंडळाने (दि. ८) मंजुरी दिली आहे. या रुग्णालयासाठी ७७२ पदांची निर्मिती, अत्याधुनिक वैद्यकीय यंत्रसामग्री, पायाभूत सुविधा आणि निधी उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीनेही महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत. त्यामुळे जिल्हा रुग्णालयाच्या सक्षमीकरणाला मोठी चालना मिळणार आहे अशी माहिती आमदार शंकर जगताप यांनी दिली. दरम्यान जिल्हा रुग्णालयामध्ये ४०० खाटा वाढवण्यात याव्या अशी आग्रही मागणी आहे ,यासाठी देखील पाठपुरावा सुरू आहे . रुग्णालयातील बेडची क्षमता वाढविण्यासाठी सातत्याने पाठपुरावा करण्यासोबतच जिल्ह्यातील नागरिकांना माफक, दर्जेदार आणि अत्याधुनिक आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्याचे आश्वासन दिले होते. या निर्णयामुळे नागरिकांना दिलेल्या आश्वासनाची पूर्तता होऊन गंभीर आजारांवरील उपचार आता शहरातच उपलब्ध होणार असल्याचे आमदार जगताप यांनी नमूद केले. सार्वजनिक आरोग्य व्यवस्था अधिक नागरीकेंद्रित करण्यासाठी २०२६ ते २०३१ या कालावधीत 'प्रगती' आरोग्य सुधारणा प्रकल्प राबविण्यास मंगळवारी मंत्रिमंडळाने मान्यता दिली. तब्बल ४ हजार २५० कोटी रुपयांचा हा प्रकल्प असणार आहे. यामधून जिल्हा रुग्णालयांना बळकटी मिळणार आहे. या प्रकल्पातून फक्त पायाभूत सुविधा उभारण्याऐवजी जिल्हा आरोग्यसेवेला 'मल्टी स्पेशलिटी हब' म्हणून ओळख मिळावी . रुग्णांना सर्व प्रकारच्या आरोग्य सुविधा वेळेवर आणि अचूक पद्धतीने मिळतील यावर भर दिला जाणार आहे. आरोग्य सेवेच्या उपलब्धतेचे बरोबर उपचारांचा खर्च नागरिकांच्या आवाक्यात रहावा यावरही या प्रकल्पातून भर दिला जाणार आहे. प्रतिबंधात्मक आरोग्य सेवा आणि वेळेवर निदान झाल्यानंतर आजाराचे गांभीर्य वाढण्यापूर्वी त्यावर उपचार घेणे यामुळे रुग्णांना शक्य होईल. या माध्यमातून राज्यातील जिल्हा रुग्णालयांमध्ये आधुनिक यंत्रसामग्री, डिजिटल आरोग्य सुविधा आणि दर्जेदार उपचार व्यवस्था उभारण्यावर भर दिला जाणार आहे.

दरम्यान राज्य मंत्रीमंडळाने प्रगती प्रकल्पांतर्गत पुणे जिल्ह्यासाठी २०० खाटांचे सुपर स्पेशलिटी रुग्णालय सुरू करण्यासाठी मंजुरी दिली आहे. तसेच कोल्हापूर आणि नांदेड येथे ५०० खाटांची, नागपूर आणि लातूर येथे ३०० खाटांची जिल्हा रुग्णालय उभारण्याचे प्रस्तावित आहे. या पाच रुग्णालयांसाठी एकूण २ हजार ४३० पदे निर्माण करण्याचे ही मंजुरी देण्यात आले आहे. जिल्हा रुग्णालयाच्या सक्षमीकरणासाठी आमदार शंकर जगताप यांनी शासनस्तरावर सातत्याने पाठपुरावा केला होता. याच अंतर्गत (दि. ८) मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दूरदृष्टीतून जिल्हा रुग्णालयाचे सुपरस्पेशालिटी आरोग्य केंद्रात रूपांतर करण्याच्या दिशेने हे महत्त्वाचे पाऊल मानले जात आहे. नवीन सुपरस्पेशालिटी सुविधेमुळे हृदयरोग, कर्करोग, मेंदू व मज्जासंस्थेचे आजार, मूत्रपिंडविकार यांसारख्या गंभीर आजारांवरील उपचार एकाच ठिकाणी उपलब्ध होण्यास मदत होणार आहे. सर्वसामान्य रुग्णांना महागड्या खासगी रुग्णालयांत अथवा उपचारांसाठी दूरवर जाण्याची गरज कमी होणार असून, जिल्हा रुग्णालय अधिक सक्षम, आधुनिक आणि रुग्णाभिमुख होणार असल्याचे आमदार शंकर जगताप म्हणाले.

### अत्यंत दिलासादायक निर्णय



जिल्हा रुग्णालयात २०० खाटांचे सुपरस्पेशालिटी रुग्णालय उभारण्यास मंत्रिमंडळाने दिलेली मंजुरी हा सर्वसामान्य रुग्णांसाठी अत्यंत दिलासादायक निर्णय आहे. मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या दूरदृष्टीतून जिल्हा रुग्णालय आधुनिक, सक्षम आणि सर्व सुविधांनी परिपूर्ण 'सुपरस्पेशालिटी ' केंद्र म्हणून विकसित होत आहे. पदनिर्मिती, निधी आणि अत्याधुनिक यंत्रसामग्रीबाबत घेण्यात आलेल्या निर्णयांमुळे गंभीर आजारांवरील दर्जेदार उपचार स्थानिक पातळीवर उपलब्ध होतील. या प्रकल्पासाठी सातत्याने पाठपुरावा केला असून, तो निर्धारित वेळेत पूर्ण व्हावा यासाठी पुढेही प्रयत्नशील राहणार आहे."

- शंकर जगताप आमदार चिंचवड विधानसभा मतदारसंघ

# चारधाम यात्रा बुकिंगच्या नावाखाली सायबर फसवणूक


■ पिंपळे गुरव (दै. संध्या)

उत्तराखंडमध्ये सुरू असलेल्या चारधाम यात्रेसाठी देशभरातून मोठ्या संख्येने भाविक जात असून, या पार्श्वभूमीवर हेलिकॉप्टर बुकिंग, हॉटेल आरक्षण आणि टूर पॅकेजच्या नावाखाली ऑनलाईन सायबर फसवणुकीच्या घटना वाढत आहेत. पिंपरी-चिंचवड शहरातील अनेक नागरिक चारधाम यात्रेसाठी जात असल्याने पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाने नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सायबर गुन्हेगार अधिकृत वेबसाईटप्रमाणे दिसणाऱ्या बनावट वेबसाईट्स, सोशल मीडिया जाहिराती आणि फसव्या लिंक तयार करून भाविकांना जाळ्यात ओढत आहेत. हेलिकॉप्टर सेवा, हॉटेल बुकिंग किंवा विशेष टूर पॅकेजचे आमिष दाखवत नागरिकांकडून ऑनलाईन पैसे उकळले जात असून त्यांची आर्थिक फसवणूक केली जात आहे. चारधाम यात्रेसाठी हेलिकॉप्टर बुकिंग करताना नागरिकांनी केवळ अधिकृत संकेतस्थळाचाच वापर करावा, असे आवाहन पोलिसांनी केले आहे. तसेच गुगल किंवा सोशल मीडियावर दिसणाऱ्या अनोळखी वेबसाईट्स आणि जाहिरातींवर विश्वास ठेवू नये, असेही सांगण्यात आले आहे. पोलिसांनी नागरिकांना कमी दरातील ऑफर, अनोळखी व्यक्तींचे बँक खाते किंवा मोबाईल क्रमांकावर पैसे पाठविणे टाळण्याचा सल्ला दिला आहे. कोणत्याही परिस्थितीत OTP, UPI PIN, CVV क्रमांक, ATM कार्डची माहिती किंवा इतर गोपनीय आर्थिक माहिती कोणालाही देऊ नये, असेही स्पष्ट करण्यात आले आहे.

चारधाम यात्रेची नोंदणी आणि अधिकृत माहितीसाठी उत्तराखंड पर्यटन विभागाच्या अधिकृत व्हॉट्सअॅप क्रमांकावर "Yatra" असा संदेश पाठवून माहिती मिळवता येणार आहे.

१तसेच ऑनलाईन पेमेंट करण्यापूर्वी संबंधित वेबसाईटची सत्यता आणि सेवा प्रदात्याची अधिकृतता तपासण्याचे आवाहन करण्यात आले आहे. सायबर फसवणुकीचा प्रकार घडल्यास नागरिकांनी तात्काळ राष्ट्रीय सायबर गुन्हे नोंदणी पोर्टल www.cybercrime.gov.in वर तक्रार नोंदवावी किंवा १९३० या सायबर हेल्पलाईन क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन पिंपरी-चिंचवड पोलिसांनी केले आहे.




# पवना जलवाहिनी प्रकल्पाबाबत सर्व घटकांना विश्वासात घेऊन सकारात्मक तोडगा काढावा

■ पिंपरी (दै. संध्या)

पिंपरी-चिंचवड शहराच्या दीर्घकालीन पाणीपुरवठ्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण असलेल्या पवना जलवाहिनी प्रकल्पाबाबत मावळमधील शेतकरी तसेच संबंधित घटकांच्या अडचणी व भूमिका विचारात घेऊन समन्वयातून सकारात्मक आणि सर्वमान्य तोडगा काढावा. तसेच या विषयावरील पुढील कार्यवाहीसाठी मा. मुख्यमंत्री महोदयांची वेळ घेऊन बैठक आयोजित करण्याचे नियोजन करावे, अशी सूचना महापौर रवि लांडगे यांनी जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांना केली.

आज दिशा समितीच्या बैठकीस उपस्थित राहण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात आले असता महापौर रवि लांडगे यांनी जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांची भेट घेतली.

यावेळी पवना जलवाहिनी प्रकल्पासंदर्भात यापूर्वी झालेल्या बैठकीतील चर्चा, मावळ भागातील शेतकऱ्यांनी मांडलेल्या विविध अडचणी तसेच प्रकल्पाच्या पुढील कार्यवाहीबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.

# पिंपळे सौदागर विसर्जन घाटाची काटे यांच्याकडून पाहणी

■ पिंपळे गुरव (दै. संध्या)

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर प्रभाग क्रमांक २८ मधील पिंपळे सौदागर येथील पवना नदीकाठच्या विसर्जन घाटाची भाजप शहराध्यक्ष तथा नगरसेवक शत्रुघ्न (बापू) काटे यांनी महापालिकेच्या आरोग्य व पर्यावरण विभागाच्या अधिकाऱ्यांसमवेत प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी विसर्जनासाठी येणाऱ्या भाविकांना कोणतीही गैरसोय होऊ नये, यासाठी आवश्यक सुविधांचा आढावा घेण्यात आला.

पाहणीदरम्यान श्री गणेशमूर्ती विसर्जन हौदांची स्वच्छता, हौदांची दुरुस्ती व रंगरंगोटी, घाट परिसरातील प्रकाशव्यवस्था तसेच नदीपात्रातील गाळ



व कचऱ्याची साफसफाई याबाबत संबंधित अधिकाऱ्यांना तातडीच्या सूचना देण्यात आल्या. भाविकांना सुरक्षित, स्वच्छ आणि सुयोग्य वातावरणात बाप्पाला निरोप देता यावा, यासाठी सर्व तयारी वेळेत पूर्ण करण्याचे निर्देशही देण्यात आले.

यावेळी बोलताना शत्रुघ्न काटे म्हणाले, "गणेशोत्सव हा सर्वांच्या श्रद्धा आणि उत्साहाचा सण आहे. पिंपळे सौदागर आणि परिसरातील हजारो नागरिक विसर्जनासाठी या घाटावर येतात. त्यामुळे घाटावरील स्वच्छता, सुरक्षितता आणि प्रकाशव्यवस्था उत्कृष्ट असणे आवश्यक आहे. संबंधित विभागांनी सर्व कामे वेळेत आणि दर्जेदार पद्धतीने पूर्ण करावीत."

या पाहणीवेळी पिंपरी-चिंचवड महापालिकेचे आरोग्य निरीक्षक, स्वच्छता मुकादम तसेच पर्यावरण विभागाचे कर्मचारी उपस्थित होते. गणेशोत्सवापूर्वी विसर्जन घाटावरील सर्व सुविधा सज्ज करण्यासाठी महापालिका प्रशासनाकडून युद्धपातळीवर कामे सुरू असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

# भागवाणी आणि सोनवणे यांच्या भ्रष्टाचाराची चौकशी करण्याचे मुख्यमंत्र्यांचे आयुक्तांना आदेश

■ पिंपरी (दै. संध्या)

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या बांधकाम परवानगी विभागातील सह शहर अभियंता सुनील भागवाणी आणि कार्यकारी अभियंता विजय सोनवणे यांच्यावरील कथित आर्थिक गैरव्यवहार व भ्रष्टाचाराच्या आरोपांची उच्चस्तरीय चौकशी करण्याचे आदेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पिंपरी चिंचवड महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांना दिले आहेत. माजी उपमहापौर तथा नगरसेवक तुषार रघुनाथ हिंगे यांनी पत्राद्वारे केलेल्या गंभीर तक्रारीची दखल घेत मुख्यमंत्र्यांनी हे निर्देश दिले आहेत. याप्रकारामुळे महापालिका वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे. माजी उपमहापौर तुषार हिंगे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे दिलेल्या तक्रारीनुसार, सह शहर अभियंता सुनील भागवाणी आणि कार्यकारी अभियंता विजय सोनवणे हे दोन्ही अधिकारी गेल्या अनेक वर्षांपासून बांधकाम आणि परवानगी विभागासारख्या महत्त्वाच्या विभागात एकाच ठिकाणी कार्यरत आहेत. एकाच पदावर दीर्घकाळ राहिल्यामुळे त्यांनी भ्रष्टाचाराचे अभेद्य जाळे निर्माण केले असून, आपल्या अधिकारांचा गैरवापर करून ते सर्रास आर्थिक पिळवणूक करत आहेत. बांधकाम विभागाकडे मंजुरीसाठी दाखल होणाऱ्या फायलींमध्ये जाणीवपूर्वक तांत्रिक अडचणी, उणिवा व त्रुटी निर्माण करण्याचे प्रकार त्यांच्याकडून सातत्याने केले जातात. त्यानंतर हे अधिकारी प्रत्येक फाईलमागे 5 ते 6 रुपये प्रति चौरस फूट या दराने मलिदा गोळा करीत असून, जोपर्यंत अनधिकृत पैशांची मागणी पूर्ण केली जात नाही, तोपर्यंत एकही फाईल पुढे सरकत नाही व मंजुरीची प्रक्रिया जाणीवपूर्वक रेंगाळली जाते.

त्याचबरोबर, विकास प्रकल्पांतील जागांचा मूळ नकाशा किंवा रस्ता बदलणे, मंजूर आरक्षणाचे कारण पुढे करणे तसेच कागदपत्रांमध्ये नाहक कायदेशीर अडथळे निर्माण करून बांधकाम व्यावसायिकांची मानसिक आणि आर्थिक पिळवणूक करण्याचे सत्र त्यांच्याकडून अविरत सुरू आहे. शासकीय पदाचा गैरवापर करून स्वतःचे हितसंबंध जोपासणारे आणि लाचखोरीला पाठीशी घालणारे हे अधिकारी महापालिकेची प्रतिमा मलीन करीत आहे. यामुळे प्रामाणिक व्यावसायिकांमध्ये तीव्र संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे.

या संपूर्ण प्रकरणाची तातडीने व गांभीर्याने दखल घेत, सह शहर अभियंता सुनील भागवाणी आणि विजय सोनवणे यांची तातडीने बांधकाम परवानगी विभागातून अन्यत्र बदली करण्यात यावी. तसेच त्यांच्या या संपूर्ण कारभारासह मालमत्तेची लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत उच्चस्तरीय चौकशी करून दोषी आढळल्यास त्यांच्यावर कठोर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी माजी उपमहापौर तुषार हिंगे यांनी केली होती. त्यावर मुख्यमंत्र्यांनी चौकशीचे निर्देश दिले आहेत. पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या बांधकाम विभागात काही अधिकारी भ्रष्टाचाराचा कहर करत असून, फाईल्स अडवून नागरिकांची आणि व्यावसायिकांची आर्थिक लूट सुरू आहे. मुख्यमंत्र्यांनी या प्रकरणाची गंभीर दखल घेऊन चौकशीचे आदेश दिले असून, या दोषी अधिकाऱ्यांची केवळ इतरत्र बदली न करता त्यांच्या संपत्तीची लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत (ACB) कसून चौकशी झाली पाहिजे, जेणेकरून शहरात प्रामाणिक व पारदर्शक कारभार येईल., असे तुषार हिंगे, माजी उपमहापौर तथा विद्यमान नगरसेवक, पिंपरी चिंचवड महापालिका म्हणाले.

## थोडक्यात पण महत्वाचे

### भाजप अनुसूचित जाती मोर्चाच्या प्रदेश उपाध्यक्षपदी अशोक उमरगेकर



**आळंदी : दैनिक संध्या**

भारतीय जनता पक्षाच्या अनुसूचित जाती मोर्चाच्या प्रदेश उपाध्यक्षपदी आळंदी नगरपरिषदेचे माजी नगरसेवक अशोक उमरगेकर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. अनुसूचित जाती मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष विश्वजीत गायकवाड व प्रदेश महामंत्री आमदार माधवी नाईक यांनी उमरगेकर यांची निवड केली. उमरगेकर यांनी आळंदी नगरपरिषदेचे माजी नगरसेवक म्हणून काम केले असून, सामाजिक व राजकीय क्षेत्रात त्यांचा सक्रिय सहभाग राहिला आहे. पक्षाने सोपविलेली जबाबदारी लक्षात घेऊन अनुसूचित जाती समाजाच्या प्रश्नांसाठी तसेच समाजातील युवक, महिला आणि वंचित घटकांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी काम करण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला. अशोक उमरगेकर म्हणाले, "भारतीय जनता पक्षाने माझ्यावर विश्वास दाखवून प्रदेश उपाध्यक्षपदाची महत्त्वाची जबाबदारी दिली आहे. पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांनी दिलेल्या या संधीबद्दल मी त्यांचा मनःपूर्वक आभारी आहे. अनुसूचित जाती समाजाच्या विविध समस्या शासन दरबारी मांडून त्या सोडविण्यासाठी प्रामाणिकपणे प्रयत्न करणार आहे. संघटन मजबूत करण्यासोबतच समाजातील युवकांना शिक्षण, रोजगार व विविध शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी प्रयत्नशील राहीन." उमरगेकर यांच्या नियुक्तीबद्दल भाजप पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच विविध सामाजिक संघटनांच्या वतीने तसेच नगराध्यक्ष प्रशांत कुऱ्हाडे, भाजपा आध्यात्मिक आघाडीचे संजय महाराज घुंडरे, नगरसेवक रामचंद्र भोसले, ज्ञानेश्वर शिक्षण संस्थेचे सचिव अजित वडगावकर यांनी अभिनंदन केले.



### महामार्गावरील अनधिकृत टपऱ्यांवर कारवाई

**नारायणगाव: दैनिक संध्या**

पुणे-नाशिक महामार्गालगत असणाऱ्या जुन्नर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या परिसरातील अनधिकृत हातगाड्या आणि टपऱ्यांवर अखेर प्रशासनाने धडक कारवाई करत त्या हटवल्या आहेत. वारूळवाडी ग्रामपंचायत आणि जुन्नर कृषी उत्पन्न बाजार समिती यांच्या संयुक्त विद्यमाने ही मोहीम राबवण्यात आली. या कारवाईमुळे महामार्गालगतचा परिसर मोकळा झाला असून, गेल्या अनेक दिवसांपासून होणारी वाहतुकीची कोंडी दूर झाली आहे. नारायणगाव जवळील पुणे-नाशिक महामार्गावर जुन्नर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या परिसरात सन २०१४ पासून तात्पुरत्या स्वरूपात अनेक हातगाड्या आणि टपऱ्या उभारण्यात आल्या होत्या. गेल्या काही वर्षांत महामार्गावरील वाहनांची वर्दळ कमालीची वाढल्याने, या रस्त्याशेजारील टपऱ्यांमुळे वाहतुकीस मोठा अडथळा निर्माण होत होता. तसेच यामुळे अपघातांचा धोकाही प्रचंड वाढला होता. बाजार समितीच्या शेजारीच प्रसिद्ध टोमॅटो मार्केट असल्याने या ठिकाणी कामगारांची मोठी गर्दी असते. दरम्यान, या परिसरातील काही टपऱ्यांमध्ये गुप्त पद्धतीने दारूची विक्री होत असल्याच्या तक्रारी व्यापारी वर्गाकडून वारंवार केल्या जात होत्या. या टपऱ्यांवर दारू पिऊन आल्यानंतर कामगार आणि नागरिकांमध्ये सतत वादविवादाच्या घटना घडत होत्या. या प्रकाराबाबत वाहन चालक व नागरिकांनी अनेकदा तक्रारी दाखल केल्या होत्या. पोलिसांनी यापूर्वी संबंधित टपरीचालकांना समज देऊन दारू विक्री बंद करण्याच्या सूचनाही दिल्या होत्या, मात्र तरीही हा प्रकार सुरूच होता. या गंभीर पार्श्वभूमीवर वारूळवाडी ग्रामपंचायत आणि जुन्नर कृषी उत्पन्न बाजार समितीने ठोस पाऊल उचलण्याचे ठरवले. दोन्ही प्रशासनांनी पुढाकार घेत महामार्गालगतच्या या सर्व हातगाड्या आणि टपऱ्या हटवण्याची धडक कारवाई पूर्ण केली. या कारवाईनंतर आता हा संपूर्ण परिसर पूर्णपणे मोकळा झाला आहे. यामुळे वाहनचालकांना मोठा दिलासा मिळाला असून, वाहतुकीची कोंडी कमी होण्यासोबतच अपघातांचा धोकाही टळणार आहे. महामार्गावर पुन्हा एकदा अशा प्रकारे हातगाड्या किंवा टपऱ्या उभारल्या जाऊ नयेत, यासाठी संबंधित प्रशासनाने या भागाची नियमित पाहणी करावी. तसेच नियम मोडून अतिक्रमण करणाऱ्यांवर सातत्याने कठोर कारवाई केली जावी, अशी मागणी आता स्थानिक नागरिक आणि वाहनचालकांकडून केली जात आहे.

### नारायणगावात मुक्ताई व काळोबा देवस्थान डायलिसिस केंद्राचा भव्य उद्घाटन सोहळा




**नारायणगाव : दैनिक संध्या**

ग्रामीण भागातील रुग्णांना दर्जेदार आणि सवलतीच्या दरात वैद्यकीय उपचार मिळावेत या उद्देशाने नारायणगाव (ता. जुन्नर) येथे मुक्ताई व काळोबा देवस्थान डायलिसिस केंद्र सुरू करण्यात येत आहे. या अत्याधुनिक केंद्राचा भव्य उद्घाटन समारंभ रविवार, दिनांक १३ सप्टेंबर २०२६ रोजी सायंकाळी ४:०० वाजता मुक्ताई गार्डन मंगल कार्यालय, नारायणगाव येथे आयोजित करण्यात आला आहे. सदर कार्यक्रम मुक्ताई गार्डन मंगल कार्यालय, नारायणगाव येथे पार पडणार आहे. या अत्याधुनिक डायलिसिस केंद्राचे उद्घाटन पुणे येथील ससून रुग्णालयाचे डिन मा. डॉ. एकनाथ पवार, जुन्नर तालुक्याचे आमदार मा. श्री. शरददादा सोनवणे, आणि मुख्यमंत्री सहाय्यता कक्ष ,पुणेचे प्रमुख मा. श्री. मानसिंग साबळे यांच्या शुभहस्ते संपन्न होणार आहे. या सोहळ्याला परिसरातील अनेक मान्यवर प्रमुख उपस्थिती म्हणून लाभणार आहेत, त्यामध्ये मा. डॉ. प्रदीप जोशी सर (जोशी हॉस्पिटल, नारायणगाव), मा. डॉ. प्रशांत काचळे (काचळे हॉस्पिटल, नारायणगाव), मा. डॉ. सदानंद राऊत (राऊत हॉस्पिटल,नारायणगाव) तसेच मा. श्री. अनिलतात्या मेहेर (ग्रामोन्नती मंडळाचे, कार्याध्यक्ष) व मा. श्री. राजाभाऊ पायमोडे आदी मान्यवर उपस्थित राहणार आहे. तसेच सौ. नेहाताई योगेश पाटे (सदस्या, जि.प. पुणे), सौ. सुषमाताई वाव्हळ (सदस्य,पं.स. जुन्नर), सौ. जयश्रीताई बनकर (सदस्य, पं.स. जुन्नर), सौ. शुभदाताई वाव्हळ (सरपंच, नारायणगाव) तसेच श्री. विनायक भुजबळ (सरपंच,वारूळवाडी), श्री. संतोषनाना खैरे (संचालक विघ्नहर सह. सा. का), श्री. योगेश (बाबूभाऊ) पाटे (उपसरपंच, नारायणगाव), श्री. संतोषदादा वाजगे( मा. उपसरपंच ,नारायणगाव), आणि श्री. विकासनाना तोडकरी (विश्वस्त, मुक्ताई देवस्थान) यांच्यासह परिसरातील विविध मान्यवर उपस्थित राहणार आहेत. या सुसज्ज डायलिसिस केंद्रामुळे नारायणगाव, वारूळवाडी आणि जुन्नर तालुक्यातील गरजू रुग्णांना स्थानिक पातळीवरच उत्तम उपचार मिळण्यास मदत होणार आहे. या उद्घाटन सोहळ्यास परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन मुक्ताईबाई व काळोबा देवस्थान ट्रस्ट, नारायणगाव आणि समस्त ग्रामस्थ नारायणगाव- वारूळवाडी यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# चाकण नगरपरिषदेकडून अनधिकृत बांधकामे भुईसपाट

## अतिक्रमणे यांच्याविरुद्ध तीन टप्प्यांत कारवाई, तोतया विक्रेते, एजंट, दलाल किंवा सल्लागारांपासून नागरिकांनी सावध राहावे

**■ चाकण (दै. संध्या)**

चाकण नगरपरिषदेमार्फत महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ मधील कलम ५४ अन्वये चाकण शहरातील विविध अनधिकृत बांधकामांवर धडक निष्कासन कारवाई करण्यात आली. या कारवाईत नगरपरिषदेने अनधिकृत बांधकामे भुईसपाट केली.




चाकण शहरातील अनधिकृत बांधकामांना आळा घालण्यासाठी नगरपरिषदेने यापूर्वी अनधिकृत होर्डिंग, अनधिकृत अभिन्यास, प्लॉटिंग तसेच राष्ट्रीय महामार्गावरील अतिक्रमणे यांच्याविरुद्ध तीन टप्प्यांत कारवाई केली आहे. त्याचबरोबर नागरिकांची फसवणूक होऊ नये यासाठी अनधिकृत प्लॉट खरेदी करू नये व नगरपरिषदेची बांधकाम परवानगी घेतल्याशिवाय बांधकाम करू नये, याबाबत जनजागृती करण्यात आली आहे. संबंधित अनधिकृत बांधकाम धारकांना नियमानुसार नोटिसा बजावण्यात आल्या होत्या. तसेच त्यांना आपली बाजू मांडण्यासाठी सुनावणीची अंतिम संधी देखील देण्यात आली होती. मात्र, नोटिसा व सुनावणीची संधी देऊनही संबंधितांनी अनधिकृत बांधकामे न हटवल्याने नगरपरिषदेने नियमानुसार स्वतः निष्कासनाची कारवाई केली.

अनधिकृत बांधकामामुळे शहराचे मोठे नुकसान झाले आहे. अनधिकृत बांधकामे ही केवळ बांधकाम नियमांचे उल्लंघन नसून त्याचा थेट परिणाम शहराच्या नियोजनावर, वाहतूक व्यवस्थेवर, अग्निसुरक्षेवर, पाणीपुरवठा व मलनिस्सारण व्यवस्थेवर तसेच नागरिकांच्या सुरक्षिततेवर होतो. नगरपरिषदेच्या महसुलाला मोठा फटका बसत बांधकाम परवानगी न घेता मोठ्या प्रमाणावर खोल्या बांधून त्या भाड्याने देऊन लाखो रुपयांचे उत्पन्न कमावले जात आहे. आवश्यक फ्रंट, साईड, रिअर मार्जिन न सोडता बांधकामे केली जात आहेत. नियमाप्रमाणे आवश्यक पार्किंगची जागा न सोडता खोल्या व व्यावसायिक वापराच्या जागा निर्माण केल्या जात आहेत.

उपलब्ध जागेचा नियमबाह्य पद्धतीने जास्तीत जास्त वापर करून अतिघनता निर्माण केली जात आहे. अशा बांधकामांमुळे भविष्यात वाहतूक कोंडी, अग्निशमन वाहनांना अडथळा, पार्किंगची समस्या व नागरी सुविधांवर अतिरिक्त ताण निर्माण होऊ शकतो. परवानगीशिवाय बांधकाम करून त्यातून आर्थिक फायदा घेणे आणि त्याचा भार नगरपरिषद व सर्वसामान्य नागरिकांवर टाकणे, हे कोणत्याही परिस्थितीत मान्य केले जाणार नाही, असे नगरपरिषद प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

नगरपरिषदेने यापूर्वीच नागरिकांना सावध करण्यासाठी शहरातील विविध ठिकाणी "अनधिकृत बांधकाम करू नये व अनधिकृत प्लॉट खरेदी करू नये" अशा स्वरूपाचे फलक लावले आहेत. सदर कारवाईबाबत काही संबंधितांनी न्यायालयात धाव घेतली होती. तथापि, न्यायालयीन आदेश व लागू असलेल्या कायदेशीर तरतुदींनुसार कार्यवाही करण्यात आली आहे.

चाकण नगरपरिषदेच्या इतिहासात प्रथमच एवढ्या मोठ्या प्रमाणावर नियोजनबद्ध पद्धतीने अनधिकृत बांधकामांवर निष्कासनाची कारवाई करण्यात आली.

*कारवाईसाठी तैनात यंत्रणा -

नगरपरिषद अधिकारी - २० नगरपरिषद कर्मचारी - ५० पोलीस अधिकारी - १० पोलीस कर्मचारी - ८० महाराष्ट्र राज्य सुरक्षा दलाचे जवान - ७ जेसीबी - ३ पोकलेन - ६ ट्रॅक्टर/कटर - ६ व्हिडिओग्राफर - ६ अग्निशमन बंब व आवश्यक अग्निशमन यंत्रणा. ट्रेलर व इतर आवश्यक यंत्रसामग्री.

### कारवाई सुरूच राहणार

चाकण शहरातील अनधिकृत बांधकामांना कोणत्याही प्रकारे संरक्षण दिले जाणार नाही. नोटीस, सुनावणी व कायदेशीर प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर पात्र प्रकरणांमध्ये नियमानुसार पुढील निष्कासन कारवाई करण्यात येणार आहे." नागरिकांनी केवळ चाकण नगरपरिषदेकडून विधिवत बांधकाम परवानगी प्राप्त करूनच बांधकाम करावे. अनधिकृत प्लॉट, अनधिकृत लेआउट किंवा परवानगीशिवाय बांधकाम करून देण्याचे आश्वासन देणाऱ्या तोतया विक्रेते, एजंट, दलाल किंवा सल्लागारांपासून नागरिकांनी सावध राहावे. चाकण नगरपरिषदेची मंजुरी नसलेले बांधकाम आपोआप नियमित होत नाही. लागू कायदे व नियमांनुसार बांधकाम नियमित करण्यासाठी पात्रता असल्यास, शासनाच्या प्रचलित तरतुदीनुसार प्रशमन शुल्क, दंड भरून नियमितीकरणाची प्रक्रिया करता येऊ शकते. मात्र, प्रत्येक अनधिकृत बांधकाम नियमित होईलच असे नाही.

### चाकण भागातील नागरिकांना आवाहन

परवानगीशिवाय बांधकाम करू नका. अनधिकृत प्लॉट खरेदी करू नका आणि फसवणुकीपासून सावध राहा. चाकण शहराचा नियोजित, सुरक्षित व शाश्वत विकास करण्यासाठी अनधिकृत बांधकामांविरुद्धची कारवाई यापुढेही सातत्याने सुरू राहणार आहे, असे जाहीर आवाहन प्रशासनामार्फत करण्यात आले आहे.

# उमाजी नाईकांचा संघर्ष म्हणजे स्वातंत्र्य, स्वाभिमान आणि क्रांतीची प्रेरणा! : सागर चव्हाण

## न्यू इंग्लिश स्कूल, जवळार्जुन विद्यालयात आद्यक्रांतिवीर उमाजी नाईक जयंती उत्साहात

**■ जेजुरी (दै. संध्या)**

स्वातंत्र्याची ज्योत प्रज्वलित करणारे, अन्याय आणि परकीय सत्तेविरुद्ध निर्भयपणे संघर्ष करणारे आद्यक्रांतिवीर राजे उमाजी नाईक यांच्या २३५ व्या जयंतीनिमित्त श्री. शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, सासवड संचलित न्यू इंग्लिश स्कूल, जवळार्जुन, ता. पुरंदर येथे विविध उपक्रमांनी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

यानिमित्ताने विद्यालयात "आद्यक्रांतिवीर राजे उमाजी नाईक – एक क्रांतीज्योत" या विषयावर विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले.



कार्यक्रमाच्या प्रारंभी आद्यक्रांतिवीर राजे उमाजी नाईक यांच्या प्रतिमेचे पूजन विद्यालयाचे मुख्याध्यापक सतिश पिसाळ, प्रसिद्ध व्याख्याते सागर चव्हाण, प्रल्हाद गिरमे आणि तंत्रस्नेही शिक्षक राघू हारुळे यांच्या हस्ते करण्यात आले.

याप्रसंगी प्रसिद्ध व्याख्याते सागर चव्हाण यांनी "आद्यक्रांतिवीर राजे उमाजी नाईक – एक क्रांतीज्योत" या विषयावर अत्यंत प्रभावी व अभ्यासपूर्ण व्याख्यान दिले. आपल्या ओघवत्या वक्तृत्वातून त्यांनी उमाजी नाईक यांच्या जीवनातील संघर्ष, शौर्य, धैर्य, स्वाभिमान, त्याग तसेच इंग्रज सत्तेविरुद्ध त्यांनी उभारलेल्या लढ्याचा प्रेरणादायी इतिहास विद्यार्थ्यांसमोर उलगडून सांगितला.

यावेळी बोलताना सागर चव्हाण म्हणाले, "उमाजी नाईकांचा संघर्ष म्हणजे केवळ इंग्रजांविरुद्धचा लढा नव्हता, तर तो स्वातंत्र्य, स्वाभिमान आणि अन्यायाविरुद्धच्या संघर्षाची प्रेरणा होती. उमाजी नाईकांचा इतिहास हा केवळ भूतकाळात अडकलेला इतिहास नसून आजच्या पिढीला धैर्य, स्वाभिमान, राष्ट्रप्रेम आणि अन्यायाविरुद्ध उभे राहण्याची प्रेरणा देणारी क्रांतीज्योत आहे." प्रतिकूल परिस्थितीतही उमाजी नाईक यांनी मातृभूमीच्या स्वातंत्र्यासाठी संघर्ष केला. त्यांच्यातील नेतृत्वगुण, संघटनकौशल्य, धाडस आणि स्वाभिमान आजच्या विद्यार्थ्यांनी आत्मसात करणे गरजेचे आहे, असे सागर चव्हाण यांनी सांगितले.

इतिहासातील महान क्रांतिकारकांच्या विचारांचा आदर्श घेऊन विद्यार्थ्यांनी शिक्षण, संस्कार, सामाजिक बांधिलकी आणि राष्ट्रनिर्माणाच्या कार्यात योगदान द्यावे, असे आवाहनही त्यांनी केले.

व्याख्यानादरम्यान उमाजी नाईक यांच्या जीवनातील विविध प्रसंग, त्यांच्या संघर्षातील आव्हाने आणि स्वातंत्र्याच्या ध्येयासाठी त्यांनी केलेला त्याग यांचा संदर्भ देत सागर चव्हाण यांनी विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रप्रेमाची भावना जागृत केली. त्यांच्या प्रभावी व ओघवत्या मांडणीला विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. त्यामुळे संपूर्ण कार्यक्रमस्थळी उत्साहाचे व प्रेरणादायी वातावरण निर्माण झाले.या कार्यक्रमातून आद्यक्रांतिवीर उमाजी नाईक यांच्या पराक्रमाची गाथा, त्यांचा स्वाभिमान आणि देशभक्तीचा विचार नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्याचा संदेश देण्यात आला.

# राष्ट्रीय अन्न सुरक्षा व पोषण अभियानांतर्गत बोराटेवस्ती येथे शेतकरी प्रशिक्षण संपन्न




**■ यवत (दै. संध्या)**

महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागामार्फत राबविण्यात येत असलेल्या 'राष्ट्रीय अन्न सुरक्षा आणि पोषण अभियान' अंतर्गत सन २०२६-२७ या वर्षासाठी बाजरी पीक पद्धतीवर आधारित शेतकरी प्रशिक्षण वर्गाचे आयोजन दौंड तालुक्यातील बोराटेवस्ती येथे करण्यात आले. या प्रशिक्षणाद्वारे परिसरातील शेतकऱ्यांना बाजरी पिकाचे आधुनिक शेती तंत्रज्ञान आणि पीक व्यवस्थापनाचे सखोल धडे देण्यात आले.

या उपक्रमाला तालुका कृषी अधिकारी अजिंक्य दुधाने, मंडळ कृषी अधिकारी सतीश जगताप आणि उपकृषी अधिकारी संतोष मोरे यांनी वेळोवेळी भेट देऊन शेतकऱ्यांना तांत्रिक मार्गदर्शन केले.

सदर प्रशिक्षण सत्रांमध्ये सहाय्यक कृषी अधिकारी विनायक जगताप यांनी खरीप हंगामातील बाजरी पीक लागवडीपासून ते काढणीपर्यंत शेतकऱ्यांना एकूण चार प्रशिक्षण सत्रांमध्ये सखोल तांत्रिक मार्गदर्शन केले. रिसोर्स फार्मर अतुल साहेबराव भगत यांनी आपल्या अनुभवातून बाजरी पिकाच्या आधुनिक प्रयोगांची माहिती देत शेतकऱ्यांच्या शंकांचे निरसन केले.

प्रशिक्षण सत्र पूर्ण झाल्यानंतर उपस्थितांसाठी राजाराम लक्ष्मण बोराटे यांच्या बाजरी शेतावर प्रत्यक्ष भेटीचे नियोजन करण्यात आले होते. या क्षेत्रभेटीदरम्यान शेतकऱ्यांना प्रात्यक्षिकांद्वारे आधुनिक व्यवस्थापनाची माहिती देण्यात आली.

प्रयोगशील शेतकरी उमेश केदारी म्हणाले, बाजरी लागवडीपासून ते काढणीपर्यंत कृषी विभागाचे सातत्याने तांत्रिक मार्गदर्शन मिळत आहे.

या योग्य नियोजनामुळे आणि आधुनिक पद्धतींचा अवलंब केल्यामुळे आमच्या बाजरी उत्पादनात २५ ते ३० टक्के वाढ नक्की होईल, असा आम्हाला विश्वास वाटतो.

या प्रशिक्षण वर्गाला आणि प्रक्षेत्र भेटीला रामदास बोराटे, प्रसाद घुले, उमेश केदारी, अविनाश घुले, अक्षय घुले, सुरेश थोरात, अशोक थोरात, आनंता बोराटे, दत्ता मदने, हनुमंत बोराटे, मारुती बोराटे, आत्माराम बोराटे, बापू बोराटे, सुनील बोराटे यांच्यासह परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कृषी विभागाच्या या उपक्रमामुळे शेतकरी वर्गातून मोठे समाधान व्यक्त होत आहे.

# नारायणगावात रोटरीच्या वतीने "रोटरी गुणवंत शिक्षक पुरस्कार 2026 वितरण सोहळा" उत्साहात

**■ नारायणगाव (दै. संध्या)**

रोटरी क्लब नारायणगावच्या वतीने जुन्नर तालुक्यातील विविध शाळेतील उपक्रमशील शिक्षकांना "रोटरी गुणवंत शिक्षक पुरस्कार 2026" देऊन सन्मानित करण्यात आल्याची माहिती रोटरी क्लब नारायणगावचे अध्यक्ष अमित बेनके व फर्स्ट लेडी धनश्री बेनके यांनी दिली.




कार्यक्रमाच्या निमित्ताने ग्रामोन्नती मंडळाच्या विश्वस्त मोनिका मेहेर,ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या व मार्गदर्शिका राजश्री बेनके, नारायणगाव कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.आनंद कुलकर्णी,शिक्षण विस्तार अधिकारी अनिता शिंदे,रोटरी प्रेसिडेंट इलेक्ट प्रशांत ब्रम्हे,ग्रामपंचायत सदस्य हेमंत कोल्हे,द्राक्ष बागायतदार राहुल बनकर,संजय कानडे,विविध शाळांचे मुख्याध्यापक,शिक्षक वृंद,रोटरी क्लब नारायणगावचे सर्व रोटेरियन्स,सर्व ॲन्स,आदी मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी आदर्श व गुणवंत शिक्षक रमाकांत कवडे,विजय नागरे,सुरेखा बटवाल,राहुल नवले,स्वागता वाजगे,माधुरी बनकर,चैताली आवटे ,विवेक बोरसे,छाया गायकवाड,शुभांगी वाबळे,अमिन पठाण,रंजना पिल्ले,मंगल फुलसुंदर,सिमा सोनवणे, रिना शेनॉय व प्रिया दरेकर या १६ उपक्रमशील शिक्षकांना सन्मानचिन्ह,शाल व पुष्पगुच्छ देऊन मान्यवरांच्या शुभहस्ते गौरविण्यात आले.

यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ.आनंद कुलकर्णी,विश्वस्त मोनिका मेहेर,क्लबचे अध्यक्ष अमित बेनके,पुरस्कारार्थी शिक्षक रमाकांत कवडे व राहुल नवले यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे नियोजन हेमंत महाजन,मंगेश मेहेर,योगेश भिडे,तेजस वाजगे,निर्मला मेहेर,सिमा महाजन,सचिन घोडेकर,लहू गायकवाड,विवेक नाईक,भरत चिलप,वैभव बेनके,डॉ.केतकी काचळे,अमृता भिडे,रेखा ब्रम्हे,प्रियांका बोरकर,अश्विनी वाजगे,रिनाली वामन,माधवी चिलप व मनाली नाईक यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन क्लबचे माजी अध्यक्ष हेमंत महाजन यांनी केले तर आभार क्लबचे माजी अध्यक्ष मंगेश मेहेर यांनी मानले.

## थोडक्यात पण महत्वाचे



### वर्धा येथे राज्यातील पहिले कडुनिंब संशोधन व संवर्धन केंद्र उभारण्याची कार्यवाही करावी

**मुंबई : दैनिक संध्या**

कडुनिंब हे भारतीय परंपरेतील अत्यंत उपयुक्त औषधी आणि आर्थिकदृष्ट्या महत्वाचे वृक्ष आहे. कडुनिंब संशोधन व संवर्धन, जैवविविधतेचे जतन, कृषिवानिकी, प्रशिक्षण व जनजागृतीसह स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना देण्यासाठी वर्धा जिल्ह्यातील भिडी येथे राज्यातील पहिले कडुनिंब संशोधन व संवर्धन केंद्र उभारण्याची कार्यवाही करावी, असे निर्देश वनमंत्री गणेश नाईक यांनी दिले. वर्धा जिल्ह्यातील भिडी येथील शासकीय रोपवाटिकेत राज्यातील पहिले कडुनिंब संशोधन व संवर्धन केंद्र स्थापन करण्यासंदर्भात मंत्रालयात आयोजित बैठकीत वनमंत्री गणेश नाईक बोलत होते. यावेळी आमदार राजेश बकाणे, मुख्य वनसंरक्षक जितेंद्र रामगावकर, उपवनसंरक्षक लक्ष्मण पाटील यांच्यासह वन विभागाचे अधिकारी उपस्थित होते. वनमंत्री श्री. नाईक म्हणाले की, राज्यातील पहिले कडुनिंब संशोधन व संवर्धन केंद्र पर्यावरण संरक्षणाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरणार आहे. या केंद्राच्या माध्यमातून कडुनिंबाचे संशोधन व संवर्धन, जैवविविधतेचे जतन, कृषिवानिकीचा प्रसार, प्रशिक्षण आणि जनजागृतीला चालना मिळेल. तसेच स्थानिक अर्थव्यवस्था बळकट होऊन शेतकऱ्यांनाही त्याचा लाभ होईल. कडुनिंब प्रजातीसंदर्भात यापूर्वी झालेल्या संशोधनाची माहिती तसेच सध्या उपलब्ध असलेल्या संशोधनाच्या व्याप्तीबाबत संशोधन विभागाने सविस्तर अहवाल सादर करावा. या केंद्रासाठी आवश्यक जमीन आणि निधी उपलब्ध करून देण्याची कार्यवाहीही तातडीने करावी, अशा सूचना वनमंत्री श्री. नाईक यांनी यावेळी दिल्या.

### डिजिटल क्रॉप सर्व्हेला सुरुवात; शेतकऱ्यांनी पीक पाहणी नोंदणीसाठी सहकार्य करावे

**शिरूर : दैनिक संध्या**

केंद्र शासनाच्या डिजिटल क्रॉप सर्व्हे मोबाईल ॲपद्वारे राज्यात दि. ११ ऑगस्ट २०२६ पासून पीक पाहणीचे काम सुरू करण्यात आले आहे. पीक पाहणी प्रक्रियेत अधिक पारदर्शकता, सुसूत्रता आणि अचूक नोंदणी होण्यासाठी तसेच राज्याच्या कृषी विभागाने AgriStack संकल्पनेबाबत घेतलेल्या शासन निर्णयानुसार डिजिटल क्रॉप सर्व्हे (DCS) मोबाईल ॲपद्वारे पिकांची नोंदणी करण्यात येत आहे. या डिजिटल पीक पाहणीमध्ये गट क्रमांक किंवा सर्व्हे क्रमांकाच्या बांधापासून २० मीटरच्या आत उभे राहून पिकाचे छायाचित्र घेणे अनिवार्य करण्यात आले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी आपल्या शेतातील पिकांची अचूक नोंदणी होण्यासाठी प्रशासनास सहकार्य करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. शिरूर तालुक्यातील सर्व खातेदार व शेतकरी यांनी पीक पाहणी नोंदणी करण्यासाठी सर्व ग्राम महसूल अधिकाऱ्यांनी नियुक्त केलेल्या सहाय्यकांशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे. संबंधित सहाय्यकांना सोबत घेऊन त्यांच्या प्रत्यक्ष शेतातील उभ्या असलेल्या पिकांचे फोटो घेऊन पीक पाहणीची नोंदणी करता येणार आहे. सर्व प्रकारच्या पिकांची पीक पाहणी करण्यासाठी शेतकऱ्यांनी सहभागी होऊन प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन शिरूर तालुक्याचे तहसीलदार बाळासाहेब म्हस्के यांनी केले आहे.

### भागडी येथील दुचाकीस्वार महिलांवर बिबट्याकडून झडप

**कवठे येमाई : दैनिक संध्या**

शिरूर तालुक्यातील पिंपरखेड नजीक भागडी रस्त्यालगतच्या उसाच्या शेतात दबा धरून बसलेल्या बिबट्याने दुचाकीस्वार महिलांवर हल्ला करण्याचा प्रयत्न केला. मात्र, प्रसंगावधान राखल्याने महिला बचावल्या असून या घटनेत एक महिला जखमी झाली आहे. रविवारी रात्री सुमारे साडेसातच्या सुमारास शिरूर तालुक्यातील पिंपरेखेड येथील भागडी रस्त्यावरील बऱ्हाटेवस्ती परिसरात ही घटना घडली. भागडी येथील सुषमा भास्कर उंडे आणि स्नेहा सुनील भोजने या दोघी दुचाकीवरून पिंपरखेड च्या दिशेने जात होत्या. बऱ्हाटेवस्ती परिसरात रस्त्याच्या कडेला असलेल्या उसाच्या शेतातून अचानक बिबट्या बाहेर आला. त्याने थेट दुचाकीच्या दिशेने झेप घेत हल्ल्याचा प्रयत्न केला. त्यामुळे दोघीही भयभीत झाल्या.घाबरलेल्या अवस्थेत दुचाकी पुढे नेत असताना घसरल्याने स्नेहा भोजणे जखमी झाल्या. त्यांच्यावर पिंपरेखेड येथील खासगी दवाखान्यात प्राथमिक उपचार करण्यात आले. पिंपरेखेड परिसरात गेल्या काही दिवसांपासून बिबट्यांचा वावर वाढला आहे. उसाच्या शेतांमध्ये बिबट्यांचा अधिवास असल्याने रात्रीच्या वेळी दुचाकीस्वार तसेच पायी जाणाऱ्या नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे.नागरिकांच्या मागणीनुसार वनविभागाने परिसरात पिंजरे लावले आहेत; मात्र अद्याप बिबट्या जेरबंद झालेला नाही. रात्रीच्या वेळी दोन बिबटे दिसून आल्याचे ग्रामस्थांनी सांगितले. त्यामुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. हल्ल्याचा प्रयत्न करणाऱ्या बिबट्याने भविष्यात इतर नागरिकांवरही हल्ला करण्याची शक्यता नाकारता येत नसल्याने वनविभागाने घटनेची गांभीर्याने दखल घेऊन बिबट्यांचा वावर असलेल्या भागाची तातडीने पाहणी करावी, आवश्यक ठिकाणी पिंजरे वाढवावेत आणि नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी प्रभावी उपाययोजना कराव्यात अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

### रिलायन्स कंझ्युमर प्रॉडक्ट्सने बॉम्बे क्रीमरीच्या लॉँचसह आईस्क्रीम मार्केटमध्ये धोरणात्मक प्रवेशाची केली घोषणा

**मुंबई : दैनिक संध्या**

पुणे : रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेडच्या दैनंदिन वापरातील ग्राहक उत्पादन विभागातील कंपनी रिलायन्स कन्झ्युमर प्रॉडक्ट्स लिमिटेडने आज बॉम्बे क्रीमरी या ब्रँडच्या शुभारंभाची घोषणा केली. या माध्यमातून कंपनीने देशातील वेगाने विस्तारत असलेल्या आइस्क्रीम बाजारपेठेत आपल्या धोरणात्मक आणि समर्पित प्रवेशाची सुरुवात केली आहे. रिलायन्स कन्झ्युमर प्रॉडक्ट्स लिमिटेडच्या देशव्यापी वितरण व्यवस्थेचा, व्यापक किरकोळ बाजारपेठेतील पोहोचीचा तसेच ग्राहकांच्या पसंती व गरजांविषयीच्या सखोल आकलनाचा भक्कम आधार बॉम्बे क्रीमरीच्या शुभारंभामागे आहे. हे पाऊल आइस्क्रीम क्षेत्राप्रती कंपनीची गंभीर आणि दीर्घकालीन बांधिलकी अधोरेखित करते. बॉम्बे क्रीमरीची उभारणी एका स्पष्ट आणि ठाम वचनावर करण्यात आली आहे—प्रत्येक वेळी अस्सल दुग्धजन्य घटक आणि उत्कृष्ट गुणवत्तेचा अनुभव ग्राहकांना देणे. 'परवडणाऱ्या किमतीत जागतिक दर्जाची गुणवत्ता' या आपल्या वचनाशी सुसंगत राहून बॉम्बे क्रीमरीची आइस्क्रीम अस्सल दुधाच्या सायीपासून तयार केली जाते. रिलायन्स कन्झ्युमर प्रॉडक्ट्स लिमिटेडचे संचालक टी. कृष्णकुमार म्हणाले, "दुग्धजन्य पदार्थांच्या गुणवत्तेसाठी कोणत्याही प्रकारची तडजोड किंवा शॉर्टकट स्वीकारता कामा नये, या साध्या विचारातून आम्ही बॉम्बे क्रीमरीची उभारणी केली आहे.

# मराठी चित्रपटांसाठी अधिकाधिक चित्रपटगृहे उपलब्ध करून देण्यात येणार

**मराठी चित्रपटसृष्टीच्या विकासासाठी आधुनिक सुविधांनी युक्त चित्रनगरी उभारणार, ६२ वा महाराष्ट्र राज्य मराठी चित्रपट पुरस्कार प्रदान सोहळा**

■ मुंबई (दै. संध्या)

महाराष्ट्राची समृद्ध सांस्कृतिक परंपरा आणि मराठी चित्रपटसृष्टीची कलात्मक गुणवत्ता जपतानाच आधुनिक तंत्रज्ञानाने युक्त अशी चित्रनगरी विकसित करण्याचा शासनाचा प्रयत्न आहे. चित्रपट निर्मितीसाठी आवश्यक सर्व आधुनिक सुविधा, तंत्रज्ञान आणि विविध प्रकारचे सेट्स एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्यात येतील. तसेच मराठी चित्रपटांसाठी अधिकाधिक चित्रपटगृहे उपलब्ध करून देण्याचा आराखडा तयार करण्यात आला असून तो लवकरच जाहीर करण्यात येईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

६२ व्या महाराष्ट्र राज्य मराठी चित्रपट पुरस्कार प्रदान सोहळ्यात मुख्यमंत्री श्री. फडणवीस बोलत होते. यावेळी सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार, विधान परिषदेचे उपसभापती सचिन अहिर, सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव डॉ.किरण कुलकर्णी, फिल्मसिटीच्या व्यवस्थापकीय संचालक स्वाती म्हसे पाटील यांच्यासह ज्येष्ठ संगीतकार पंडित हृदयनाथ मंगेशकर, अभिनेत्री हेलन खान, अभिनेत्री राणी मुखर्जी, अभिनेता-दिग्दर्शक प्रसाद ओक, किरण शांताराम आणि चित्रपटसृष्टीतील मान्यवर उपस्थित होते.

कलात्मक दृष्ट्या देशातील सर्वोत्तम चित्रपटांमध्ये मराठी चित्रपटांचा समावेश होतो, असे सांगताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, आशय, वैविध्य आणि प्रयोगशीलता ही मराठी चित्रपटांची वैशिष्ट्ये आहेत. देशातील सर्वोत्तम रंगभूमी म्हणून मराठी रंगभूमीकडे पाहिले जाते. मराठी कलावंतांनी रंगभूमीची परंपरा आणि प्रतिष्ठा आजही जपली आहे. याच समृद्ध परंपरेच्या बळावर मराठी चित्रपटसृष्टी सातत्याने पुढे जात आहे.

यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते पं. हृदयनाथ मंगेशकर यांना चित्रपती व्ही. शांताराम जीवनगौरव पुरस्कार, अभिनेता प्रसाद ओक यांना चित्रपती व्ही. शांताराम विशेष योगदान पुरस्कार, सलीम खान यांना राज कपूर जीवनगौरव पुरस्कार आणि डॉ.राणी मुखर्जी यांना राज कपूर विशेष योगदान पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. सलीम खान यांच्या वतीने अभिनेत्री हेलन यांनी जीवनगौरव पुरस्कार स्वीकारला.




पंडित हृदयनाथ मंगेशकर यांनी अखंड संगीतसेवा करत स्वतंत्र संगीतविश्व निर्माण केले. ज्ञानेश्वर माऊली, वीर सावरकर आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्यावरील त्यांच्या संगीतनिर्मितीतून मराठी संस्कृती, अध्यात्म आणि राष्ट्रभावना प्रभावीपणे व्यक्त झाली. 'मोगरा फुलला', 'अरे अरे ज्ञाना झालासी पावन', 'रुणूझुणू रुणूझुणू रे भ्रमरा' तसेच 'शिवकल्याण राजा' यांसारख्या अजरामर रचनांचा उल्लेख करून मुख्यमंत्र्यांनी पंडितजींच्या योगदानाचे कौतुक केले.

सलीम-जावेद या जोडीने आणि सलीम खान यांनी भारतीय चित्रपटसृष्टीला नवे वळण दिले. 'जंजीर', 'दीवार', 'शोले' यांसारख्या चित्रपटांमधून त्यांनी प्रभावी नायक आणि अजरामर व्यक्तिरेखा निर्माण केल्या. 'अँग्री यंग मॅन'ची संकल्पना लोकप्रिय करण्यात त्यांच्या लेखनाचा मोठा वाटा असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

अभिनेता-दिग्दर्शक प्रसाद ओक यांच्या अभिनयाचे कौतुक करताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, विविध क्षेत्रांत प्रभावी काम करणारे प्रसाद ओक हे कलेच्या क्षेत्रातील '३६० डिग्री मॅन' आहेत. 'धर्मवीर' चित्रपटातील आनंद दिघे यांची त्यांनी साकारलेली भूमिका अत्यंत प्रभावी असल्याचे सांगून त्यांच्या पुढील कलात्मक वाटचालीस मुख्यमंत्र्यांनी शुभेच्छा दिल्या.

अभिनेत्री राणी मुखर्जी यांनी तीन दशकांच्या कारकिर्दीत विविध भूमिका साकारल्या असून 'मर्दानी'सारख्या चित्रपटांतून स्त्रीकेंद्री भूमिका प्रभावीपणे मांडल्या असल्याचेही मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितले.

महाराष्ट्राची आणि मुंबईची ओळख चित्रपट नगरी म्हणूनही जगभरात आहे. मराठी तसेच अन्य चित्रपटांच्या माध्यमातून महाराष्ट्राने चित्रपटसृष्टीला समृद्ध परंपरा दिली आहे. या परंपरेला पुढे नेत चित्रपट निर्मितीसाठी आवश्यक सुविधा अधिक सक्षम करण्यावर राज्य शासनाचा भर आहे. मुंबईतील फिल्म सिटी, एन. डी. स्टुडिओ, कोल्हापूरमधील चित्रिकरण सुविधा यांसोबतच आता रामटेक आणि नाशिक येथे नवीन फिल्म सिटी उभारण्याच्या दिशेने राज्य शासन काम करत आहे, असे सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार यांनी सांगितले.

## पैशापेक्षा नात्यांना अधिक महत्त्व : उद्योजक गोते

■ कोरेगावमुळ (दै. संध्या)

पैसा, संपत्ती आणि वैभव यापेक्षा आयुष्यात जपलेली नाती अधिक महत्त्वाची असतात. लहानपणीची माणसे आणि त्यांच्या आठवणी आयुष्यभर मनात घर करुन राहतात. शेवराई आणि ज्ञानदेव बाबा यांच्या कुटुंबाशी माझे जुने ऋणानुबंध असून, आजही त्या आठवणी मनात ताज्या आहेत, असे प्रतिपादन उद्योजक - महालक्ष्मी डेव्हलपर्सचे चेअरमन दत्तात्रय गोते पाटिल यांनी केले. शेवराई व ज्ञानदेव बाबा यांच्या प्रतिमेचे दर्शन नायगाव (ता.हवेली) येथे जाऊन घेतले आशीर्वाद घेतल्यानंतर दत्तात्रय गोते बोलत होते.



ते म्हणाले, 'आम्ही लहान असताना ज्ञानदेव मामा आणि शेवराई भिक्षा मागण्यासाठी आमच्या घरी येत असत. त्यावेळी आमची आर्थिक परिस्थिती अत्यंत नाजूक होती. ज्ञानदेव मामांची सायकल घेऊन मी खेळायचो. त्यामुळे आई मला अनेकदा रागवायची. आज ती माणसे आपल्यात नाहीत; मात्र त्यांच्या आठवणी आयुष्यभर मनात राहतील'. शेवराई आणि ज्ञानदेव बाबा यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत भिक्षा मागून आपल्या कुटुंबाचा सांभाळ केला. त्यांच्या संघर्षातून कुटुंबाला उभे करण्यासाठी त्यांनी मोठे कष्ट घेतले. त्या काळात गरीब-श्रीमंत असा भेदभाव न करता माणुसकीचे नाते जपले जात होते, असेही गोते यांनी नमूद केले. आज शेवराई आणि ज्ञानदेव मामांची मुले देशभर विविध क्षेत्रांत कार्यरत आहेत, ही अभिमानाची आणि आनंदाची बाब आहे. त्यांच्या संघर्षातून पुढील पिढीने घेतलेली भरारी हीच त्यांच्या कष्टांची खरी पावती आहे, असे त्यांनी सांगितले. या वेळी तुकाराम भोसले, लेखक भास्कर भोसले, समाजसेवक नामदेव भोसले, पत्रकार सुनील भोसले, बाबा भोसले, सुरेखाताई भोसले, शोभा भोसले, गौरी भोसले, सुजाता भोसले, राणी भोसले आदी उपस्थित होते. या भेटीमुळे जुन्या आठवणींना उजाळा मिळून वातावरण निर्माण झाले.

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर टीका करण्यापूर्वी त्यांनी मराठा समाजासाठी केलेले काम पाहावे

■ मुंबई (दै. संध्या)

मराठा समाजाच्या आरक्षणाच्या प्रश्नावर तत्कालीन मुख्यमंत्री आणि विद्यमान उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घेतलेली भूमिका संपूर्ण समाजासमोर स्पष्ट आहे. त्यामुळे त्यांच्यावर टीका करण्यापूर्वी त्यांनी मराठा समाजासाठी काय केले, कोणते निर्णय घेतले आणि कोणत्या परिस्थितीत समाजाच्या मागण्यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहिले, हे मनोज जरांगे पाटील यांनी लक्षात घ्यावे, असे स्पष्ट प्रतिपादन मंत्री शंभूराज देसाई यांनी केले.

मराठा समाजाच्या मागण्यांसाठी एकनाथ शिंदे यांनी केवळ आश्वासने दिली नाहीत, तर मुख्यमंत्री म्हणून ठोस निर्णय घेतले. मराठा समाजाला आरक्षण मिळावे यासाठी शासनस्तरावर सातत्याने प्रयत्न केले. आंदोलकांच्या भावना समजून घेत संवाद साधला. अशा व्यक्तीवर आज टीका करणे हे योग्य नाही, असे देसाई यांनी स्पष्ट केले. "मराठा समाजाच्या प्रश्नावर एकनाथ शिंदे यांची भूमिका कधीही दुटप्पी राहिलेली नाही. समाजाला न्याय मिळावा, यासाठी त्यांनी सातत्याने निर्णय घेतले आणि प्रयत्न केले. त्यामुळे व्यक्तिगत टीका करण्यापेक्षा त्यांनी मराठा समाजासाठी केलेल्या कामाचा लेखाजोखा पाहावा," असे शंभूराज देसाई यांनी सांगितले. मराठा आरक्षणाचा प्रश्न हा अत्यंत संवेदनशील आणि कायदेशीरदृष्ट्या गुंतागुंतीचा आहे. या प्रश्नावर सरकारने सातत्याने सकारात्मक भूमिका घेतली आहे. आरक्षणाच्या प्रश्नावर कायदेशीर अडचणी दूर करून मराठा समाजाला न्याय मिळवून देण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे. त्यामुळे समाजाच्या भावनांचा आदर राखत संवाद आणि कायदेशीर मार्गाने प्रश्न सोडविणे हाच योग्य मार्ग असल्याचे देसाई यांनी सांगितले.

## 'महाराष्ट्र एपस्टीन फाइल्स'नंतर सागरकुमार जैन यांचा 'लव्ह ट्रॅप'

■ नांदेड (दै. संध्या)

महाराष्ट्रातील संवेदनशील आणि चर्चेतील विषयांवर आधारित चित्रपट निर्मिती करणारे नांदेड येथील चित्रपट निर्माते तथा लेखक सागरकुमार शांतीलाल जैन यांच्या जैन फिल्म प्रोडक्शनच्या माध्यमातून आता 'लव्ह ट्रॅप' हा चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे.

या चित्रपटात नांदेड जिल्ह्यातील बिलोली येथील सामाजिक कार्यकर्ते तथा पत्रकार लक्ष्मीकांत कलमूर्गे हे एका पत्रकाराची भूमिका साकारत आहेत. समाजातील वास्तव घटनांना पत्रकाराच्या नजरेतून मांडणारे हे पात्र चित्रपटातील महत्त्वाचा भाग ठरणार असल्याचे सांगण्यात येत आहे. चित्रपटाचे दिग्दर्शन मराठी आणि हिंदी चित्रपट क्षेत्रात नावाजलेले दिग्दर्शक या चित्रपटाचे दिग्दर्शन करणार असून नक्कीच प्रेक्षकांना आवडेल अशा प्रकारे चित्रपट तयार करण्यात येणार आहे. यापूर्वी 'महाराष्ट्र एपस्टीन फाइल्स' या चित्रपटातून सामाजिक वास्तवाचा धक्कादायक पैलू समोर आणल्यानंतर, सागरकुमार जैन हे पुन्हा एकदा ज्वलंत सामाजिक विषयावर आधारित 'लव्ह ट्रॅप' चित्रपट घेऊन येत आहेत. या चित्रपटातून सोशल मीडियाच्या माध्यमातून निर्माण होणारे प्रेमाचे जाळे, फसवणूक, ब्लॅकमेलिंग आणि तरुण पिढीसमोरील गंभीर धोके यावर भाष्य करण्यात येणार आहे. चित्रपटाचे लेखन, संवाद आणि दिग्दर्शनाची जबाबदारी सागरकुमार शांतीलाल जैन यांनी सांभाळली आहे. त्यांच्या दिग्दर्शनातून सामाजिक प्रश्नांना पडद्यावर प्रभावीपणे मांडण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.

## मुलांच्या डोळ्यांवर मोबाईल-टॅबलेटच्या अतिवापराचा परिणाम

■ पुणे (दै. संध्या)

मोबाईल, टॅबलेट, लॅपटॉप, टीव्ही आणि ऑनलाइन शिक्षणामुळे मुलांचा स्क्रीन टाइम मोठ्या प्रमाणात वाढला आहे. काही वर्षांपूर्वी मुलांचा बराच वेळ मैदानी खेळ, सायकलिंग, धावणे आणि इतर बाहेरील उपक्रमांमध्ये जात असे. त्यामुळे त्यांची नजर जवळच्या तसेच दूरच्या वस्तूंवर नैसर्गिकरित्या केंद्रित होत असे. मात्र, वाढत्या स्क्रीन वापरामुळे मुलांच्या डोळ्यांच्या आरोग्यावर परिणाम होण्याची शक्यता वाढली आहे.

नारायणा हेल्थ एसआरसीसी चिल्ड्रन्स हॉस्पिटलच्या बाल नेत्ररोग विभागाच्या वरिष्ठ सल्लागार डॉ. नीपा ठक्कर यांच्या मते, लहान वयात मुलांमध्ये मायोपिया म्हणजे जवळच्या वस्तू स्पष्ट दिसणे, मात्र दूरच्या वस्तू धुसर दिसणे, ही समस्या वाढताना दिसत आहे. अनुवंशिकता हा एक घटक असला तरी सतत जवळच्या वस्तूंकडे पाहणे आणि मैदानी खेळासाठी कमी मिळणारा वेळ यांचाही त्याच्याशी संबंध असू शकतो. संशोधनानुसार, नियमितपणे बाहेर खेळणाऱ्या मुलांमध्ये मायोपियाचा धोका तुलनेने कमी असू शकतो. नैसर्गिक प्रकाशात वेळ घालवणे आणि दूरच्या वस्तूंकडे पाहण्याची संधी मिळणे डोळ्यांच्या विकासासाठी उपयुक्त ठरते.

स्क्रीनचा वापर कशा पद्धतीने केला जातो, हेही महत्त्वाचे आहे. स्क्रीन डोळ्यांच्या खूप जवळ ठेवणे किंवा सलग अनेक तास स्क्रीन पाहणे यामुळे डोळ्यांमध्ये दुखणे, जळजळ, वारंवार डोळे चोळणे, डोकेदुखी, लक्ष केंद्रित करण्यात अडचण आणि काही काळ दूरचे धुसर दिसणे अशी लक्षणे जाणवू शकतात. मायोपिया वाढत गेल्यास केवळ चष्म्याचा नंबर वाढण्यापुरती समस्या मर्यादित राहत नाही. भविष्यात रेटिनाशी संबंधित समस्या, ग्लॉकोमा, कमी वयात मोतीबिंदू आणि मायोपिक मॅक्युलर डिजेनेरेशन यांसारख्या डोळ्यांच्या गंभीर समस्यांचा धोका वाढू शकतो. मुलांना अनेकदा दृष्टी कमी झाल्याची तक्रार स्वतःहून जाणवत नाही किंवा ते ती पालकांना सांगत नाहीत. त्यामुळे पालकांनी त्यांच्या दैनंदिन वागण्यात होणारे बदल लक्षात घेणे आवश्यक आहे. उदाहरणार्थ, मूल टीव्हीच्या अगदी जवळ बसत असेल, वर्गात पुढे बसण्याचा आग्रह करत असेल, वारंवार डोळे बारीक करून पाहत असेल किंवा वाचन आणि मैदानी खेळामध्ये रस कमी झाला असेल, तर त्याकडे दुर्लक्ष करू नये. मुलांना शक्य असल्यास दररोज सुमारे दोन तास मैदानी खेळासाठी प्रोत्साहित करावे. तसेच स्क्रीन वापरताना 20-20-20 नियम पाळणे उपयुक्त ठरू शकते. या नियमानुसार दर 20 मिनिटांनी किमान 20 फूट दूर असलेल्या वस्तूकडे 20 सेकंद पाहावे.स्क्रीन डोळ्यांपासून योग्य अंतरावर ठेवावी आणि ती डोळ्यांच्या पातळीपेक्षा किंचित खाली असावी. सलग अनेक वेळ स्क्रीन पाहण्याऐवजी मध्ये नियमित ब्रेक घ्यावा.

# सासवडमध्ये वाल्मिकी समाजाचा गोगादेव जन्मोत्सव साजरा

■ सासवड (दै. संध्या)

सासवड (ता.पुरंदर) वाल्मिकी समाजाचा पारंपरिक गोगादेव जन्मोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. फटाक्यांच्या आतषबाजीत, बँड व झांज पथकाच्या निनादात, सुंदर सजावट केलेले निशाण आणि आकर्षक विद्युत रोषणाई केलेल्या आदीशक्तीचा तसेच जहारवीर गोगादेव यांच्या प्रतिमेच्या रथाच्या सोबतीने शहरांतील मुख्य रस्त्यावरून मार्गस्थ झालेला हा सोहळा पाहण्यासाठी नागरिकांनी मोठी गर्दी केली होती.

येथील गोगादेव मंदिरात महाआरती व धार्मिक विधी पार पडल्यानंतर, शिवतीर्थ चौकात नगराध्यक्षा आनंदीकाकी जगताप यांच्या हस्ते निशाण पूजन करून मिरवणुकीचा प्रारंभ झाला. याप्रसंगी उपनगराध्यक्ष मनोहर जगताप, गटनेते अजित जगताप, नगरसेवक ज्ञानेश्वर गिरमे, ज्ञानेश्वर जगताप, प्रदीप राऊत, सोपान रणपिसे, लीना वढणे यांसह मान्यवर उपस्थित होते. पुणे येथील न्यू राजकमल बँड, सासवड येथील शिवरुद्र वाद्यपथक आणि अष्टविनायकाची सजावट केलेले निशाण या मिरवणुकीत विशेष लक्षवेधी ठरले.

मिरवणूक मार्गावर भाजप शहर अध्यक्ष आनंद जगताप, शिवसेना शहर प्रमुख मिलिंद इनामके, मुस्लिम संघटनेचे आरिफ आत्तार, दळवी मेडिकल फाऊंडेशनचे डॉ. राजेश दळवी, माजी उपनगराध्यक्ष वामन जगताप आदींनी गोगादेव प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. कार्यक्रमाच्या ठिकाणी महाआरती, विविध धार्मिक विधी व महाप्रसाद वाटपाचा कार्यक्रम पार पडला. जन्मोत्सव समितीचे अध्यक्ष मोहन चव्हाण, भगत सुमित राठोड यांच्यासह चव्हाण, राठोड, परदेशी व लखन परिवाराने या सोहळ्याचे उत्तम आयोजन केले होते.



## थोडक्यात पण महत्वाचे



## विनोद, मिश्किलपणा अन् टाळ्यांचा कडकडाट; 'हास्यपंचमी'ने जिंकली रसिकांची मने

पुणे : दैनिक संध्या

"इतक्या खळखळून हसा, इतके खळखळून हसा की जल्लोष झाला पाहिजे आणि अशा जोरदार टाळ्या वाजवा की जोशही वाढला पाहिजे," अशा उत्स्फूर्त आवाहनाला प्रतिसाद देत रसिकांनी हास्याची मनमुराद लूट केली. सहजीवन गणेशोत्सव मित्र मंडळ ट्रस्टच्या वतीने आयोजित सांस्कृतिक महोत्सवात प्रसिद्ध विनोदी कलाकार बंडा जोशी यांच्या 'हास्यपंचमी' या बहारदार कार्यक्रमाने उपस्थितांना मनसोक्त हसवले. सहकारनगर क्रमांक २ येथील सहजीवन गणेश मंदिर मंडपात हा कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. मराठीतील खुसखुशीत विनोद, मिश्किल शैली, दैनंदिन जीवनातील गमती-जमती आणि विविध प्रसंगांवर आधारित हलके-फुलके सादरीकरण यामुळे संपूर्ण वातावरण हास्याच्या फुलबाजीने रंगून गेले. बंडा जोशी यांच्या खास शैलीतील विनोदांना रसिकांनी टाळ्यांच्या कडकडाटात आणि हशाच्या गजरात उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. "माणूस खळखळून हसतो, तो ईश्वराची प्रार्थना करत असतो आणि जो दुसऱ्यांना हसवतो, त्याच्यासाठी ईश्वर प्रार्थना करत असतो," या भावनेतून हास्याचे महत्त्व अधोरेखित करणाऱ्या कार्यक्रमाने उपस्थितांच्या चेहऱ्यावर आनंद फुलवला. रोजच्या धकाधकीच्या जीवनातून काही क्षण आनंदाचे, तणावमुक्त आणि प्रसन्न वातावरणाचे अनुभवण्याची संधी या कार्यक्रमातून पुणेकरांना मिळाली. सांस्कृतिक महोत्सवाचे अध्यक्ष राजेश दातार, ट्रस्टचे अध्यक्ष नितीन पाटील, उपाध्यक्ष सुयश साबडे, कार्याध्यक्ष मदन कटारिया हो आहेत


## 'काकुळ'च्या थरारक रहस्याचा उलगडा होणार नोव्हेंबरमध्ये, बागलची प्रमुख भूमिका




पुणे : दैनिक संध्या

अभिनेत्री मोनालिसा बागलने आजवर वेगवेगळ्या चित्रपटांतून उत्तमोत्तम भूमिका साकारल्या आहेत. आता 'काकुळ' या थरारक रहस्यपटात मोनालिसा महत्त्वाच्या भूमिकेत दिसणार असून, नोव्हेंबर २०२६ मध्ये हा चित्रपट मोठ्या पडद्यावर प्रदर्शित होणार आहे. 'स्वप्निल गोगावले एंटरटेनमेंट 'च्या बॅनरखाली 'काकुळ' या चित्रपटाच्या निर्मितीची धुरा स्वप्निल विजया सहदेव गोगावले यांनी सांभाळली असून गौरी गोगावले, सोनाली लगड, सोमा दास आणि डॉ. सचिन भालेराव यांनी सहनिर्माते म्हणून बाजू सांभाळली आहे; तर दिग्दर्शन सूरज रघुनाथ पडवळ यांनी केले आहे. मोनालिसासह या चित्रपटात अक्षय टंकसाळे, संजय खापरे, यश डिंबळे, भूषण मंजुळे, आरती शिंदे, विवेक यादव, प्रकाश धिंडले हे कलाकारही महत्त्वपूर्ण भूमिकेत पाहायला मिळणार आहेत. या चित्रपटातील गाण्यांना उदय देशपांडे, पी. शंकरन आणि सिद्धांत बोरावके यांनी संगीतबद्ध केले असून छायांकनाची धुरा वीरधवल पाटील यांनी सांभाळली आहे. रहस्य, भय आणि सामाजिक सूडभावना हे 'काकुळ' या चित्रपटाचे मुख्य वैशिष्ट्य आहे. गावातील श्रीमंत आणि राजकीय वारसा लाभलेला संग्राम, त्याच्या आयुष्यात कल्पना या तरुणीचा प्रवेश झाल्यानंतर एकापाठोपाठ एक धक्कादायक घटना घडू लागतात. समाजातील स्त्रीविरोधी मानसिकता, पुरुषसत्ताक वृत्ती आणि वाईट कर्मांची फळे कशी भोगावी लागतात, या संकल्पनेवर 'काकुळ' हा चित्रपट बेतला आहे. प्रेक्षकांना विचार करायला लावणारा आणि थरारक अनुभव देणारा हा चित्रपट ठरेल. आजवरच्या मराठी रहस्यपट आणि भयपटांमध्ये 'काकुळ' नक्कीच वेगळा ठसा उमटवेल, यात शंका नाही. त्यामुळे या रहस्याचा उलगडा होण्यासाठी आता प्रेक्षकांना नोव्हेंबरची वाट पाहावी लागणार आहे.

## स्वरमयी गुरुकुलतर्फे रविवारी (१३ सप्टेंबर) 'किराणा परंपरा' सांगीतिक कार्यक्रम



पुणे : दैनिक संध्या

विदुषी गंगूबाई हनगळ यांच्या सांगीतिक योगदानावर आधारित 'किराणा परंपरा' या व्याख्यान-श्रवण मालिकेतील बारावा (१२ वा) कार्यक्रम रविवार, दि. १३ सप्टेंबर २०२६ रोजी आयोजित करण्यात आला आहे. डॉ. प्रभा अत्रे फाऊंडेशन संचालित 'स्वरमयी गुरुकुल' आयोजित हा कार्यक्रम सकाळी १०.०० वाजता स्वरमयी गुरुकुल सभागृह, छत्रपती संभाजी महाराज उद्यानासमोर, शिवाजीनगर, पुणे येथे होणार आहे. विदुषी गंगूबाई हनगळ या किराणा घराण्याच्या श्रेष्ठ परंपरेतील अत्यंत प्रभावशाली आणि मान्यवर गायिका म्हणून ओळखल्या जातात. आपल्या दमदार, भावपूर्ण आणि वैशिष्ट्यपूर्ण गायकीने त्यांनी भारतीय शास्त्रीय संगीताच्या क्षेत्रात स्वतंत्र स्थान निर्माण केले. किराणा घराण्याची परंपरा जपत त्यांनी स्वरांची भावगर्भ मांडणी, शब्दोच्चारातील स्पष्टता आणि रागदारीतील सखोलता यांचा सुंदर मिलाफ साधला. त्यांच्या गायकीतून व्यक्त होणारी अंतर्मुखता आणि भावानुभव आजही रसिकांना प्रभावित करतो. या कार्यक्रमात संगीत अभ्यासक डॉ. केशवचैतन्य कुंटे आणि डॉ. अतींद्र सरवडीकर हे गंगूबाई हनगळ यांच्या गायकीची वैशिष्ट्ये, त्यांची शैली, सांगीतिक वाटचाल आणि किराणा घराण्याच्या परंपरेतील त्यांचे योगदान यांचा वेध घेणार आहेत. यावेळी गंगूबाई हनगळ यांच्या काही दुर्मिळ ध्वनिमुद्रणांचाही आस्वाद रसिकांना घेता येणार आहे. कार्यक्रमास सर्व रसिकांना मुक्त प्रवेश असल्याचे स्वरमयी गुरुकुलचे कार्यक्रम निर्देशक प्रसाद भडसावळे यांनी कळविले आहे.

# शिक्षक विद्यार्थ्यांना शिक्षणासोबतच संस्कार देखील देतो

**ज्येष्ठ उद्योजक व सामाजिक कार्यकर्ते फतेचंद रांका यांचे मत : जाधवर ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटसतर्फे १० वा आदर्श शिक्षक पुरस्कार वितरण सोहळा**

■ पुणे (दै. संध्या)

भारत हा ज्ञानाचा खंड आहे. नालंदा विद्यापीठात जगभरातून विद्यार्थी शिक्षणासाठी येत होते. आजही भारतातील युवक अमेरिका, युरोप आणि आशिया खंडात विविध क्षेत्रांत आपले वर्चस्व निर्माण करत आहेत. विद्यार्थ्यांना दिले जाणारे संस्कार हा शिक्षणातील सर्वात महत्त्वाचा भाग आहे. आयुष्यात घडण्यासाठी आई-वडील आणि गुरुजनांचे आशीर्वाद महत्त्वाचे असतात, असे मत ज्येष्ठ उद्योजक, सामाजिक कार्यकर्ते व रांका ज्वेलर्स प्रा. लि.चे अध्यक्ष फत्तेचंद रांका यांनी व्यक्त केले.

जाधवर ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्सतर्फे १०व्या आदर्श शिक्षक पुरस्कार वितरण सोहळ्याचे आयोजन नऱ्हे येथील प्राचार्य डॉ. सुधाकरराव जाधवर शैक्षणिक संकुल-१ येथे करण्यात आले. यशस्वी ग्रुपचे अध्यक्ष विश्वेश कुलकर्णी अध्यक्षस्थानी होते. रांका ज्वेलर्स प्रा. लि.चे अध्यक्ष फत्तेचंद रांका प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. संस्थेचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. सुधाकर जाधवर, उपाध्यक्ष ॲड. शार्दुल जाधवर, खजिनदार सुरेखा जाधवर आदी उपस्थित होते.

यावेळी यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिकचे डॉ. संजीव सोनवणे यांना आदर्श कुलगुरू पुरस्कार, मराठवाडा मित्र मंडळ, डेक्कन जिमखाना, पुणेचे अध्यक्ष प्राचार्य भाऊसाहेब जाधव यांना आदर्श संस्थापक पुरस्कार, ग. तु. पाटील कला, वाणिज्य व विज्ञान वरिष्ठ महाविद्यालय, नंदुरबारचे डॉ. महेंद्र रघुवंशी यांना आदर्श प्राचार्य पुरस्कार आणि सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठाच्या तंत्रज्ञान अभियांत्रिकी विभागाचे अधिष्ठाता प्रा. डॉ. पराग सदगीर यांना आदर्श प्राध्यापक पुरस्कार प्रदान करण्यात आला. पुणेरी पगडी, सन्मानपत्र आणि सन्मानचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप होते. शिक्षक दिन आणि संस्थेचे उपाध्यक्ष ॲड. शार्दुल जाधवर यांच्या वाढदिवसानिमित्त दरवर्षी या पुरस्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात येते.



विश्वेश कुलकर्णी म्हणाले, विद्यार्थ्यांनी आपण कोण आहोत आणि आपली क्षमता काय आहे, याचे विश्लेषण केले पाहिजे. दुसऱ्यांकडे पाहून त्यांची नक्कल करण्याऐवजी प्रत्येक विद्यार्थ्याने स्वतःची कुवत ओळखली पाहिजे. कंपन्यांना केवळ पदवीधर नव्हे, तर प्रत्यक्ष कामाचा अनुभव असलेले मनुष्यबळ हवे आहे. त्यामुळे अनुभवाधारित शिक्षण ही काळाची गरज आहे. देशात कामासाठी मनुष्यबळ मिळत नसल्याची परिस्थिती असताना बेरोजगारी हा विषय केवळ सामाजिक किंवा राजकीय चर्चेपुरता मर्यादित राहिला आहे. शिक्षण पद्धतीत बदल करण्याची गरज असून, केवळ टक्केवारीला महत्त्व न देता विद्यार्थ्यांमध्ये उद्योजक मानसिकता विकसित केली पाहिजे, असे त्यांनी म्हटले.

डॉ. संजीव सोनवणे म्हणाले, विकसित भारताच्या निर्मितीसाठी सक्षम मानवी भांडवल विकसित करण्याची गरज आहे. हे मानवी भांडवल देशाच्या विकासात योगदान देईल.

जाधवर ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्स विद्यार्थ्यांच्या जीवनाला अर्थ प्राप्त करून देण्याचे काम करत आहे, असेही त्यांनी सांगितले. प्रा. डॉ. पराग सदगीर म्हणाले, शिक्षकाने विद्यार्थ्यांना केंद्रस्थानी ठेवून कार्य केले, तर कृत्रिम बुद्धिमत्तेच्या काळातील आव्हानांना सामोरे जाण्यासाठी विद्यार्थी सक्षम होतील.

ॲड. शार्दुल जाधवर म्हणाले, आई-वडिलांनंतर आपल्या जीवनात सर्वांत महत्त्वाची भूमिका शिक्षकांची असते. स्वतःच्या पायावर उभे राहण्याची ताकद शिक्षक देतात. शिक्षक केवळ अक्षरांची ओळख करून देत नाहीत, तर योग्य-अयोग्याची जाणीव करून देतात आणि स्वप्नांसाठी संघर्ष करण्याची शिकवण देतात. शिक्षकांमुळे समाज घडत आला आहे. मात्र, विद्यार्थ्यांना अधिक चांगले शिक्षण मिळावे यासाठी आंदोलन करणारे शिक्षक कमी दिसतात आणि स्वतःच्या फायद्यासाठी प्रयत्न करणारे अधिक दिसतात, ही आजची सत्य परिस्थिती आहे, अशी भावना त्यांनी व्यक्त केली. प्राचार्य भाऊसाहेब जाधव आणि डॉ. महेंद्र रघुवंशी यांनी मनोगत व्यक्त केले. प्रा. डॉ. सुधाकर जाधवर यांनी आभार मानले.

## बाजीराव पेशव्यांचा इतिहास अपेक्षित पद्धतीने शिकवला गेला नाही

**राजस्थानचे राज्यपाल बागडे : बीरेंद्र सिंह धनोआ यांना 'थोरले बाजीराव पेशवे शौर्य पुरस्कार' प्रदान**



■ पुणे (दै. संध्या)

बाजीरावांचा इतिहास शाळेतील विद्यार्थ्यांना शिकवलाच गेला नाही. हा इतिहास कुठे दडवून ठेवला आहे, हे मला माहीत नाही. ब्रिटिशांच्या काळापासून आजपर्यंत आपण ज्या पुस्तकांमधून इतिहास शिकलो, त्यामध्ये ब्रिटिशांचा इतिहास शिकलो, मुघलांचा इतिहास शिकलो. इंग्लंडचा संपूर्ण इतिहास शिकवला गेला. मात्र बाजीराव पेशव्यांचा इतिहास अपेक्षित पद्धतीने शिकवला गेला नाही, असे मत राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडे यांनी व्यक्त केले.

थोरले बाजीराव पेशवे यांच्या ३२६व्या जयंतीनिमित्त थोरले बाजीराव पेशवे प्रतिष्ठानतर्फे देण्यात येणारा 'थोरले बाजीराव पेशवे शौर्य पुरस्कार २०२६' एअर चीफ मार्शल बीरेंद्र सिंह धनोआ यांना प्रदान करण्यात आला. राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडे यांच्या हस्ते कोथरूड येथील बाल शिक्षण मंदिर, मएसो सभागृहात हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. कार्यक्रमाला एअर मार्शल (निवृत्त) भूषण गोखले, पेशव्यांचे वंशज पुष्करसिंह पेशवा, बेलराईज इंडस्ट्रीज लिमिटेडच्या कार्यकारी संचालिका सुप्रिया बडवे, प्रमुख वक्ते डॉ. आदित्य अभ्यंकर, प्रतिष्ठानचे सचिव कुंदनकुमार साठे, श्रीकांत नगरकर, मोरेश्वर गांगल, उमेश देशमुख आणि चिंतामणी क्षीरसागर उपस्थित होते. सन्मानचिन्ह, शाल पुष्पगुच्छ आणि रोख २५ हजार असे पुरस्काराचे स्वरूप होते.

हरिभाऊ बागडे म्हणाले, आज आपल्याला बाजीरावांसारखे होणे जमणार नाही. आता तलवारीची लढाई नाही, तर डोक्याची लढाई आहे. आज आपल्याला शिक्षणाकडे अधिक लक्ष देण्याची गरज आहे. गरिबी दूर करण्याचे प्रभावी माध्यम शिक्षण आहे. त्यामुळे प्रत्येकाला दर्जेदार शिक्षण मिळाले पाहिजे.

बीरेंद्रसिंह धनोआ म्हणाले, आपल्या देशातील लष्करी कमांडर्सबद्दल काहीच शिकवले गेले नाही. आम्ही बाजीराव पेशव्यांबद्दल शिकलो नाही, भारतावर ब्रिटिशांनी २०० वर्षे राज्य केले. आपण त्याबद्दल का रडत बसायचे? आपल्या मुलांना आपण हे शिकवले पाहिजे की आपण हरलो का? आपण या अवस्थेपर्यंत का पोहोचलो? आपण नेहमीच शूर आणि धाडसी होतो. आपले सैनिक अतिशय शूर आहेत. पण आपण एकत्र नव्हतो. आपण आपापसातच लढत होतो.

आपल्या अभ्यासक्रमात सर्वत्र भारतीय लढाया शिकवल्या पाहिजेत. त्याहून महत्त्वाचे म्हणजे आपल्या पराभवांबद्दल आणि ते का झाले याबद्दल शिकवले पाहिजे. आपण काय केले आणि कुठे चुकलो, हे शिकवले पाहिजे.एक राष्ट्र म्हणून आपणही कायम अशी शपथ घेतली पाहिजे की आपण एकत्र राहू आणि पुन्हा कधीही कोणालाही आपल्यात फूट पाडू देणार नाही.

सुप्रिया बडवे म्हणाल्या, बाजीराव पेशवे हे दूरदृष्टी असणारे सेनानी होते. इतिहासाचा अभ्यास करावा, मात्र तो केवळ अभ्यासून सोडू नये; त्यातून शिकावे, प्रेरणा घ्यावी आणि ती आपल्या आयुष्यात आचरणात आणावी.

डॉ. आदित्य अभ्यंकर म्हणाले, थोरले बाजीराव पेशवे हे शेवटपर्यंत अपराजित राहिलेले सेनापती होते. मात्र, त्यांच्या नावासोबत प्रामुख्याने मस्तानीचा संदर्भ जोडला जातो. बाजीराव-मस्तानी यांच्या नावाने चित्रपटही तयार झाला. त्या काळात क्षात्रधर्मानुसार अशा प्रकारचे विवाह होत असत. मस्तानी यांच्याशी असलेल्या संबंधांमुळे बाजीरावांच्या राजकारणावर किंवा त्यांच्या कर्तृत्वावर कोणताही परिणाम झाला नव्हता. त्यामुळे बाजीराव आणि मस्तानी यांच्याबद्दल मनात कोणताही कलुषित भाव ठेवू नये, असेही त्यांनी सांगितले. कुंदनकुमार साठे म्हणाले, बाजीराव पेशवे हे अपराजित सेनानी होते. त्यांचे कर्तृत्व पुढील पिढीला कळण्यासाठी बाजीराव पेशवे यांच्या पुढील जयंतीपर्यंत विधानभवनात त्यांचे तैलचित्र लावले गेले पाहिजे.

## ढोल-ताशाच्या निनादातून संस्कृती जपणाऱ्या वादकांच्या कर्तृत्वाचा गौरव



■ पुणे (दै. संध्या)

ढोल-ताशाच्या निनादातून महाराष्ट्राची सांस्कृतिक परंपरा जपणाऱ्या वादकांचे योगदान केवळ वादनापुरते मर्यादित नसून, विविध क्षेत्रांत आपल्या कर्तृत्वाने कुटुंब, पथक आणि समाजाचा गौरव वाढविणाऱ्या या वादकांच्या कार्याची दखल घेण्यात आली. ढोलाच्या टिपरूने संस्कृतीचा नाद घुमविणाऱ्या आणि दुसरीकडे शिक्षण, कला, क्रीडा, सामाजिक कार्य, शासकीय सेवा तसेच विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या वादकांचा सन्मान ढोल ताशा महासंघ, पुणे शहरातर्फे करण्यात आला.

बाजीराव रस्त्यावरील नु.म.वि. शाळेत सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या सन्मान सोहळ्यास श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणेशोत्सव ट्रस्टचे अध्यक्ष सुनील रासने, आदर्श मित्र मंडळचे उदय जगताप, मैत्र युवा फाउंडेशनचे संकेत देशपांडे, ढोल ताशा महासंघाचे शिरीष थिटे, संघटक अनुप साठे आणि पुणे शहराचे अध्यक्ष अक्षय बलकवडे, संजय सातपुते, विवेक खटावकर उपस्थित होते. विविध पथकातील ४३ वादकांचा सन्मान करण्यात आला.

शिरीष थिटे म्हणाले, विविध ढोल-ताशा पथकांमध्ये वादन करताना शिस्त, जिद्द, परंपरा आणि सांस्कृतिक अभिमानाची जपणूक करणाऱ्या वादकांनी आपल्या कार्यक्षेत्रातही वेगळी ओळख निर्माण केली आहे. त्यांच्या या दुहेरी योगदानाची दखल घेत मानपत्र आणि सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. उदय जगताप म्हणाले, ढोल-ताशा वादन ही केवळ कला नसून महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वारशाशी जोडलेली जबाबदारी आहे. या कलेच्या माध्यमातून परंपरा जपणाऱ्या वादकांनी विविध क्षेत्रांत मिळविलेले यश नव्या पिढीसाठी प्रेरणादायी आहे. त्यामुळे वादकांच्या कर्तृत्वाचा सन्मान हा संस्कृतीच्या सन्मानासोबतच त्यांच्या मेहनतीला आणि योगदानाला दिलेली दाद आहे.

## शिंदे यांना पीएच.डी. पदवी प्राप्त

■ पुणे (दै. संध्या)



अनेकांत एज्युकेशन सोसायटी बारामतीच्या तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय,बारामती येथील वनस्पतीशास्त्र संशोधन केंद्राचे संशोधक विद्यार्थी डॉ.दत्तात्रय बाळू शिंदे यांना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची विद्यावाचस्पती पीएच. डी. पदवी नुकतीच जाहीर झाली.

डॉ.दत्तात्रय शिंदे यांनी क्षारपड शेतजमिनीत वाढणाऱ्या फिंबरीस्टाईलिस डायकोटोमा (मोथा गवत) या वनस्पतीचा जमिनीची क्षारता कमी करण्यासाठीची उपयुक्तता या विषयावर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाला प्रबंध सादर केला होता. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने त्यांना विद्यावाचस्पती ही पदवी प्रदान केली. बारामती तालुक्यातील काही ठिकाणी असलेल्या क्षारयुक्त जमिनीमुळे बियांची उगवण क्षमता व रोपांची वाढ खुंटल्यामुळे शेतकऱ्यांना मोठ्या आर्थिक संकटाचा सामना करावा लागतो. या पार्श्वभूमीवर डॉ.दत्तात्रय शिंदे यांनी केलेले संशोधन अत्यंत उपयुक्त व क्षारयुक्त नापीक जमिनीसाठी वरदान ठरेल.

# ३८ व्या पुणे फेस्टिव्हलमध्ये विविध २१ सांस्कृतिक कार्यक्रमांची रेलचेल

■ पुणे (दै. संध्या)

कला, संस्कृती, गायन, वादन, नृत्य, संगीत, साहित्य आणि क्रीडा यांचा मनोहारी संगम असणाऱ्या ३८ व्या पुणे फेस्टिव्हलमध्ये बालगंधर्व रंगमंदिर आणि यशवंतराव चव्हाण नाट्यगृह येथे तब्बल 21 सांस्कृतिक कार्यक्रमांची रेलचेल असणार आहे. हे सर्व कार्यक्रम रसिकांसाठी विनामूल्य आहेत. पुणेकरांनी या सर्व कार्यक्रमांना आवर्जून यावे असे पुणे फेस्टिव्हलचे अध्यक्ष कृष्णकुमार गोयल, जनरल सेक्रेटरी आणि सांस्कृतिक कार्यक्रम मुख्य संयोजक डॉ. सतीश देसाई आणि बालगंधर्व रंगमंदिर आणि यशवंतराव चव्हाण नाट्यगृह येथील सांस्कृतिक कार्यक्रमांचे समन्वयक व पुणे फेस्टिव्हलचे विश्वस्त मोहन टिल्लू यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.

ते म्हणाले की आशा – सुमन, उगवते तारे व इंद्रधनू, मराठी कवी संमेलन, 'व्हॉईस ऑफ पुणे स्पर्धा, कावेरी परंपरा, भारती कॉयरा वीरा, लावणी महोत्सव, सत्यशोधक महात्मा नाटक, जय हिंद, संगीत नाटक, हिंदी नाटक, मिस पुणे फेस्टिव्हल स्पर्धा, नृत्य नाट्य, स्वरयात्रा हे १४ कार्यक्रम बालगंधर्व रंगमंदिर येथे संपन्न होतील तसेच बेमिसाल रफी, आशा भोसले जीवन संगीत ऑडिओ व्हिज्युअल शो, द सुपरस्टार्स, नमामी शंभो, संभवामी युगे युगे, आविष्कार भारती हे ७ कार्यक्रम यशवंतराव चव्हाण नाट्यगृह येथे संपन्न होतील.

'आशा – सुमन '- शुक्रवार दि. १८ सप्टेंबर रोजी रात्री ९ वाजता बालगंधर्व रंगमंदिर येथे 'आशा – सुमन' हा कार्यक्रम नितीन कुलकर्णी सादर करतील. व्हॉईस ऑफ पुणे फेस्टिव्हल स्पर्धेतील विजेता 'साज व आवाज' ग्रुप हा कार्यक्रम सादर करतील. यामध्ये १० गायक व १ निवेदक असतील. (समन्वयक – नितीन कुलकर्णी)

'उगवते तारे व इंद्रधनू' - ६ ते १४ वर्षे वयोगटातील विद्यार्थी कलावंतांसाठी 'उगवते तारे' आणि १५ ते २५ वर्षे वयोगटातील युवा कलाकारांसाठी 'इंद्रधनू' हे कार्यक्रम अनुक्रमे शनिवार दि. १९ सप्टेंबर रोजी दुपारी १२ ते ३ आणि सायंकाळी ५ ते ८ यावेळेत बालगंधर्व रंगमंदिर येथे संपन्न होतील. यामध्ये पुणे शहर व ग्रामीण पुण्यातील 37 शाळा व कनिष्ठ महाविद्यालयातील ७००हुन अधिक बाल व युवा कलाकारांनी सहभाग घेतला आहे. समूह नृत्य उपक्रमात कथक, भरतनाट्यम, मोहिनीअटटम, कथकली, कुचीपुडी ओडिसी, सिनेनृत्य, लोकनृत्य, कोळीनृत्य, पाश्चिमात्य नृत्य असे विविध नृत्य प्रकार ७ मिनिटात सादर करता येईल.(समन्वयक नीता राजपूत आणि सचिन हिंगणेकर)

'मराठी कवी संमेलन' – शनिवार 19 सप्टेंबर रोजी रात्री 9 वाजता बालगंधर्व रंगमंदिर येथे मराठी कवी संमेलन संपन्न होत असून ज्येष्ठ वात्रटिकाकर रामदास फुटाणे सूत्रसंचालन करतील. यामध्ये नितीन देशमुख (अमरावती), नारायण पुरी (नांदेड), गोपाळ मापारी (जळगाव), तालिब सोलापुरी (सोलापूर), प्रशांत मोरे (मुंबई), भारत दौंडकर (शिरूर), अनिल दीक्षित (पिंपरी चिंचवड), गुंजन पाटील (छ. सांभाजीनगर), अंजली कुलकर्णी (पुणे) हे महाराष्ट्रातून नामवंत कवी व कवयित्री सहभागी होत आहेत. (समन्वयक – मोहन टिल्लू)

'व्हॉईस ऑफ पुणे' – रविवार दि. 20 सप्टेंबर रोजी सकाळी ९.३० वाजता बालगंधर्व रंगमंदिर येथे पुणे फेस्टिव्हल 'व्हॉईस ऑफ पुणे' स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. त्यात 200 हून अधिक गायक, गायिका सहभागी झाले आहेत. ओ. पी नय्यर, आशा भोसले व सुमन कल्याणपूर त्यांची एकल अथवा द्वंद्व गीते सादर होतील. महाराष्ट्राबाहेरील अनेक स्पर्धक सहभागी झाले आहे.